सोलापूर **तरुण भारत**

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर रविवार, दि. १९ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १९५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# एनडीएला धक्का, राजकारणात आलेल्या अभिनेत्रीचा अर्ज रद्द

## चिराग पासवान यांनी पहिली जागा गमावली, राजदसाठी गुड न्यूज

पाटणा : बिहार विधानसभा निवडणुकीत रालोआला पहिला धक्का बसला आहे. छपरा जिल्ह्यातील मढौरा विधानसभा मतदारसंघातील लोक जनशक्ती पार्टी (रामविलास) पक्षाच्या उमेदवार सीमा सिंह यांना उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला आहे. सीमा सिंह या भोजपुरी सिनेमा क्षेत्रातील नामांकित अभिनेत्री आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांनी चिराग पासवान यांच्या पक्षात प्रवेश करत राजकारणात पाऊल ठेवलं होतं. मात्र, सीमा सिंह यांचा उमेदवारी अर्ज झाल्यानं या जागेवर राजद विरुद्ध जनसुराज अशी लढत होईल.

सूत्रांच्या माहितीनुसार सीमा सिंह यांच्या उमेदवारी अर्जात काही तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत. ज्यामुळं निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज अपात्र ठरवला आहे. सीमा सिंह यांचा उमेदवारी अर्ज बाद झाल्यानं मढौरा विधानसभा मतदारसंघात एनडीएला मोठा धक्का बसला आहे. या जागेवर पहिल्या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

मढौरा विधानसभा मतदारसंघात एनडीए आणि महाआघाडी यांच्यात थेट लढत होईल, अशी शक्यता होती. मात्र, या जागेवर सीमा सिंह यांचा उमेदवारी अर्ज रद्द झाल्यानं एनडीएला मोठा धक्का बसला आहे. या जागेवर राजद आणि जनसुराज पार्टीत लढत होईल. या मतदारसंघात राजदनं विद्यमान आमदार जितेंद्र कुमार राय यांना उमेदवारी दिली आहे. ते यापूर्वी मंत्री राहिलेले आहेत.

कोण आहेत सीमा सिंह?

लोक जनशक्ती पार्टी रामविलास पक्षाच्या उमेदवार आणि प्रसिद्ध भोजपुरी चित्रपट अभिनेत्री सीमा सिंह राजकारणात दाखल झाल्या होत्या. चिराग पासवान यांच्या पक्षानं त्यांना उमेदवारी दिल्यानं मढौरा मतदारसंघातील लढत रोमांचक बनली होती. मात्र, आता त्या निवडणुकीच्या रिंगणातून बाहेर गेल्या आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल करताना सीमा सिंह यांनी त्यांची शैक्षणिक पात्रता आणि संपत्तीची विस्तृत माहिती दिली होती. ज्यामुळं लोकांचं लक्ष वेधलं होतं. सीमा सिंह यांचं शिक्षण नववी पास आहे. त्या ९९९ मध्ये महाराष्ट्रातील ठाणे येथी द रेम हेगर हिंडे हायस्कूल, डोंबिवली पूर्व मधून नववी उत्तीर्ण झाल्या.

पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबरला

बिहार विधानसभेची निवडणूक दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान ६ नोव्हेंबर तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबरला होणार आहे. तर, मतमोजणी १४ नोव्हेंबरला पार पडणार आहे. एनडीएनं सर्व उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. भाजप-जदयू १०१-१०१, लोजपा रामविलास २९, जीतनमराम मांझी यांच्या पक्षाला ६ आणि उपेंद्र कुशवाह यांच्या आरएलकेजे पक्षाला ६ जागा मिळाल्या आहेत.

## शेअर मार्केटमधू ट्रेडिंग फ्रॉडप्रकरणात चौघांना अटक

मुंबई : ऑनलाईन जुगार, डिजिटल अरेस्ट, शेअर मार्केटिंग असे एक ना अनेक प्रलोभने दाखवून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक होत आहे. गेल्या काही वर्षात सायबर गुन्ह्यात मोठी वाढ झाली असून आर्थिक फसवणूक केल्याचे बहुतांश गुन्हे आहेत. आता, पुन्हा एकदा ऑनलाईन शेअर मार्केटच्या माध्यमातून जादा नफा देण्याच्या आमिषाने लोकांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी ४ जणांना बंगरूळू सायबर पोलिसांनी अटक केली आहे. ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉड विरोधात मुंबई सायबर कक्षाची ही मोठी कारवाई मानली जात आहे. बंगळुरूच्या डिजिटल मार्केटिंग कंपनीच्या चार उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. डिजिटल मार्केटिंग कंपनी व्हॅल्यू लिफच्या अधिकाऱ्यांनी सायबर फ्रॉडमध्ये गुंतलेल्या हाँग काँगच्या कंपनीला मदत केल्याचा आरोप ठेवत त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आलीय. डिजिटल अरेस्ट प्रकरणानंतर आता ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉड विरोधात अशा पद्धतीची पहिलीच कारवाई असल्याचे समजते. व्हॅल्यू लिफ कंपनीच्या उपाध्यक्ष (सेल्स) आणि अकाउंट्स हेड यांच्यासह एकूण चौघांना अटक करण्यात आली आहे. हाँग काँगच्या फर्स्ट ब्रीज कंपनीने फेसबुकवर जुलै महिन्यात देशात ऑनलाईन शेअर ट्रेडिंग फ्रॉडच कॅम्पेग्न चालवलं होत. या कॅम्पेन दरम्यान अर्थ तज्ज्ञांचे डीप फेक व्हिडिओ बनवून अनेकांना शेअर ट्रेडिंग फ्रॉडमध्ये पैसे गुंतवण्यात उद्युक्त करण्यात आलं होतं. यां कॅम्पेनसाठी व्हॅल्यू लिफ कंपनीच्या प्लॅटफॉर्मचा वापर झाल्याचा आरोप आहे. कॅम्पेन दरम्यान व्हॅल्यू लिफची अनेक खाती फेसबुकची पेरेंट कंपनी मेटाने येल्लो फ्लॅग देखील केली होती. मात्र, त्यानंतरही कॅम्पेन सुरूच ठेवल्याचा आरोप कंपनीवर आहे, त्यातूनच बंगरुळू सायबर विभागाने कारवाई करत कंपनीच्या ४ उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना बेड्या ठोकल्या असून अधिक तपास सुरू आहे.

## 'कोणत्याच देशाला नाही मिळणार पेट्रोल', OPEC च्या इशाऱ्याने जगभरात उडालीय खळबळ

नवी दिल्ली : पेट्रोलियम निर्यात करणाऱ्या देशांच्या संघटना ओपेकने जगभरातील सरकारे आणि उद्योगांना मोठा धक्का देणारा इशारा दिलाय. महासचिव हैथम अल घैस यांनी २०५० पर्यंत तेल आणि वायू क्षेत्रात १८.२ ट्रिलियन डॉलर्सची भांडवली गुंतवणूक आवश्यक असल्याचे सांगितले. या गुंतवणुकीशिवाय स्वच्छ ऊर्जा संक्रमणाच्या महत्त्वाकांक्षेला अपयश येईल आणि जागतिक ऊर्जा पुरवठ्यात गंभीर तुटवडा येऊ शकतो. अल घैस यांनी म्हटलंय. यामुळे जगभरातील देशांमध्ये खळबळ उडाली आहे.




## नंदुरबारच्या चांदशैली घाटात भीषण अपघात; भाविकांची पीकअप जीप दरीत कोसळून ६ ठार, १५ हून अधिक गंभीर जखमी

नंदुरबार : नंदुरबार जिल्ह्यात आज सकाळी एक हृदयद्रावक आणि भीषण अपघात घडला आहे. भगवान अस्तंबा ऋषी यांच्या यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांच्या पीकअप जीपला चांदशैली घाटात मोठा अपघात झाला. भरधाव वेगात असलेली ही पीकअप जीप अचानक खोल दरीत कोसळली. या दुर्घटनेत ६ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे, ज्यामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. याशिवाय, १५ ते २० जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी आणि स्थानिक नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि बचावकार्य सुरू केले.

सर्व जखमींना तत्काळ तळोदा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर देवदर्शनासाठी, यात्रेला निघालेल्या भाविकांवर काळाचा घाला पडल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या अपघातामुळे नंदुरबार जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील चांदशैली घाटात झालेल्या भीषण अपघातात प्राथमिक माहितीनुसार, आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. यापैकी १० जणांची प्रकृती गंभीर असल्याने दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढण्याची दाट शक्यता आहे. सध्या जखमी झालेल्या या सर्व भाविकांना तळोदा उपजिल्हा रुग्णालयात तातडीने उपचारासाठी हलवण्यात येत आहे. पीकअप व्हॅन घाटातून जात असताना चालकाचे नियंत्रण सुटले आणि गाडी पलटी झाली. गाडी पलटी झाल्यामुळे वाहनाच्या मागच्या भागात बसलेले लोक खाली दबले गेले आणि अनेकांना जबर मार लागला. याच कारणामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी बचावकार्य हाती घेतले.

## आमदार गायकवाड यांचा खुलासा; ती दीड कोटींची डिफेंडर कार 100 टक्के कर्जातून

बुलढाणा : आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे किंवा कृतीमुळे कायम लक्षवेधी आणि वादग्रस्त ठरत असलेले शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड नव्या वादात सापडले आहेत. कारण, बुलढाणा भाजपा जिल्हाध्यक्षांनी त्यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. दीड कोटी रुपयांची नवी कोरी डिफेन्डर कार कोणत्या कामातील कमिशन आहे? असा सवाल केला आहे. आता, आमदार गायकवाड यांनी या डिफेन्डर कारबाबत सर्व ती माहिती दिली आहे.

जिल्ह्यात आणि माध्यमांमध्ये ज्या गाडीची चर्चा होत आहे. ती गाडी निलेश ढवळे या कंत्राटदाराची आहे, तो माझा नातेवाईकही आहे आणि पक्षाचा कार्यकर्तादेखील आहे. निलेशने १०० टक्के कर्ज काढून ती गाडी घेतलेली आहे, आणि मी काही दिवस वापरण्यासाठी ती गाडी माझ्याकडे बोलावली आहे. माझ्या अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या गाडीवर आमदाराचा सिम्बॉल लावला आहे, त्यात काही गैर नाही, असे स्पष्टीकरण संजय गायकवाड यांनी दिले. तसेच, भाजपा जिल्हाध्यक्ष विजय शिंदे यांच्यावर जोरदार पलटवार देखील केला.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

# पर्यावरणस्नेही आनंदी दिवाळी



चौथीतील रिया शाळेतून तणतणतच घरी आली. आईबाबा घरी यायच्या आत रियाची गाडी रुळावर आणावी म्हणून आजीने तिला कारण विचारलं तर बाईसाहेब म्हणाल्या,'आमच्या टीचरने यंदा पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यासाठी फटाके न फोडण्याची प्रतिज्ञा करायला सांगितली आणि असंही म्हणाल्या की, एकमेकांवर लक्ष ठेवून कोणी फटाके फोडले तर मला शाळा सुरू झाल्यावर त्यांची नावे सांगा. बघ ना गं आजी ! टीचरने सगळा मूडच घालवला दिवाळीचा! मी तर यावर्षी खूप खूप फटाके फोडायचे असं ठरवलं होतं. ती दीडशहाणी शलाका राहते आपल्याच बंगल्याच्या बाजूला, मी फटाके फोडले तर लगेच ती टीचरला जाऊन सांगेल,' रिया म्हणाली.



आजीने तिला विचारलं,'बरं तर मग आपण एक आयडिया करायची का? यंदाची दिवाळी आपण शेतावरच्या घरात करू या का? आईबाबांना आवड नि सवड दोन्ही नसल्याने तुम्ही तिकडे फिरकतच नाही. आजोबा गेल्यापासून मी एकटी कधीतरी जाऊन येते. तू हो म्हणालीस तर तिकडे नंदूला सगळी व्यवस्थित तयारी करायला सांगते लगेच! तुला आवडेल बाळा.' 'जाऊ दे बाई आजी! इकडच्या सारखी मज्जा थोडीच येणार ना त्या फार्महाऊसवर,'रिया म्हणाली. 'इकडे पण नाहीच येणार ना फटाके फोडता न आल्याने मज्जा, एक वर्ष काहीतरी वेगळं अनुभवून बघायला काय हरकत.' आजी नाती बोलत होत्या. तेव्हाच शेजारच्या समीरने मोठ्ठी लड लावली. त्या आवाजाने घाबरून रियाची लाडकी कुत्री गोल्डी तिच्या कुशीत शिरून बसली. आजीने संधीचा फायदा घेत म्हटले, 'गोल्डीसारख्या मुक्या प्राण्यांना पण आवाजाचा त्रास होतो. बघ कशी घाबरते ती आवाजाला! रिया, मी तुला एक टास्क देते. त्या गुगल बाबावर फटाक्यांचा शोध कधी, कोणी लावला, त्याचे फायदे-तोटे उद्या सकाळपर्यंत बघून ठेवायचे आणि मला नाश्त्याच्या वेळी सांगायचे. चल आता फ्रेश हो बघू !'

राजेश आणि नंदिनी आल्यावर आजीने शेतावरच्या दिवाळीचा प्लॅन चतुराईने त्यांना पटवून दिला. रिया आणि आजी रमा एकादशीलाच जातील आणि दोन दिवसांनी हे दोघे येतील असे ठरले. हुशार आजीने मोबाईलवर पटापट सूचना देऊन तिथल्या जय्यत तयारीसाठी सूत्रे हलवली. गावाला जाताना पळती झाडे, निसर्ग वाचन शिकता-शिकवता दोघींच्या गप्पा सुरू होत्या. आजी म्हणाली, 'रिया तुला माहिती आहे ना समुद्र मंथनाची कथा! त्यातील कामधेनूला स्मरून सुखसमृद्धीसाठी वसुबारसला गोधनाचे पूजन करून, दिवाळीचा पहिला दिवस साजरा होतो. पूर्वीच्या काळी गार्यींवरून श्रीमंती गणल्या जायची. दुसरा दिवस धनत्रयोदशी या दिवशी आरोग्य देवता श्रीधन्वंतरी यांची पूजा करून उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली जाते. धणे-गुळाचा विशेष नैवेद्य दाखवण्यात येतो. थंडीची चाहूल म्हणजेच ऋतूबदलाची नांदी तेव्हा आरोग्य रक्षणार्थ काही खास दक्षता घेण्याची सुरुवात दिवाळीने होते. नरक चतुर्दशीला अभ्यंग स्नान करून शरीराला तेल-उटणे लावतात. पण, हल्ली दिवाळी कृत्रिम झगमगाटाची झाली आहे आणि सततच्या गरजेपेक्षा जास्त खरेदीने खऱ्या दिवाळीचा आनंदसुद्धा लाभत नाही तुमच्या पिढीला! प्रचंड धूर ओकणारे, कानठळ्या बसवणारे फटाके, शोभेसाठी चकचकीत पॅकिंग पेपरध्ये पॅक केलेले गिफ्ट्स काय अगदी किल्लासुद्धा रेडीमेड! हे सगळं पर्यावरणासाठी घातक ठरतंय बरं बेटा! आताची दिवाळी साजरी करताना धन संपदेचं खऱ्या अर्थाने पूजन करण्याऐवजी पर्यावरणाची म्हणजेच निसर्ग संपदेची हानी करतोय आपण, म्हणूनच 'पर्यावरणपूरक दिवाळी'चा सुंदर विचार रुजवायचा प्रयत्न तुमच्या टीचर करत आहेत. तुम्हा मुलांना लगेच ते पटणार नाही पण रुजेल हळहळू ! या अशा खरेदीमुळे शहरात दिवाळी खरेदीसाठी सगळीकडे गर्दीने फुललेले रस्तेच दिसतात बघ!' आजीने असे म्हणताच रिया म्हणाली,'गावात धुळीने माखलेले होय ना!' दोघीही खळाळून हसल्या. धुळीचा रस्ता न लागताच गाडी शेतावरच्या टुमदार बंगल्यासमोर उभी राहिली आणि रिया आश्चर्यचकितच झाली.

हिरव्या-सोनेरी वैभवाने नटलेल्या शेताने तिला हळूच साद घातली. बंगल्यासमोर झेंडूच्या फुलांचे ढीग स्वागताला सज्ज होते. आंब्याच्या पानांचे तोरण शोभा वाढवत होते. नंदूच्या मुली आणि मैत्रिणी गाणी म्हणत हार करत होत्या. तेवढ्यात कुंभारीण काकी टोपल्यात पणत्या घेवून आल्या. आजीने चांगल्या दोन डझन पणत्या घेतल्या. बांबूचा सुंदर आणि मोठ्या आकाराचा आकाशदिवा आणि रोषणाईसाठी बांबूच्या सुरेख दीपमाळा गावातल्याच बांबू कारागिराकडून नंदू घेऊन आला. ती सगळी तयारी बघून रिया आनंदली. नंदूच्या बायकोने गावातील सखीला सोबत घेऊन सगळे पदार्थ आजीच्या देखरेखीत हौशीने घरी करून घेतले. त्याचा तो खमंग दरवळ घरभर 'दिवाळी आली दिवाळी' असे सांगत होता.

वसुबारसचे गाई वासराचे पूजन, गरमागरम ज्वारीच्या भाकरीचे केळीच्या पानावर वाढलेले जेवण रियाला खूपच आवडले. गोमयावर सारवलेल्या अंगणात पांढरी रांगोळी सुंदर दिसत होती. त्यात रंग न भरता फुलांच्या पाकळ्यांनी सजविण्याचे काम आजीने मुलींना दिले. 'अभ्यंग स्नान...दिवाळी पहाट, दारी रांगोळी अन् पणत्यांचा थाट!' आजीने घातलेला पर्यावरणपूरक दिवाळीचा हा घाट आनंद देणारा ठरला. 'आजी, आता उद्या काय करायचं गं?' आजी म्हणाली,'उत्तम आरोग्यासाठी धन्वंतरी पूजन! आरोग्यं धन संपदा' प्रमाणे 'निसर्ग धन संपदा' ही सुद्धा संकल्पना म्हणून स्वीकारून भावी पिढीत रुजवू या म्हणून तुला इथे घेऊन आले बघ! नैसर्गिक संपदा अनमोल असल्याने ती जपून वापरणे आवश्यक आहे. जल आणि वायू प्रदूषणमुक्त निसर्गास हातभार लावणे, हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. होय ना!' 'अय्या हो! आमच्या लेसनमध्ये पण दिले आहे हे! हो ना! मग यंदापासून धनत्रयोदशीस तेरा प्रकारच्या धनवृद्धीसाठी प्रार्थना करायला हवी. आरोग्य, निसर्ग, लक्ष्मी (आर्थिक सुबत्ता) या तीन सोबतच उत्तम मैत्र, नातेबंध, सद्गुण, संस्कार असे सुयोग्य आपापले अजून दश वैभवी धन वाढवून जीवन समृद्ध केले तर! ही दिवाळी आनंदाच्या दीपमाळींनी आयुष्य प्रकाशमय करेल.'

दोन दिवसांत चिखलामातीच्या स्पर्शात चिंब न्हाऊन इतका सुंदर किल्ला केला रियाने की, आई बाबा आल्यावर बघतच राहिले.

या सगळ्या गडबडीत ती फटाक्यांचे विसरूनही गेली. पण, गावातील मुलांनी आणले होते भरपूर फटाके! मग सगळ्यांनी मिळून मोकळ्या जागेत आजीच्या सूचनेप्रमाणे थोडेच फटाके फोडले. शहराच्या तुलनेत मोकळी जागा असल्याने धूर कमी झाला तरी झालाच. आजीने मग रियाला फटाक्यांच्या शोधाची माहिती सांगायला लावली व स्वतः दुष्परिणामांची माहिती सांगितली. आजीने विचारलं, 'आपल्या मूळ संस्कृतीचा भाग नसलेले पर्यावरणास हानिकारक फटाके सांगा बरं फोडायला हवेत का?' सगळ्यांनी एकमेकांकडे बघत नकोच फोडायला म्हटले!

रियाच्या मनात लक्ष्मी पूजनाला वाड्याच्या कानाकोपऱ्यात जागोजागी पणत्या लावलेल्या! कृत्रिम झगमगाट अजिबात नसलेला दीप सोहळा पिंगा घालू लागला. आजच निळ्या अंबरी लक्ष लक्ष दीप उजळत आहेत, असे वाटत होते. खाली वर दीपोत्सवी तेजात संपन्न झालेले लक्ष्मीपूजन म्हणजे तिला आनंद उत्सवच वाटला.'अशी ही पर्यावरणस्नेही आनंदी दिवाळी नेहालाही खूप आवडेल आजी,' रिया आनंदून म्हणाली.

'हो गं तुझ्यासारखाच हा आनंद अनेकांना मिळावा म्हणून पुढच्या वर्षीपासून निसर्गस्नेही दिवाळी आपल्या शेतात साजरी करण्याचा छोटा पर्यटन उद्योग म्हणून फटाक्यांनी हात भाजलेल्या या नंदू आणि त्याच्या पत्नीला ही दिवाळी भेट देऊ या. काय नंदू करणार का उद्योग?'

'हो काकू ! नक्की करणार.

रिया म्हणाली,'आजी, किती छान! म्हणजे दरवर्षी अशी मस्त, आनंदी दिवाळी साजरी करायला मिळेल सगळ्यांना.'

# व्हेनेझुएलाची 'आयर्न लेडी' मारिया

लॅटिन अमेरिकेतील अनेक देशांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तानाशाहीपासून लोकशाहीकडे प्रवास केला. पण, व्हेनेझुएलामध्ये हा प्रवास अत्यंत कठीण ठरला. या देशात तेलसंपत्ती असूनही नागरिकांना भूक, बेरोजगारी आणि भ्रष्टाचाराचा सामना करावा लागतो आहे. अशातच नॉर्वेच्या ओस्लो शहरातून आलेल्या नोबेल कमिटीच्या निर्णयाने व्हेनेझुएलाच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहावे, असे काही घडले असून जगभरात एक नवीन आशेची किरण उगवली आहे. व्हेनेझुएलाच्या धैर्यवान विरोधी नेत्री मारिया कोरिना माचाडो यांना २०२५ चा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला. हा पुरस्कार फक्त एका व्यक्तीला मिळालेला सन्मान नाही तर, तानाशाहीच्या अंधारातही लोकशाहीचा नंदादीप तेवत ठेवणाऱ्या लाखो वेनेझुएलियन नागरिकांच्या धैर्याचा सन्मान आहे. वाढत्या दडपशाहीत, अडथळ्यांमध्ये आणि जीवाला असलेल्या धोक्याला न घाबरता व्हेनेझुएलाच्या 'आयर्न लेडी' मारिया कोरिना माचाडोने लोकशाही, न्याय आणि शांततेसाठी आपली लढाई थांबवली नाही; उलट त्यांच्या संघर्षाने जगाला दाखवून दिलं की, धैर्य, इच्छाशक्ती आणि नि:स्वार्थ नेतृत्वानेच वास्तव बदल शक्य होतो.



दीप्ती राखुंडे/ ९५०३९१०८२२

मारिया कोरिना माचाडो यांचा जन्म १९६७ मध्ये काराकासमध्ये एका समृद्ध इंजिनिअर आणि व्यावसायिक कुटुंबात झाला. त्यांनी औद्योगिक अभियंता म्हणून आपले शिक्षण पूर्ण केले. पुढचे आयुष्य आपल्या मनासारखे जगता येत असतानाही त्यांनी जनसेवेचा वसा हाती घेतला. २००० पासून ह्यूगो चावेझच्या तानाशाहीने व्हेनेझुएलाच्या लोकशाहीवर आघात केला तेव्हा, मारिया यांनी राजकारणात आपले पहिले पाऊल टाकले. २०१० मध्ये त्यांनी लोकसभा निवडणुकीत विजयी होऊन आपली ताकद सिद्ध केली पण, २०१४ मध्ये निकोलस मादुरोच्या नेतृत्वाखालील प्रशासनाने त्यांना पदावरून हटवले. मात्र, मारिया येथेच थांबल्या नाहीत. त्यांनी वेनेते व्हेनेझुएला पार्टीची स्थापना केली आणि २०१७ मध्ये सोय व्हेनेझुएला गठबंधन तयार केले, जे विरोधी पक्षांना एकत्र आणणारे सूत्र बनले. या काळात त्यांना राजकीय प्रतिबंध, प्रवासावर बंदी आणि अनेक वेळा अटक, धमक्यांचा सामना करावा लागला. तरीही, त्यांनी आपल्या धैर्याने आणि दृढनिश्चयाने लोकशाहीसाठी लढा चालू ठेवला.

२०२४ च्या राष्ट?पती निवडणुकीत झालेल्या गोंधळानंतर मारियाने आंतरराष्ट?ीय समुदायाचे लक्ष वेधले. स्वतंत्र निवडणुकांची मागणी केली, मानवी हक्क उल्लंघनांवर प्रकाश टाकला आणि अमेरिका तसेच, युरोपमधील नेत्यांचे समर्थन मिळवले. व्हेनेझुएलामध्ये चावेज-मादुरोच्या शासनाने अर्थव्यवस्था उध्वस्त केली. लाखो नागरिक उपासमारीच्या उंबरठ्यावर आले पण, मारियाची आवाज लोकांना एकत्र आणण्यासाठी सशक्त ठरली. जानेवारी २०२५ मध्ये काराकासच्या चाको परिसरात आयोजित रॅलीत मारिया तीन महिन्यांनंतर पहिल्यांदा सार्वजनिक दिसल्या. ही रॅली संपल्यावर मादुरोच्या सुरक्षा दलाने त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला पण, नागरिकांनी आपली जीव धोक्यात टाकून मारियाला सुरक्षित ठेवले. ही घटना जागतिक स्तरावर नागरिक साहसाचे प्रतीक बनले आणि नोबेल कमिटीने त्यांचे कौतुक केले.

मारिया कोरिना माचाडो यांचा प्रभाव व्हेनेझुएलाइतपत मर्यादित न राहता जागतिक स्तरावर नोंदला गेला आहे त्यांच्या या कार्यामुळेच! २०१८ मध्ये बीबीसीच्या जाहीर केलेल्या १०० महिलांच्या यादीत त्यांचा समावेश करण्यात आला. यानंतर, २०२५ मध्ये टाइम मॅगझिनच्या 'वर्ल्ड्स् मोस्ट इन्फ्लुएंशियल पीपल' यादीत त्यांचा समावेश हा त्यांच्या जागतिक प्रतिष्ठेचा आणखी एक पुरावा आहे. या दोन्ही यादीत त्यांचा समावेश केवळ सन्मान नाही तर, जगाला दाखवते की, मारियाचे नेतृत्व, नि:स्वार्थ समर्पण आणि लोकशाहीसाठी केलेले कार्य ही जागतिक उदाहरण आहे. यामुळे, मारियाची ओळख केवळ व्हेनेझुएला किंवा लॅटिन अमेरिकेपुरती मर्यादित न राहता, जागतिक स्तरावर लोकशाही आणि शांतीसाठी लढणाऱ्या स्त्रियांच्या प्रेरक प्रतिमेत बदलली आहे. मारिया कोरिना माचाडो यांना मिळालेला नोबेल शांती पुरस्कार त्यांच्या व्यक्तिगत सन्मान नसून, संपूर्ण दक्षिण अमेरिकेत नागरिक साहसाचे प्रतीक आहे. त्या व्हेनेझुएलाच्या पहिल्या महिला आणि संपूर्ण दक्षिण अमेरिकेतील पहिल्या स्त्री म्हणून या सन्मान प्राप्त करणाऱ्या ठरल्या आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराची रक्कम सुमारे ११ दशलक्ष स्वीडिश क्रोन म्हणजे १.२ दशलक्ष डॉलर्स असून, १० डिसेंबर रोजी ओस्लो येथे त्यांना तो प्रदान केला जाईल.

शेवटी मारिया कोरिना माचाडो यांचा प्रवास म्हणजे शांतता, लोकशाही आणि न्यायासाठी केलेली लढाई केवळ एका व्यक्तीची नाही तर, ती लाखो लोकांच्या धैर्याची, संघर्षाची आणि इच्छाशक्तीची कहाणी आहे. व्हेनेझुएलाची ही कन्या आपल्याला शिकवते की, धैर्य, संघर्ष आणि नि:स्वार्थ नेतृत्व यामुळेच खरा बदल शक्य होतो. मारिया कोरिना माचाडो हे लोकशाहीचे रक्षण करणारे आणि शांततेचे स्थापत्य घडवणारे जिवंत उदाहरण आहेत, जे संपूर्ण जगासाठी प्रेरणा आहेत.

## अभिजात अमृत

प्रा. सुनंदा पाटील/ ८४२२०८९६६६

# मराठी भावगीतांची शताब्दी

महाराष्ट्रातील भावगीत गायनाची परंपरा जुनी आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी म्हणजेच १९०५ ते १९०९ या दरम्यान श्री. रानडे, जी.एन.जोशी, लीला लिमये प्रभृतींनी रागदारीची साथ न सोडता, कविता चालीवर म्हणायच्या असे धोरण ठेवले. याला 'भावपदे' हा शब्द रूढ झाला. कवी दत्त ?(१८७५ ते ९९) आपल्या कविता हार्मोनियम, सतार आणि तबल्याच्या साथीने गात असत असा उल्लेख आढळतो. पुढील काळात संजीवनीबाई मराठे, सोपानदेव चौधरी हे आपल्या कवितांना चाली देऊन सुरेख आवाजात गात असत.

अलिकडेपर्यंत कवी ना.घ. देशपांडे यांची कविता 'रानारानात गेली बाई शीळ' जी जी.एन. जोशी यांनी संगीतबद्ध करून गायली होती, तेच मराठी पहिले भावगीत समजले जात होते. १९३२ मध्ये हे गाणे ध्वनिमुद्रिकेच्या स्वरूपात लोकांच्या पुढे आले. ध्वनिमुद्रिका येण्यापूर्वीच हे गाणे जी.एन. यांनी गाऊन लोकप्रिय केले होते. पण, राम गणेश गडकरी रचित बापूराव पेंढारकर (भालचंद्र पेंढारकर यांचे वडील) यांनी गायलेले व ध्वनिमुद्रित झालेले,'राजहंस माझा निजला' हे पहिले मराठी भावगीत असल्याची माहिती आहे. 'रानारानात'च्या आधी एप्रिल १९२६ मध्ये एचएमव्हीने या गाण्याची ध्वनिमुद्रिका काढली होती. त्याच्या बऱ्याच प्रतीही काढल्या गेल्या. या गाण्याची ध्वनिमुद्रिका म्हणजेच प्रथम रेकॉर्डिंग केलेले भावगीत 'राजहंस' हेच आहे, असे कळते. पिलू रागातील हे पद प्रथम गीत! त्यामुळे या माहितीनुसार भावगीताच्या या परंपरेला एप्रिल २०२६ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत.

मराठी भावगीतांचा हा प्रवास पुढे गजाननराव वाटवे यांनी समर्थपणे चालविला आणि मराठीतील कवितांना चाली लावून ती गाणी लोकांपर्यंत पोहोचवली. त्यांच्या कार्यक्रमांना रसिकांचा अमाप प्रतिसाद मिळत असे. गजानन वाटवे आणि भावगीत हे एक अतूट नातं/अतूट समीकरण



झालं. गणेशोत्सवात वाटवे यांनी भावगीत गायनाचे अनेक कार्यक्रम केले. कुणीही पाय नका वाजवू, गगनी उगवला सायंतारा, मोहुनिया तुजसंगे, यमुनाकाठी ताजमहाल, राधे सैल तुझा अंबाडा, रानात सांग कानात, वारा फोफावला ही भावगीते अतिशय लोकप्रिय झाली. इतकी की, आजही ती श्रोत्यांच्या ओठावर आहेत. या स्वरयात्रेत बापूराव पेंढारकर यांच्यापासून तर अनेक गायक/गायिका संगीतकारांसह अनेक कवी/गीतकार यांचेही अमूल्य योगदान आहे. नंतरच्या अनेक गायकांनी, गीतकारांनी आणि संगीतकारांनी हा प्रवास सुरूच ठेवला.

यात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मराठी भावगीतांचा हा ठेवा मोरेश्वर पटवर्धन आणि वामन देशपांडे यांनी 'गाणी मनातली आणि गळ्यातली' या शीर्षकाखाली पुस्तक रूपाने रसिकांपुढे आणला. साहित्य प्रसार केंद्राने याचे ११ भाग प्रकाशित केले. या सर्व भागांना वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. पुढे आणखी तीन भागांची भर घालून, १४ भाग प्रकाशित केले आहेत. वृत्तपत्रात माझ्या वाचनात हे आले. फोन केल्यानंतर खुद्द मोरेश्वर पटवर्धन यांनी हाच १४ पुस्तकांचा संच नागपूरला माझ्या पत्त्यावर पाठवला होता. पैसे मी मागाहून पाठवले. मला असं वाटतं की, हा एक अमूल्य ठेवा आहे. याचं वैशिष्ट्य असं की, प्रत्येक पुस्तकात जी गाणी आहेत, त्याच्याखाली मूळ गायक, संगीतकार या सर्वांची नावे आहेत. यात गिरगावच्या रायकर यांनीही 'गोड गोड भावगीते ' तसेच काही अन्य प्रकाशकांनीही मराठी भावगीते प्रकाशित केली आहेत . भावगीताचा पुढील प्रवास सांगण्यापूर्वी ज्या भावगीताने इतिहास घडविला ते 'रानारानात गेली बाई शीळ' हे गीत आपल्यापुढे ठेवते.

### रानारानात गेली बाई शीळ ॥

राया तुला रे काळ येळ नाही,  
राया तुला रे ताळमेळ नाही...  
थोर राया तुझा रे कुळशीळ ॥

वाहे झरा गं झुळझुळ वाणी,  
तिथे वाऱ्याची गोड गोड गाणी...  
तिथे राया तू उभा राहशील ॥

तिथे रायाचे पिकले मळे,  
वरी आकाश शोभे निळे...  
शरदाच्या ढगाची त्याला झील ॥

येड्यावानी फिरे रानोवना,  
जसा काही गं मोहन कान्हा...  
हासे जसा गं राम घननीळ ॥

- ना. घ. देशपांडे

अजून हा भावगीतांचा प्रवास संपलेला नाही. भावगीतांची रचना/लय/यती/धृवपद/कडवे ही माहिती शिवाय परंपरा याविषयी जाणून घेऊ या. पण, आज मी इथेच थांबते. आज धनत्रयोदशी! दिवाळीची सुरुवात झालेली आहे. दिवाळीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# वीरबाला कनकलता बरुआ

अवघ्या १८ वर्षांचं आयुष्य लाभलेली ही वीरांगना खरंच असाधारण होती. तिच्या आयुष्याचा विचार करताना जाणवतं की, गुलामगिरीतून मुक्तीसाठी ज्यांनी प्राणांचं बलिदान दिलं ती खरंच देशाप्रतीच्या कर्तव्यासाठीच जन्मलेली असाधारण व्यक्तिमत्वं होती. प्रत्येक छोटा प्रांत या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होता. आसाम मधील छोटंसं गाव बारंगवाडी! इथे स्वातंत्र्याची धगधगती मशाल पेटवली ती तारुण्यात नुकतीच प्रवेशलेली कन्या कनकलता बरूआ!

'आम्ही कनकलता! कृष्णकांत बरूआ आणि करणेश्वरी देवी हे आमचे माता पिता! लहानवयातच आम्ही देशाच्या गुलामगिरीने अस्वस्थ झालो. लहानपणीच आमची आई गेली. पित्याने दुसरं लग्न केलं आणि काही कालावधीतच तेही गेले. आमची सावत्र आई मात्र खूपच चांगल्या विचाराची आणि समजूतदार! तिने आम्हाला सहकार्यच केलं पण, खरं आम्हाला सांभाळलं ते नाना नानींनी! देश प्रेमाचे पाठही आम्हाला त्याच काळात मिळाले. आमचे मामा युदुराम बोस आम्हाला घेऊन जायचे व्याख्यानांना! ते नेहमीच म्हणायचे,'बेटी कनका, आप अलग हो और हमारी इच्छा आहे की आप ऐसा कुछ करो जिससे बरूआ कुल का नाम रोशन हो।' ते असं का म्हणायचे कळत नव्हतं. पण अभ्यासापेक्षाही आम्हाला ज्योती प्रसाद अग्रवाल, विष्णुप्रसाद राभा यांची आवेशपूर्ण भाषणं आवडायची. त्या क्षणी ठरवलं की, आम्हालाही या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हायचंय, देशासाठी काही करायचंय, ब्रिटिशांना भारतातून हद्दपार करायचं. एक संधी मिळालीच. कदाचित आम्ही संपूनही जाऊ पण, वंदे मातरमचा घोष कानात घुमतोय. त्या प्रभात फेऱ्या, उत्स्फूर्त घोषणा, देशप्रेमाने भारलेले क्रांतीकारक हे सर्व बघितलं की, आमचाही अणुरेणू पेटून उठतो.

जिथे ब्रिटिशांचा युनियन जॅक फडकत असेल तिथून तो उतरवून आपला तिरंगा

शुभांगी गान/ ८६५७४२४०७१

फडकवायचा. मनात कधीपासून ही सुप्त इच्छा दडलेली होती. त्यासाठी आम्ही कमी का प्रयत्न केले? आझाद हिंद सेनेत भरती व्हायचं होतं पण, आम्ही अल्पवयीन म्हणून त्यांनी नकार दिला. आम्ही खूप दुःखी झालो. आमचे दादू आमच्यापेक्षा लहान भावाला स्वातंत्र्यलढ्यात भाग घेऊ देतात. पण, एक स्त्री म्हणून आम्हाला तशी परवानगी नाही. पण, आम्ही जाणार, आम्ही तयारी केलीच आमच्या मनाची! आम्ही मुक्ती वाहिनीत सम्मिलित होणार. त्याहीपेक्षा आत्मबलिदानी पथकात संमेलित होणार आणि आम्ही प्रचंड खुश झालोय. पुष्पा दासनी आम्हाला हा सन्मान दिलाय. आमच्यातला हा जोश बघून आम्हाला बीरबाला ही पदवीही दिली आणि दिली आम्हाला एक उत्तम संधी! आमच्या मनासारखी आमची बारंगवाडी, गोहपुर, तेजपूर सगळे प्रांत यात सहभागी होणार. या लढ्याचे नेतृत्व आम्ही करणार, आमचं मन-शरीर या आत्मबलिदानासाठी तत्पर झालं होतं. आमच्या पुष्पलता दास काय म्हणतात माहितीये,'अनेक महिला या आंदोलनात सहभागी झाल्या पण,



एक १७ वर्षांची युवती जेव्हा आत्मबलिदानी पथकात सामील होते तेव्हा अभिमानाने तिच्या मनातील देशाप्रतीची निष्ठा बघून अभिमानाने भरून येते.' शाबासकीची थाप त्यांनी आमच्या पाठीवर दिली आणि आमची मान किती उंचावली. २० सप्टेंबरला होणाऱ्या ध्वजारोहणासाठी गोहपूर गावात प्रचंड संख्येने लोक जमले होते आणि या मोर्चाचे नेतृत्व आम्ही करणार होतो. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम','ब्रिटिशों भारत छोडो, अपने वतन लौटो' आम्ही एका मागून एक नारे देत होतो.

संपूर्ण वातावरण वीरश्रीने भारलं होतं. पोलिस ठाण्यावर आपला तिरंगा फडकवायचा हे एकच उद्दिष्ट ठेवून आमचा मोर्चा पुढे सरकत होता. आम्ही वेळोवेळी मोर्चाचं मनोबल वाढवत होतो. समोर मावळतीच्या प्रकाशात आमचं लक्ष्य होतं, गोहपुर पोलिस स्टेशन! जमाव थांबला होता. पोलिसांची तुकडी बंदुकीचा निशाणा आमच्यावर साधून उभी होती. बस्स... पोलिस स्टेशनच्या आत प्रवेश करून तिरंगा फडकवायचा. मन अधीर झालं होतं. हातात तिरंगा घेऊन प्रांगणात प्रवेश केला. 'एक इंचही पुढे याल तर याद राखा. आमची गोळी प्राण घ्यायला तत्पर असेल. मागे फिरा! जनरल डायरला तुम्ही विसरले नसालच. हे राज्य आम्ही जिंकलंय,' ते गर्वाने बोलत होते. आता आमच्यातला संयम संपला होता. ते बोलत होते पण, आम्ही एक ज़ोशातच पुढे जात होतो. त्या अधिकाऱ्याला आम्ही एकच उत्तर दिलं,'हम युवतियों को अबला समझने की कोशिश ना करें। हम अपने कर्तव्य से विमुख हो नही सकते। असं म्हणत आम्ही तिरंगा घेऊन छतापर्यंत पोहोचलो. आणि, एक गोळी सरसरत आमच्या छातीत घुसली. वेदनेचा एक प्रचंड जाळ पण हातातला तिरंगा जमिनीवर पडू नये यासाठी कुडीत प्राण धरून ठेवले होते. तो तिरंगा जेव्हा आमच्या साथीदारांनी हातात घेतला तेव्हा आमचं शरीर अचेतन व्हायला लागलं. आजूबाजूने प्रचंड कोलाहल माजला होता. बंदुकीच्या गोळ्या वेगाने सरसावत होत्या. किंकाळ्या वातावरणाला भीतीदायक बनवत होत्या. आज आमची इच्छा अपूर्ण राहिली होती पण, हा लढा असाच चालणार होता. कोणीतरी या गोंधळातही ध्वज ठाण्यावर फडकवला होता. आमच्या नेत्रांनी तो क्षण टिपला आणि आपल्या सगळ्यांवर हा देश सोडून महाप्रवासाला निघालो होतो. कदाचित पुढचा जन्म आम्ही स्वातंत्र्यात घेऊ ही आशा घेऊनच आम्ही निघालो...अंतिम प्रवासाला!

## रानभाज्यांच्या जगात

संगीता ठलाल/७८२१८१६४८५

# पोषक घोर भाजी

निसर्गाच्या सान्निध्यात राहून वाढणाऱ्या सर्व भाज्या पौष्टिक आणि मानवी शरीरासाठी लाभदायक असतात. अशी एक विशेष भाजी जिला झाडीबोलीत घोरची भाजी या नावाने ओळखले जाते. शुद्ध मराठीत घोळीची भाजी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भाजीची पानं लांब-रुंद आणि जाडसर असतात. ही भाजी जमिनीवर पसरते. या भाजीची पेरणी करताना वाफे तयार करतात. पण, मिरचीची लागवड केलेल्या जागेत घोरभाजी विशेषत्वाने उगवते. या भाजीवर कोणत्याही कीटकनाशकांची फवारणी केली जात नाही. पण, ज्या वाफ्यात तिची पेरणी केली जाते तेथे पाणी दिले जाते. घोर भाजी बरेचदा आठवडी बाजारात जानेवारी ते मे महिन्यापर्यंत विकत मिळते. ही भाजी कोवळी आणि लुसलुशीत असते. त्या पानांवर मनमोहक आणि हलकीशी चमक असते. विदर्भाच्या गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा या जिल्ह्यांत घोरभाजीचे चविष्ट आरन(आळण) बनविले जाते. घोळ आणि पालक एकत्र चिरून, डाळभाजी करण्यासाठी तिचा उपयोग केला जातो. घोरच्या भाजीचे आळण बनविण्याची पद्धत सोपी आहे. उपटून आणलेली घोर पाण्याने स्वच्छ धुवून, बारीक चिरून घेतात. एका पातेल्यात थोडे तेल घालून जिरं-मोहरी, बारीक चिरलेला कांदा किंवा कांद्याची पात टाकून खमंग फोडणी देतात. नंतर त्यात आलं-लसणाचं वाटण घालून छान परतून घेतात. बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या घालून त्यात घोरभाजी घालतात. सर्व मिश्रण छान एकजीव झाल्यावर त्यात थोडी हळद, चवीनुसार मीठ, एक चमचा तिखट आणि एक लालबुंद टोमॅटो चिरून टाकतात. थोडं पाणी घालून ते मिश्रण परत शिजवून घेतात. भाजी शिजल्यावर दोन पेले पाणी घालून,



छान उकळल्यावर थोडंसं तांदळाचं पीठ पातळ भिजवून त्यात टाकतात. वर कोथिंबीर घालून गॅस बंद करायचा. आळणाचा रंग मोहक असतो आणि चविष्टसुद्धा असते. गरमागरम भात आणि टम्म फुगलेल्या भाकरीसोबत हे आरण म्हणजे मेजवानी! आरणाची चव एखाद्या मसालेदार पदार्थाला लाजवेल अशी चविष्ट ! पचनक्रियेसाठी सुरळीत ठेवण्यासाठी लाभदायक असलेली ही भाजी जनावरंसुद्धा आवडीने खातात. मग आगामी हंगामात घोरभाजीचं आरण नक्की करून बघा.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महापालिकेच्या स्वच्छता कार्यात नागरिकांचे सहकार्य अपेक्षित : प्रभाग अधिकारी एस बी तडवी

## स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फाउंडेशनच्या वतीने रेल्वे स्टेशन परिसरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप




अहिल्यानगर : महानगरपालिका प्रशासनाकडून नागरिकांना विविध नागरी व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. त्याचबरोबर केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून विविध उपक्रम योजना देखील राबविण्यात येतात. महापालिकेच्या दैनंदिन स्वच्छता कार्यामध्ये व उपक्रमांमध्ये नागरिकांचे सहकार्य व सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचे प्रतिपादन बुरुडगाव प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी एस. बी. तडवी यांनी केले.

स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनच्यावतीने रेल्वे स्टेशन परिसरातील मनपा स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप श्री तडवी यांचे हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संजीवनी कॉलनीचे अध्यक्ष श्रीकृष्ण लांडगे, जेष्ठ सदस्य शांतीलाल गुगळे, स्व. रामलालजी ललवाणी मेमोरियल फौंडेशनचे महावीर ललवाणी, अभय ललवाणी, मुकादम सागर जेधीया, विजय भोसले व स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अभय ललवाणी म्हणाले की, महापालिका स्वच्छता कर्मचारी दररोज शहर परिसर स्वच्छ ठेवण्याचे कार्य करीत असतात. दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दरवर्षी स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते. त्यामुळे महापालिका प्रशासन व नागरिक यांच्यात समन्वय निर्माण होतो. नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात सुलभता येते. ललवाणी परिवाराच्यावतीने स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी फराळ वाटपाचा उपक्रम हा कौतुकास्पद असल्याचे यावेळी प्रभाग अधिकारी एस.बी. तडवी यांनी सांगितले.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक प्रा. आबासाहेब देशपांडे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक प्रा धुंडीराज उर्फ आबासाहेब नागोराव देशपांडे यांचे आज शनिवार रोजी पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होत.

प्रा.देशपांडे हे श्री शिवाजी महाविद्यालयातून विज्ञानाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. तेथून ते सेवानिवृत्त झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते लहानपणापासून स्वयंसेवक होते. जिल्हा कार्यवाह, विभागीय कार्यवाह म्हणून देशपांडे यांनी दायित्व सांभाळले होते. आणीबाणीच्या काळात ते नाशिक येथील कारागृहात १८ महिने बंदिस्त होते. संघ परिवारातील सहकार भारती या संघटनेचे ते क्षेत्रीय संघटनमंत्री म्हणून कार्यरत होते. सहकार क्षेत्रातील नामवंत जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थाचे ते संस्थापक सदस्य, अध्यक्ष होते. अतिशय शांत, संयमी, मृदु भाषी असं व्यक्तिमत्व असणारे प्रा देशपांडे हे संघ परिवारात आबासाहेब म्हणून सर्व दूर परिचित होते. दरम्यान प्रा. देशपांडे यांच्या पश्चात एक मुलगा ,दोन मुली, सून जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## आजी व माजी सैनिकांसाठी तालुकानिहाय बैठकांचे वेळापत्रक

छत्रपती संभाजीनगर,दि.१७ - जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आजी, माजी सैनिक व त्यांच्या अवलंबिताच्या अडी-अडचणी सोडविण्याकरीता दर सहा महिन्यांनी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली गटविकास अधिकारी,पोलीस अधिकारी, माजी सैनिक, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्या गठीत समितीची होणारी बैठक तालुका पातळीवर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित गावाच्या तहसिल कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील

तालुकानिहाय बैठकांचे नियोजन याप्रमाणे-

सोमवार दि.३ नोव्हेंबर ता.वैजापूर, वेळ दुपारी १२ वा. तहसिल कार्यालय, ता.वैजापूर, सोमवार दि.१० नोव्हेंबर ता. कन्नड, वेळ दुपारी १२ वा. तहसिल कार्यालय, कन्नड, बुधवार दि.१२ नोव्हेंबर ता. खुलताबाद वेळ दुपारी १२ वा. तहसिल कार्यालय, ता. खुलताबाद, मंगळवार दि.१८ नोव्हेंबर ता. फुलंब्री वेळ दुपारी १२ वा. तहसिल कार्यालय, ता.फुलंब्री, गुरुवार दि.२० नोव्हेंबर ता. छत्रपती संभाजीनगर दुपारी १२ वा. तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व संबंधित तालुक्यातील आजी व माजी सैनिकांनी बैठकीच्या रोजी वेळेवर दिलेल्या ठिकाणी हजर रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे. अधिक माहिती साठी दुरध्वनी क्र. ०२४०-२३७०३१३ येथे संपर्क साधावा.

## पंधरा वर्षांखालील मुलांमध्ये फटाक्यांमुळे होणाऱ्या इजेसाठी मोफत सल्ला व शस्त्रक्रिया




छत्रपती संभाजी नगर :- एएसजी आय हॉस्पिटलने दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक बांधिलकीतून एक विशेष उपक्रम हाती घेतला आहे. पंधरा वर्षांखालील मुलांना फटाक्यांमुळे झालेल्या डोळ्यांच्या दुखापतीसाठी मोफत सल्ला आणि आवश्यक शस्त्रक्रिया उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

ही सेवा १५ ते २४ ऑक्टोबर २०२५ दरम्यान एएसजी आय हॉस्पिटलच्या सर्व केंद्रांवर राबवली जाणार आहे. रुग्णांना फक्त फार्मेसी, ॲनेस्थेसिया आणि ऑप्टिकल सेवांचा खर्च उचलावा लागेल

फटाके फोडताना सुरक्षा चष्मा किंवा गॉगल्स वापरावेत ,फटाके लावताना किमान पाच ते सहा मीटरचे अंतर ठेवावे ,मुलांना मोठ्यांच्या देखरेखीशिवाय फटाके हाताळू देऊ नयेत, घरगुती किंवा बेकायदेशीर फटाके टाळावेत आणि प्रमाणित पर्यावरणपूरक फटाके वापरावेत फटाके पेटवताना ते हातात धरू नयेत लांब अगरबत्ती किंवा पणतीचा वापर करावा. फटाके हाताळल्यानंतर हात स्वच्छ धुवावेत न फुटलेल्या फटाक्याजवळ जाऊ नये त्यांना पाण्यात बुडवून निष्क्रिय करावे अपघात झाल्यास डोळे चोळू नयेत किंवा धुऊ नयेत त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा

तातडीच्या मदतीसाठी टोल फ्री क्रमांक १८०० १२१ १८०४ वर संपर्क साधावा आव्हान केले आहे.

## कै.बाबुरावजी काळे यांना अभिवादन




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१८ ऑक्टोबर

कै.आप्पासाहेब बाबुरावजी काळे यांच्या ४० व्या स्मृती दिनी छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय क्रिडा संकुल स्टेडीयमला लोकनेते कै.बाबुरावजी काळे यांचे नाव द्यावे अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली असल्याचे प्रतीपादन करतांना जेष्ठ सामाजीक कार्यकर्ते व माजी सदस्य विलासचंद्र काबरा यांनी केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पदी जेष्ठ इंग्रजी लेखक शेषराव चव्हाण हे होते तर प्रमुख वक्ते व पाहुणे दादा गोरे,अजिंठा शिक्षण संस्थाचे सचिव प्रकाश काळे,प्राचार्य संजय मुन,रोहीत काळे,शिवदीप काळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

## सेवांची गुणवत्ता व लोकाभिमुखता वाढवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर-प्रशासनामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांच्या गुणवत्तेमध्ये वाढ, लोकाभिमुखता आणि पारदर्शकता वाढवा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबवा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान स्पर्धा व जिल्हा समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. महापालिकेचे अपर आयुक्त रणजीत पाटील, जिल्हा परिषदेचे सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, पैठण फुलंब्री उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, उपजिल्हाधिकारी सुचिता शिंदे, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, शिक्षण विभागाचे उपसंचालक प्रकाश मुकुंद, कृषी विभागाचे उपसंचालक गवळी, जिल्हा दुग्धविकास विभागाच्या सहायक आयुक्त मनीषा हराळ तसेच इतर विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. नागरिकांना लोकाभिमुख सुविधा उपलब्ध करून ई ऑफिस द्वारे जास्तीत जास्त सेवा ह्या तात्काळ उपलब्ध करून देण्यात याव्या. नाविन्यपूर्ण उपक्रमाची दखल स्पर्धेमध्ये घेतली जावी यासाठी महसूल विभागाबरोबरच जिल्हा प्रशासन, महानगरपालिका ,पोलीस प्रशासन, शिक्षण, आरोग्य विभाग कृषी ,उद्योग या विभागांनी देखील आपले नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावे. छत्रपती संभाजीनगर हा जिल्हा विकासाच्या दृष्टिकोनातून विविध उपक्रम राबित आहे यामध्ये प्रशासनाने केलेल्या उपक्रमाची दखल शासन स्तरावर व्हावी हा यामागचा हेतू असून प्रत्येक विभागामार्फत पथदर्शी कार्यक्रमाची अंमलबजावणी होत आहे त्या उपक्रमाच्या संदर्भात सविस्तर सादरीकरण आणि प्रस्ताव सादर करावेत. याबाबत असणाऱ्या तांत्रिक त्रुटी ही दूर करून संबंधित कार्यालय प्रमुखांनी याबाबतची काळजी घ्यावी असे निर्देश स्वामी यांनी दिले.

### कलम १६३ अंतर्गत मनाई आदेश

छत्रपती संभाजीनगर - काही गट आणि विशेष करुन तृतीयपंथी एकट्याने किंवा एकत्रितपणे एकत्र येऊन लग्न, किंवा इतर धार्मिक प्रसंगी किंवा जन्म- मृत्यू इत्यादी ठिकाणी, सणासुदीच्या प्रसंगी किंवा विशिष्ट धार्मिक कार्यात किंवा कुटुंबातील जन्म-मृत्यू प्रसंगी जाऊन पैशांची मागणी करतात. तसेच ट्रॉफिक जंक्शन, रोडवर इ. विविध ठिकाणी फिरत आहेत आणि वाहनचालक आणि इतर जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना त्रास देऊन पैसे देण्यास भाग पाडत आहेत, याची पोलीस प्रशासनाचे गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारचे उपद्रव रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये अन्वये पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येत्या दि.१६ ऑक्टोंबर ते दि.१५डिसेंबर पर्यंत असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहेत.

## वर्षावास सांगता सोहळा भक्तिभावात पार, बौद्ध बांधवांची मोठी उपस्थिती

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१८ ऑक्टोबर - त्रिरत्न बुद्ध विहार,येथे शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी आयोजित वर्षावास सांगता समारंभ मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. या वेळी परिसर जयभीम घोषणांनी आणि बौद्ध वंदनांनी दुमदुमला होता.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कल्पना मणवर आणि रमेश धनवे यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजाराम बडगु, किशोर बजरंग जौहरे, अशोक कांबळे, राजेंद्र पगारे यांनी उपस्थित राहून बौद्ध धम्माच्या तत्त्वांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला कार्यकारिणीचा विशेष सहभाग लाभला. शैलजा कांबळे, रत्नाताई शेखरवार, प्रतिभा पगारे, मालन कांबळे, कमलताई ढेकळे आणि माया जाधव यांनी एकत्रितपणे नियोजनाची जबाबदारी सांभाळली.

सोहळ्याला प्रदीप पगारे, शंकर मणवर, राजू शिंदे, माणिक शिंदे, विजय पगारे, रवींद्र शिंदे, शिवाजी जाधव, प्रविण मणवर, आनंद मणवर, कालीनाथ मणवर, संदीप शिंदे, भास्कर पगारे, विजया पगारे, सुमन मणवर आदींसह अनेक बौद्ध बांधव उपस्थित होते.

या वेळी धर्मप्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजकार्यकर्त्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांनी वातावरण प्रसन्न झाले. उपस्थितांनी कार्यक्रमाचे आयोजन व शिस्तबद्ध पार पडलेला सोहळा याबद्दल समाधान व्यक्त केले.

## कन्नड अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळास अटकपूर्व जामीन

तभा वृत्तसेवा

कन्नड- दि.१८ऑक्टोबर - कन्नड अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाविरुद्ध दाखल झालेल्या एम.पी.आय.डी. आणि बड्स कायद्यांतर्गत गुन्ह्यात सत्र न्यायालय, संभाजीनगर यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

सहकार विभागाच्या अहवालानुसार, २०२१-२२ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाने विनातारणी कर्जवाटप, मंजूर नसलेली एकरकमी परतफेड योजना आणि लिंकिंग शेअर्समध्ये अनियमितता करून ८७ लाखांहून अधिक रकमेचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, संभाजीनगर ग्रामीण यांनी २ सप्टेंबर रोजी भा.द.वि. कलम ४०९, ४०६, ४२०, ३४ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम १४६, एम.पी.आय.डी. कायदा १९९९ चे कलम ३,४ आणि बड्स कायदा २०१९ चे कलम २१,२२ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. संचालक मंडळातील सदस्यांनी ॲड. अभिषेक पाटील बनकर यांच्या माध्यमातून जामीन अर्ज दाखल करत न्यायालयास सांगितले की, कार्यवाही आकसापोटी असून सर्व कर्जरकमा व्याजासह वसूल झालेल्या आहेत. संस्थेला कोणताही आर्थिक तोटा झालेला नसल्याने एम.पी.आय.डी. कायद्याची अंमलबजावणी योग्य ठरत नाही, असा युक्तिवाद करण्यात आला. प्रकरणातील युक्तिवाद ऐकून न्यायाधीश एम.एस. तिवारी यांनी संचालक मंडळातील सदस्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला.

## कंधार व लोहा शहरात आज ११ कोटींच्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा


### आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून कंधार लोहाच्या सुंदर शहराकडे वाटचाल

कंधार : कंधार आणि लोहा शहराचा कायापालट करण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे सातत्याने पाठपुरावा सुरू असून याच अनुषंगाने आज लोहा आणि कंधार शहरातील विविध विकास कामांचे भूमिपूजन आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे हस्ते करण्यात येणार आहे. तब्बल ११ कोटी रुपये विकास कामांसाठी मंजूर करण्यात आले आहेत . कंधार येथे सकाळी १० वाजता तर लोहा येथे दुपारी अडीच वाजता भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या निधीतून लोहा येथे भाजी मंडई-अंकुलवार किराणा दुकान ते नगरेश्वर मंदिर ते जामा मजीद ते अनुसूचित समाज बस्ती ते बौद्धविहार पर्यंत सी.सी. रस्ता करणे , नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत लोहा येथे श्री स्वामी समर्थ मंदिर जवळ नमो उद्यान विकसित करणे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत लोहा येथे कलालपेड येथील बौद्धविहार संरक्षण भिंत व रिटेनिंग येथील बांधकाम करणे. नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत लोहा मेन रोड़ ते बस स्टॅण्ड ते पोलीस कॉलनी मागील परिसर पर्यंत रस्ता मजबुतीकरण करुन सी. सी. रस्ता करणे. नागरी दलितेतर वस्ती सुधार योजने अंतर्गत लोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कॉंक्रीटीकरण करणे. लोहा कंधार रस्ता (गुराखी गड) से पुलापर्यंत रस्ता मजबुतीकरण करुन सी.सी. रस्ता करणे , कंधार नगर परिषद हद्दीतील लॉ कॉलेज ते माईचे मंदिर पर्यंती सी.सी. रस्ता करणे. कंधार नगर परिषद हद्दीतील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत दलितवस्तीत विविध विकास कामे करणे. कंधार नगर परिषद हद्दीतील दिलीतेत्तर विकास योजने अंतर्गत विविध विकासकामे करणे. कंधार नगर परिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते गांधी चौक ते मारोती मंदिर पर्यंत रस्त्याची सुधारणा करणे. विशेष वैशिष्ट्य पूर्ण मोजने अंतर्गत अभिनव नगर येथील न.प.च्या खुल्या जागेत नमो उद्यान विकसित करणे. कंधार नगर परिषद हद्दीतील नगरोस्थान योजने अंतर्गत विविध विकास कामे करण्यात येणार आहेत.

भूमिपूजन सोहळ्याला माजी जिल्हा परिषद सदस्या सौ. प्रणिताताई देवरे - चिखलीकर , राष्ट्रवादीचे सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, कल्याण सावकार सुर्यवंशी, ड. मुक्तेश्वर धोंडगे , श्रीमती चित्राताई लुंगारे , सौ. अनुसयाबाई केंद्रे , डॉ. उत्तमराव सोनकांबळे , सुरेशभाऊ राठोड , किरण वट्टमवार , जफरोद्दी बाहोद्दीन , श्रीमती कमलाबाई लुंगारे , रामराव पवार , छत्रपती धुतमल , दत्ता आप्पाराव वाले , रामराव सुर्यवंशी , केशव मुकद ,शेख करिम , विक्रांत शिंदे , छत्रपती स्वामी ,मनोहर पाटील भोसीकर , किशनराव डफडे , बाबुराव केंद्रे उमरगेकर , संजय देशमुख , सुधाकर कौशल्ये , अनिता ताई कदम , बालाजी पवार , सुनील कांबळे , शेख असिफ , शैलेश बोरलेपवार ,कल्पनाताई चव्हाण , सौ.ज्योतीताई जीवन चव्हाण , पंचशिल कांबळे , भास्करराव पवार , सौ.अनुसयाताई येरलवाड, सौ.चंद्रकलाबाई येळगे , सौ.राहीबाई खिल्लारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पदवीधारकांनी मतदान नोंदणीसाठी पुढाकार घ्यावा - सागर जाधव



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.१८ ऑक्टोबर - मराठवाडा पदवीधर मतदारसंघासाठी मतदार नोंदणी सुरू असून, पदवीधारकांनी मतदान प्रक्रियेतून वंचित राहू नये, असे आवाहन जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर कृष्णाराव जाधव यांनी केले आहे.

ते म्हणाले की, लोकशाही बळकट करण्यासाठी शिक्षित वर्गाने मतदानात सक्रिय सहभाग घेणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणूनच प्रत्येक पात्र पदवीधारकाने ६ नोव्हेंबर २०२५ पूर्वी आपली नोंदणी पूर्ण करावी.

मतदार नोंदणीसाठी अर्जासोबत पुढील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे -

१) पदवी प्रमाणपत्र किंवा अंतिम वर्षाचे गुणपत्रक, २) पासपोर्ट आकाराचा फोटो,३) मतदान ओळखपत्र४) आधार कार्डही सर्व कागदपत्रे सत्यप्रतीसह तहसील कार्यालयात जमा करावीत.सागर जाधव यांनी पुढे सांगितले की, आपण पदवीधर असलो तरी जर मतदान यादीत नावच नसेल तर आपले मत मौन ठरते. त्यामुळे स्वत:सह आपल्या कुटुंबीय व मित्रपरिवाराची नोंदणी करून मतदानाचा हक्क सुनिश्चित करावा.यांनी मराठवाड्यातील सर्व पदवीधारकांना या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

## आर.एस. ब्रदर्स द्वारे भव्य शोरूमच्या आरंभासह महाराष्ट्रातील नांदेड इथे आगमन !



नांदेड : आर.एस. ब्रदर्सने महाराष्ट्रातील नांदेड इथे शिवाजी नगरमधील महात्मा फुले मार्केटजवळ असलेल्या आपल्या नवीन शोरूमच्या भव्य उद्घाटनाची घोषणा केली आहे.

दूरदर्शी पी. वेंकटेश्वरलू, एस. राजामौली, टी. प्रसाद राव आणि दिवंगत पी. सत्यनारायण यांनी स्थापन केलेल्या आर. एस. ब्रदर्सने आधुनिक फॅशनसह परंपरेचे मिश्रण करण्याचा वारसा पुढे चालू ठेवला आणि संपूर्ण भारतातील कुटुंबांना एक अद्वितीय खरेदीचा अनुभव दिला आहे.

या भव्य उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि खासदार (भाजपा) माननीय अशोक शंकरराव चव्हाण जी उपस्थित होते. त्यांनी नांदेड शोरूमचे उद्घाटन केले आणि महाराष्ट्रात कंपनीचा विस्तार केल्याबद्दल आर.एस. ब्रदर्सचे कौतुक केले. दर्जेदार फॅशन सर्वांना उपलब्ध करून देण्याच्या बँडच्या प्रयत्नांचे त्यांनी कौतुक केले आणि अशा उपक्रमांमुळे स्थानिक रोजगाराच्या संधीमध्ये होणारी वाढ आणि राज्याच्या वाढत्या किरकोळ क्षेत्राला मिळणारा पाठिंबा यावर प्रकाश टाकला.

या शानदार उद्घाटन सोहळ्यात लोकप्रिय अभिनेत्री अमृता खानविलकर देखील उपस्थित होत्या, त्यामुळे या सोहळ्याची भव्यता आणि उत्सवाचे आकर्षण यात भर पडली. आपला आनंद व्यक्त करताना अमृता म्हणाली,

आर.एस. ब्रदर्स या ब्रँडने वारसा आणि आधुनिक ट्रेंड्सचा सुंदरपणे मिलाफ केला आहे. त्यांचे उत्सवी आणि विवाह कलेक्शन खरोखरच अन्द्भुत आहेत. त्यांच्या नांदेड शाखेचा शुभारंभ होताना आणि त्यांच्या विविधांगी श्रेणीचा लाभ घेण्यासाठी सर्वांना आमंत्रित करताना मला खूप आनंद झाला!

ठडइ रिटेल इंडिया लिमिटेडच्या संचालकांनी नांदेड शोरूमसह महाराष्ट्रात विस्तार केल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांनी ब्रँडची संपूर्ण भारतात उपस्थिती बळकट करताना विविध शैली, दर्जेदार उत्पादने आणि मूल्याधारित फॅशन उपलब्ध करुन देण्याच्या आपल्या वचनबद्धतेवर भर दिला.

नांदेडमध्ये नव्याने उघडलेल्या शोरूममध्ये महिला, पुरुष आणि मुलांच्या पोशाखांमध्ये लाखो पर्यायांसह अधिक शैलींचा विस्तृत संग्रह आहे, आणि त्यांची किंमत मात्र १४९ पासून सुरू होते. या स्टोअरमध्ये कांची पट्ट साड्या, डिझायनर लेहेंगा, उत्सवी कुर्ता, पाश्चात्य पोशाख आणि खास पुरुषांच्या पोशाखांच्या बँडचे उत्कृष्ट मिश्रण असल्याने, प्रत्येक प्रसंगासाठी एकाच ठिकाणी भेट देता येते.

अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालक श्री. पोट्टी वेंकटेश्वरलू यांनी स्टोअरचे प्राथमिक लक्ष उत्सव आणि विवाह संग्रहांवर असल्याचे अधोरेखित करताना सांगितले की, यामध्ये वधूचे आलिशान कपडे आणि भारतीय कारागिरीचा गौरव करणारे अस्सल वंशपरंपरागत पोशाख समाविष्ट आहेत.

व्यवस्थापकीय संचालक श्री. सीर्ना राजामौली यांनी नमूद केले की, हा संग्रह संपूर्ण भारतभरातून काळजीपूर्वक तयार करण्यात आला असून त्यामध्ये प्रत्येक खरेदीदाराच्या आवडीनुसार पारंपरिक आणि समकालीन दोन्ही शैली उपलब्ध आहेत.

पूर्णवेळ संचालक श्री. तिरुवीधुला प्रसाद राव यांनी ग्राहकांनी दाखविलेल्या निरंतर विश्वासाबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले आणि बँडच्या गुणवत्ता, विविधता आणि परवडणाऱ्या किमतीला आपण वचनबद्ध असल्याचा पुन्हा एकदा दुजोरा दिला.

नांदेडमधील भव्य आरंभाद्वारे आर.एस. ब्रदर्सच्या वृद्धिच्या आणि ग्राहकांच्या विश्वासाच्या प्रवासात आणखी एक मैलाचा दगड रोवण्यात आला आहे. हे शोरूम कुटुंबांसाठी एक उत्तम खरेदी केंद्र असून, इथे एकाच छताखाली महिला, पुरुष आणि लहान मुलांच्या कपड्यांची असाधारण श्रेणी उपलब्ध आहे. कांचीपुरमपासून बनारसी सिल्कपर्यंत, या संग्रहात साड्या, उत्सवाचे कपडे आणि वधूच्या पोशाखांची उत्कृष्ट विविधता आहे ज्यामधून भारताच्या समृद्ध कारागिरीचे प्रदर्शन होते.

नांदेडचे शोरूम खरेदीदारांना त्यांच्या उत्सवी संग्रहाचे अवलोकन करण्यासाठी स्वागत करत आहे, ज्यात निवड, मूल्य आणि फॅशन यांचा समन्वय आहे. फक्त १४९ पासून सुरू होणाऱ्या किंमती आणि लाखो पर्यायांसह अधिक अनोखे प्रकार आणि शैली येथे उपलब्ध आहेत.

दिवाळी स्पेशल, उत्सवी पोशाख आणि लग्नाच्या कलेक्शनची असाधारण श्रेणी अतुलनीय किंमतीत खरेदी करण्यासाठी खरेदीदारांना आता नव्याने उघडलेल्या या शोरूमला भेट देण्याचे आग्रही आमंत्रण आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क. २८१/२०२५

अर्जदार:१. केवलाबाई बळीराम बोरसे, वय ७९ वर्षे, धंदा मजुरी (पत्नी), २. श्री. अनिल बळीराम बोरसे, वय-५४ वर्षे, धंदा शेती (मुलगा), ३. श्री. दिलीप बळीराम बोरसे, वय ५२ वर्षे, धंदा शेती (मुलगा) क. १ ते ३ रा. वाडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ४. सौ. सुरेखा भाउसाहेब देसले, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी (मुलगी), रा. स्वाती रेसेडेन्सी जवळ, सातारा परिसर, ता.जि. छ. संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदारः-निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत बळीराम रामसिंग बोरसे हे दि. १०/०८/२०१९ रोजी वाडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ४ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ३ हे मयत बळीराम रामसिंग बोरसे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/११/२०२५.

आज दि. १७/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक | सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

## अग्रलेख...

# कर्नाटक सरकारचे डोके फिरले आहे काय?

देशातील सर्वांत जुन्या आणि 'वयोवृद्ध' अशा काँग्रेस पक्षाला म्हातारचळ लागले आणि त्याचे डोके फिरले की काय, अशी शंका येण्यासारखा निर्णय कर्नाटक सरकारने घेतला आहे. काँग्रेस पक्ष राष्ट्रीय स्तरावर असो, की राज्य पातळीवर, जे निर्णय घेत आहे, त्यामुळे त्याच्या शहाणपणाची कीव करावीशी वाटते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदा काँग्रेस पक्षाला मोठी ठेच लागली, तरी त्याचे डोळे उघडत नाही, याचे आश्चर्य वाटते. बरे, ही ठेच पहिल्यांदा लागली असे नाही तर त्यानंतर २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही लागली. पण त्यापासून काँग्रेस पक्षाने काही धडा घेतला, असे दिसत नाही. सलग तीन लोकसभा निवडणुकीत नुसती हार नव्हे, तर दारुण पराभव झाल्यानंतरही काँग्रेस पक्षाला शहाणपण येत नाही, याला काय म्हणावे? २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत तर विरोधी पक्षनेतेपद मिळू शकेल, एवढ्या जागाही काँग्रेस पक्ष जिंकू शकला नव्हता. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर काँग्रेस पक्षाने आपल्या वागणुकीचे, आपल्याकडून झालेल्या चुकांचे आत्मपरीक्षण करायला पाहिजे होते. पण काँग्रेस पक्षाने तसे काही केले नाही. तसे करण्याची त्याला आवश्यकताही वाटली नाही. आपल्या पराभवाचे आत्मपरीक्षण न करता काँग्रेस पक्ष त्याचे खापर निवडणूक आयोगावर मतदारयाद्यांच्या मुद्यावरून खोटेनाटे आरोप करून फोडत आहे. अजूनही हा कार्यक्रम संपलेला नाही. वर्गात सर्व विषयात सातत्याने अनुत्तीर्ण होणारा विद्यार्थी आणि काँग्रेस पक्ष यांच्यात काही फरक नाही. हा विद्यार्थी जसा आपल्या अनुत्तीर्ण होण्याचे खापर शिक्षकांवर फोडतो, त्यांनी वर्गात नीट शिकवले नाही, असे म्हणतो, तशी गत काँग्रेस पक्षाची झाली आहे. काँग्रेस पक्ष अशाच चुका वारंवार करीत आहे. आता कर्नाटकमधील काँग्रेस सरकारने सार्वजनिक स्थळांवरील रा. स्व. संघाच्या कार्यक्रमांवर विविध प्रकारचे निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यापुढे कर्नाटकात संघाला परवानगीविना सार्वजनिक पथसंचलन काढता येणार नाही, तसेच सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमही घेता येणार नाहीत. देशात ज्या मोजक्या राज्यांत काँग्रेसचे सरकार आहे, त्यातील एक राज्य कर्नाटक आहे. रा. स्व. संघाने आपली १०० वर्षे नुकतीच पूर्ण केली. रा. स्व. संघ ही राष्ट्रवादाच्या भावनेने ओतप्रोत असलेली राष्ट्रभक्त नागरिक निर्माण करणारी आणि राष्ट्रवादी विचारांची देशातीलच नव्हे तर जगातील सर्वांत मोठी सांस्कृतिक संघटना आहे. अशा संघटनेला विविध माध्यमांतून त्रास देण्याचा प्रयत्न कर्नाटकातील सिद्धरामय्या सरकार करत आहे, याचे विनाशकाले विपरीत बुद्धी या शब्दांतच वर्णन करावे लागेल. राहुल गांधी ज्या पक्षाचे नेते आहेत, त्या पक्षाकडून यापेक्षा वेगळी अपेक्षाही करता येणार नाही. तरी बरे, संपूर्ण देशात आज काँग्रेसची सत्ता नाही. देशात काँग्रेसची सत्ता असती तर काँग्रेसने संघावर थेट चौथ्यांदा बंदी घालायलाही मागेपुढे पाहिले नसते.

कर्नाटकातील एक मंत्री प्रियांक खडगे यांनी वास्तवात संघावर बंदी घालण्याचीच मागणी एका पत्रातून मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याकडे केली होती. प्रियांक हे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांचे चिरंजीव. काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षाचे दिवटे चिरंजीव असल्यामुळे प्रियांक यांच्या पत्राची दखल मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना घ्यावी लागली असावी. कारण काहीही असेल, पण हा निर्णय शंभर टक्के चुकीचा आणि निषेधार्ह आहे. रा. स्व. संघाने तीन वेळा बंदीचा अनुभव घेतला आणि प्रत्येक वेळी तो अजिंक्य ठरला. अशा प्रकारच्या निर्बंधांमुळे संघाच्या कामांवर आपल्याला नियंत्रण आणता येईल, असे स्वप्न काँग्रेस पाहत असेल तर ते दिवास्वप्नच होय. संघावर पहिली बंदी १९४८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हत्येनंतर घातली गेली. दुसरी बंदी १९७५ मध्ये आणिबाणीच्या काळात तर तिसरी बंदी रामजन्मभूमी आंदोलनात अयोध्येत वादग्रस्त ढांचा पडल्यानंतर १९९२ मध्ये घालण्यात आली. यातल्या कोणत्याच बंदीने संघाचे काहीच बिघडले नाही. उलट ज्यांनी संघावर बंदी घातली, त्यांनाच त्याची राजकीय किंमत भविष्यात चुकवावी लागली. प्रत्येक बंदीनंतर संघ आणखी झळाळून निघाला, संघाचे काम वाढले. आगीतून सोने जसे झळाळून निघते, तसे संघाचे झाले. सिद्धरामय्या सरकारने संघावर निर्बंध लादले असले तरी ते न्यायालयात टिकणार नाहीत. जनतेत जो काही रोष निर्माण झाला तो तर आहेच. कर्नाटकातील जनताच संघावरील हे निर्बंध झुगारून देईल, यात शंका नाही. आपल्या प्रत्येक कार्यक्रमासाठी संघाला आता कर्नाटकात तेथील सरकारची परवानगी घ्यावी लागेल आणि सरकार अशी परवानगी देणार नाही तेव्हा हा रोष अधिक वाढेल. मुळात संघ कोणतेही बेकायदेशीर काम करीत नाही. संघाची शाखा लावायला, हिंदुत्वाचे प्रतीक असलेल्या भगव्या ध्वजाला प्रणाम करायला कर्नाटकातील जनतेला आता तेथील सरकारची परवानगी घ्यावी लागेल का, हा मूलभूत असा प्रश्न आहे. उद्या मंदिरात जायलाही जनतेला तेथील काँग्रेस सरकारची परवानगी घ्यावी लागेल की काय, असे दिसते. संघात जाणे, भगव्या ध्वजाला प्रणाम करणे हा कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारच्या दृष्टीने गुन्हा असेल, बेकायदेशीर काम असेल तर तेथील जनता असा गुन्हा एकदा नाही तर वारंवार करायलाही तयार आहे. स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात देशातील जनतेने महात्मा गांधींच्या नेतृत्वात सविनय कायदेभंग आंदोलन केले होते. प्रसंगी कर्नाटकात तसेही घडेल आणि तेव्हा काँग्रेसला फार अडचणीचे होईल. केंद्रातील मोदी सरकारवर हुकूमशाहीचा आरोप करणाऱ्या कर्नाटकातील काँग्रेस सरकारने या निर्णयातून आपल्याच हुकूमशाहीचे दर्शन देशाला घडवले आहे. संघावर निर्बंध आणून कर्नाटकातील काँग्रेस सरकारने आपल्या हाताने आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आहे.

संघ आणि संघ परिवारातील विविध संघटनांच्या कामकाजात आणि कार्यक्रमातही सहभागी होण्यास राज्यातील सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर बंदी घालावी, अशी मागणीही प्रियांक खडगे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना संघ आणि संघ परिवारातील संघटनांना वर्गणी द्यायलाही त्यांनी मनाई केली आहे. यावरून प्रियांक खडगे आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे डोके फिरले, असे म्हणावेसे वाटते. कारण अशी मागणी करण्यापूर्वी प्रियांक यांनी आपल्या वडिलांशी म्हणजे मल्लिकार्जुन खडगे यांच्याशी निश्चितच संवाद साधला असावा. स्वातंत्र्य आंदोलनात लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश सरकारच्या अन्याय वागणुकीमुळे संतापून सरकारचे डोके ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारणारा जहाल अग्रलेख लिहिला होता. टिळकांनी सरकारला डोके आहे, हे गृहीत धरून ते ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारला होता. आपण कर्नाटकातील सिद्धरामय्या सरकारला आणि काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला डोके ठिकाणावर आहे का, असा प्रश्न विचारू शकत नाही. कारण त्यांना डोकेच नाही. डोके असते आणि डोक्याचा वापर कसा करायचा हे माहिती असते, तर सिद्धरामय्या सरकारने असा बिनडोक निर्णय घेतलाच नसता.

कर्नाटकपाठोपाठ इतर काँग्रेसशासित राज्यांमध्ये असे निर्णय भविष्यात होण्याची शक्यता दिसते. काँग्रेसच्या नेतृत्वाच्या डोळ्यांत संघ खुपतो. देशातील राष्ट्रभक्त जनतेला संघाबद्दल काय वाटते, यापेक्षा काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाला संघाबद्दल काय वाटते, हे त्यांच्या वतीने राज्य सांभाळणाऱ्यांसाठी महत्त्वाचे आहे. देशातील जनतेच्या संयमाची आणि सहनशीलतेची परीक्षा पाहणारे असे निर्णय घेत काँग्रेस नेतृत्वाच्या गुडबुकमध्ये राहताना आपण देशातील जनतेच्या बॅडबुकमध्ये चाललो आहोत, याचे भान काँग्रेसच्या नेत्यांनी ठेवले पाहिजे. अशाच बंदीच्या हव्यासाने काँग्रेसला रसातळाला पोहोचविले, हेही त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. डोके असेल तर ते ताळ्यावर आणावे आणि नसेलच तर कुणाचाच इलाज नाही!

## यंगिस्तान

# सोशल मीडियावरील झुंडशाही

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

हनुमान जेव्हा समुद्र उल्लंघन करत होता तेव्हा सिंहिका नावाची राक्षसी त्याला गिळण्याचा प्रयत्न करू लागली. हनुमान तिच्यावर इतका जोराचा मुष्टिप्रहार करतो की लगेच मरते. पुढे सुरसा नावाची राक्षसी त्याच्यासमोर उभी राहते. त्याला गिळण्याचा प्रयत्न करते. तर हनुमान आपला आकार तिच्या तोंडापेक्षा मोठा करतो. हे पाहून सुरसा हनुमंतापेक्षा दुप्पट आकाराचा जबडा करते. पुन्हा हनुमान मोठा होतो तर सुरसा आपला जबडा त्याच्यापेक्षा मोठा करते. हनुमानाला कळतं की आपण कितीही मोठा आकार केला तरी ती त्याच्या दुप्पट आकार मोठा करेल. मग हनुमान आपला आकार लहान करतो आणि तोंडात प्रवेश करून दुसऱ्या मार्गाने बाहेर पडतो. मग सुरसासमोर हात जोडून उभा राहतो आणि रामकार्यासाठी चाललो आहे, मला जाण्याची अनुमती दे, अशी विनवणी करतो. सुरसाला हनुमानाचा नम्रपणा आवडतो. ती त्याला जाऊ देते. याच प्रवासात मेरु पर्वत जेव्हा प्रकट होऊन हनुमानाला विश्रांती करण्याची विनंती करतो तेव्हा हनुमान विनम्रपणे विश्रांती घेण्यास नकार देतो आणि म्हणतो की, 'रामकार्यासाठी जात आहे, या कार्यात विश्रांती कसा घेऊ?' पण आपण आपल्या या दैवताकडून काही शिकतो की नाही असा प्रश्न आहे. सोशल मीडियाच्या युगात, एखादी घटना घडली की ती लगेच व्हायरल होते. लोकांच्या प्रतिक्रिया येतात, चर्चा होतात आणि कधीकधी ते ट्रोलिंगमध्ये रूपांतरित होते. अलिकडेच 'कौन बनेगा करोडपती' या लोकप्रिय कार्यक्रमात एक दहा वर्षांचा मुलगा आला होता. तो कार्यक्रमात अमिताभ बच्चन यांच्याशी बोलताना उद्धटपणे वागत होता. बच्चन साहेब बोलण्याआधीच त्यांचं वाक्य कापत तो मध्येच बोलत होता. मला रुल्स वगैरे समजवू नका असेही म्हणाला. या मुलाने सर्वांचंच लक्ष वेधून घेतलं, पण नकारात्मकदृष्ट्या. पण अमिताभ बच्चन यांनी ही परिस्थिती अतिशय शांतपणे आणि प्रेमळपणे हाताळली. सोशल मीडियावर या मुलाला आणि त्याच्या पालकांना ट्रोल करण्यात आले. गलिच्छ कमेंट्स, अपमानास्पद भाषा वापरण्यात आली. त्याच्या पालकांच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित केले गेले. मात्र ट्रोल करताना काही लोकांनी मुलासाठी अपशब्द वापरले. काही लोकांनी तर अतिशय गलिच्छ टीका केली. इतकेच नव्हे, तर पालकांनाही ट्रोल केले गेले. त्यांच्या संस्कारांवर प्रश्न उपस्थित केले. कदाचित पालकांची चूक असेल. मुलगा उद्धटपणे बोलत असताना ते हसत होते. कदाचित त्यांना त्याच्या आत्मविश्वासाचा अभिमान वाटत असेल. अनेक गोष्टी यात असू शकतात. सोशल मीडियावर प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून म्हटले की, 'या मुलाला तीव्र असा एडीएचडी (अटेन्शन डेफिसिट हायपरअॅक्टिव्हिटी डिसऑर्डर) असू शकतो.' एडीएचडी ही एक अशी मानसिक समस्या आहे, ज्यात मुले अतिउत्साही, आवेगपूर्ण वागतात आणि बऱ्याचदा त्यांच्यात एकाग्रता कमी असल्याचे दिसून येते. खरं पाहता अशा मुलांना समजून घेणे गरजेचे असते, ट्रोल करणे नव्हे. अमिताभ बच्चन यांनी त्या मुलाला अतिशय योग्य प्रकारे हाताळले, ज्यामुळे मुलाच्या मनावर नकारात्मक परिणाम झाला नाही. पण सोशल मीडियावर ट्रोलर्सनी याचा विचार केला नाही. ते फक्त मजा घेण्यात व्यस्त होते. खरंच, एडीएचडीसारख्या स्थितीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. आजकाल अनेक मुले या विकाराने प्रभावित असतात. त्यांना औषधे, थेरपी आणि प्रेमाची गरज असते. ट्रोलिंगमुळे त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडू शकते. मी मुलांना बालनाट्याचे प्रशिक्षण देत असल्यामुळे अनेक मुलांना मी भेटत असतो. त्यामुळे अशी आगाऊ मुलं मी खूप पाहिली आहेत. पण पूर्णपणे दोष हा त्या मुलांचा किंवा पालकांचा नसतो. आजची जीवनशैलीच तशी झाली आहे. आपण भारतीय मूल्यांपासून, आपल्या मूलभूत संस्कारापासून दूर जात आहोत. त्यामुळे अशा समस्या समाजात पुढे आणखी पाहायला मिळणार आहेत. मात्र लहान मुलांना ट्रोल करताना भाषेचा स्तर राखणे आवश्यक आहे. तो फक्त दहा वर्षांचा आहे. त्याच्या मनात कदाचित काही वेगळे चालले असेल. त्याला ते सांगता येत नसेल. दुसरी गोष्ट प्रत्येकाच्या घरात लहान मुले असतात. त्यांची मुले कधीच उद्धट वागत नाहीत का? कधीच चुकीचे बोलत नाहीत का? आणि उद्या या ट्रोलर्सची मुले त्यांना एकटे सोडून परदेशात जाणार नाहीत, याची हमी देता येणार आहे का? मग दुसऱ्यांच्या संस्कारांवर का बोलायचे? लक्षात घ्या, हे ट्रोलिंग केवळ या एका घटनेपुरते मर्यादित नाही. सोशल मीडिया ट्रोलर्स कशावरही भाष्य करतात. उदाहरण घ्यायचे तर गायक राहुल देशपांडे यांना वैवाहिक जीवनात घटस्फोट घ्यावा लागला आणि हा अनुभव त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला. त्यानंतर त्यांच्यावर प्रचंड टीका झाली. लोकांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनावर कमेंट्स केल्या, अपमान केले. '१७ वर्षांच्या नात्यानंतर घटस्फोट? काय संस्कार?' अशा प्रकारच्या प्रतिक्रिया आल्या. पण वैयक्तिक आयुष्य हे वैयक्तिक असते. अर्थात हा अनुभव सोशल मीडियावर का शेअर केला, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. पण ही चावडी झाली आहे. आता प्रश्न असा आहे की, हे ट्रोलिंग का होते? त्यामागे काय कारणे आहेत? सोशल मीडियावर अनेक खाते बनवता येतात आणि मग या फेक प्रोफाईल्सवरून अपमानास्पद कमेंट्स करणे सोपे जाते. दुसरे म्हणजे, समूहाची मानसिकता. म्हणजेच झुंडीचे मानसशास्त्र. एखादी पोस्ट व्हायरल झाली की, लोक त्यावर कमेंट करतात आणि जणू एक लाट पसरते. नव्हे त्सुनामीच येते. तुम्ही जर व्यक्त झाला नाहीत तर हा मोठा गुन्हाच ठरणार आहे जणू. तुम्ही मत व्यक्त केले नाही तर कुणी तुम्हाला शिक्षाच करणार आहे जणू. तिसरे म्हणजे, स्वतःच्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडणे, ही मानसिकता असते. ट्रोलर्स बहुतेक वेळा स्वतःच्या जीवनात असमाधानी असतात, म्हणून दुसऱ्यांना खाली खेचण्याचा प्रयत्न करतात. पण याचे परिणाम काय? विशेषतः लहान मुलांसाठी... ट्रोलिंगमुळे मुले नैराश्यग्रस्त होऊ शकतात, त्यांचा आत्मविश्वास कमी होऊ शकतो. काही लोकांनी त्या मुलाला समर्थनही दिले. 'तो फक्त एक लहान मुलगा आहे, त्याला ट्रोल करू नका.' असेही काही लोक म्हणाले. हा समंजसपणा हवा. लहान मूल आहे. चुका करायला आणि सुधारायला खूप वाव आहे, हे जास्त महत्त्वाचं. आपण मोठी माणसं काय प्रभू रामचंद्रांप्रमाणे आदर्श जीवन जगत आहोत काय? आपण नाही का चुका करत? समाज म्हणून आपण काय करू शकतो हे पाहिलं पाहिजे. सर्वप्रथम, सोशल मीडियावर संयम बाळगणे. एखादी घटना पाहिली की लगेच कमेंट करू नये. विचार करावा की, हे लहान मूल आहे, त्याच्या मागे काही कारण असू शकते. दुसरे, पालकांनी मुलांना शिष्टाचार शिकवणे. तिसरे, एडीएचडीसारख्या विकारांबाबत जागरूकता वाढवणे. चौथे, कायद्याने ट्रोलिंगवर नियंत्रण ठेवणे. भारतात सायबर कायदे आहेत, पण त्यांची अंमलबजावणी कठोर करणे गरजेचे आहे.

हे लक्षात घेतले पाहिजे की, प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. त्याच्याकडून चुका होत असतील, पण ट्रोलिंग हे उत्तर नाही. अमिताभ बच्चन यांच्यासारखा वयोवृद्ध आणि प्रचंड यशस्वी माणूस जर संयम ठेवू शकतो तर आपण खूप लहान आहोत. हनुमंत हा आपला देव आहे. त्याच्याकडूनही आपण शिकलं पाहिजे की कोणत्या प्रकरणात तलवार उचलायची, कोणत्या प्रकरणात छडीचा वापर करायचा आणि कधी संयमाने, प्रेमाने गोष्टी हाताळायच्या. सोशल मीडियावरील या झुंडशाहीला आवर घालायलाच हवा.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# रात्रीही राहणार गुन्हेगारांवर नजर

गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंत दोन-तीन महिने सतत सण-उत्सवाचे वातावरण असते. लोकांमध्ये वेगळाच उत्साह असतो. प्रत्येकाच्या घरात चैतन्य पसरलेले असते. बाजारपेठाही वस्तू, खाद्यपदार्थांनी सजलेल्या असतात. कपडे, वस्तू, खाद्यपदार्थ घेण्यासाठी लोकांची घाई चाललेली असते. त्यासाठी बाजारात, रस्त्यांवर आबालवृद्ध मोठ्या संख्येने बाहेर निघतात. सण म्हटला की, महिलांमध्ये तर वेगळाच उत्साह संचारलेला असतो. तसाही प्रत्येक सण महिलांसाठी खास असतो. दिवाळीला कपडे, दागिन्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात केली जाते. बाजारात जाताना जवळच बक्कळ पैसे असतात. अशावेळी गुन्हेगार सक्रिय होतात आणि हात साफ करून जातात. सण-उत्सवांशिवाय इतरही काळात गुन्हेगार सक्रिय राहतातच. मग अशा गुन्हेगारांना वठणीवर आणण्यासाठी पोलिसांना आपला खाक्या दाखवावा लागतो. त्यासाठी वेगवेगळे प्रयोग करावे लागतात. त्यातही काही सराईत गुन्हेगार असतात. त्यांच्यासाठी तर विशेष उपाययोजना आखाव्या लागतात. गुन्हेगारांच्या टोळ्यांसाठी खास उपाय योजले जातात. दिवसाचे गुन्हे करणारे वेगळे, रात्रीचे वेगळे अशा गुन्हेगारांसाठी मग पोलिस कंबर कसतात आणि त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी गनिमी कावा वापरण्यात येतो. नागपुरात तर पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी गुन्हेगारांसाठी खास 'उपचार' शोधले आहेत. रात्रीच्या वेळी होणारे गुन्हे लक्षात घेता नागपुरातील परिमंडळ चारमध्ये 'मिशन नाईट वॉच' ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली. या मोहिमेअंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २१७ ढाबे-हॉटेल्स मालकांवर मागील महिनाभरात कारवाई करण्यात आली. मुदतीपेक्षा जास्त वेळ बार सुरू राहणे किंवा दारूची विक्री करणे या प्रकरणांत या कारवाया झाल्या. विशेष म्हणजे ही मोहीम पोलिस उपायुक्त रश्मिता राव यांनी राबविली. रात्रीच्या वेळेस होणाऱ्या घरफोडी व गैरप्रकारांवर आळा बसावा यासाठी ३० ऑगस्टपासून 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम सुरू झाली. यासाठी परिमंडळ स्तरावर व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आला. त्यात सर्व पोलिस ठाण्यांचे ठाणेदार व दोन कर्मचारी होते. प्रत्येक ठाण्यातील रात्रपाळीतील अधिकाऱ्यांना दररोज त्यात समाविट करून दुसऱ्या दिवशी काढण्यात येत होते. याअंतर्गत रात्री अधिकारी, कर्मचारी मुदत संपल्यावरदेखील सुरू असलेले आस्थापना बंद करणे, आरोपींच्या घराची झडती घेणे, घरफोडीच्या ठिकाणी सायरनसह पेट्रोलिंग करणे असे उपक्रम करत आहेत. विशेष म्हणजे कर्तव्यावरील अधिकाऱ्यांना नियोजित ठिकाणावरून फोटोदेखील टाकावे लागतात. सूचनांप्रमाणे कारवाई न करणाऱ्या अधिकाऱ्यांना लेखी खुलासादेखील मागविण्यात येत आहे. दररोजच्या कारवाईचा अहवाल सकाळी १० वाजेपर्यंत तयारदेखील होतो. या मोहिमेअंतर्गत पोलिसांनी सर्व पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील घरफोडी व वाहनचोरीची ठिकाणे निश्चित केले. त्याआधारे क्राईम मॅपिंगवर भर देण्यात आला. विशेष म्हणजे एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या वास्तव्याच्या ठिकाणी क्यूआर कोड लावण्यात आले असून बिट मार्शल्सद्वारा त्यांचे पंचिंग केले जाते. मोहीम राबविताना कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी काही सूचना करण्यात आल्या आहेत. आस्थापना तपासून कारवाई, घरफोडीच्या रेकॉर्डवरील आरोपींची तपासणी, सायरन पेट्रोलिंग व संशयितांची तपासणी आणि गुडमॉर्निंग पेट्रोलिंग असा हा क्रम आहे. त्यामुळे गुन्हेगारांना आता गुन्हे करताना दहावेळा विचार करावा लागेल. नागपूर जिल्ह्यात मध्यप्रदेशातून प्रवेश करताना दारू वाहतूक करणे, गोवंश तस्करीचे प्रमाणही वाढले होते. त्यावर अशा कारवायांमुळे आता बऱ्याच प्रमाणात चाप बसला आहे. 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम सुरू झाल्यावर ऑगस्टच्या तुलनेत सप्टेंबरमध्ये घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

राज्य सरकारने नक्षलवाद संपवण्याचा संकल्प केला तसेच राज्यातील आणि नागपूर शहरातील गुन्हेगारी संपवण्याचा विडा उचलला आहे. याचा परिणाम म्हणून पोलिस सक्रिय झाले आणि त्यांनी गुन्हेगारांना धाक वाटावा अशी कारवाई सुरू केली आहे. आता भविष्यात गुन्हेगारांना कोणताही गुन्हा करताना पहिले पोलिस आठवतील अशीच ही 'मिशन नाईट वॉच' ही मोहीम आहे. सण, उत्सवाच्या काळातच नव्हे तर नेहमीसाठी ही मोहीम सुरू राहावी, ही अपेक्षा.

९८५०७५३२८१

## मुंबई वार्तापत्र

# अडाण्यांचा धिंगाणा!

**नागेश दाचेवार**



यांना संविधान कळत नाही, कायदा कळत नाही, संवैधानिक रचना कळत नाही, निवडणूक प्रक्रिया कळत नाही, मतदारयाद्यांची व्यवस्था समजत नाही, राज्याचे-केंद्राचे अधिकार समजत नाहीत, केंद्र आणि राज्य सूचीतले अंतर समजत नाही, न्यायिक प्रक्रिया कळत नाही, प्रचलित कायद्याने केली जाणारी प्रक्रिया यांना उमजत नाही, निव्वळ तमाशा करणे आणि धिंगाणा घालणे तेवढे बरोबर कळते, बावळटपणाची मुजोरी करणे यांना चांगले जमते!.. याला केवळ अडाण्यांचा धिंगाणा तेवढे म्हणता येईल.

आता विरोध करायला आणि राजकारण करायला काही मिळालं नाही म्हणून विरोधक मतचोरीचा मुद्दा चघळताना दिसत आहेत. मतदारयादी सदोष असल्याचा डांगोरा पिटणाऱ्या या विरोधकांना लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात निर्विवाद यश मिळाले होते. तेव्हा यांनी या यादीवर आक्षेप नोंदविला नाही. मात्र, त्याच यादीतील लोकांनी विधानसभेत जेव्हा यांना अस्मान दाखवले तेव्हा मात्र, यांना सदोष आणि निदोष याद्या, मतचोरी वगैरे कळू लागले. विरोधकांना ट्रम्पचे आधार कसे काढता येते, एकाच घरात अनेकांचे मतदान असल्याचे कळले, एका व्यक्तीचे चार-चार ठिकाणी नाव असल्याचे कळले, एकाच व्यक्तीने दोन-दोन ठिकाणी मतदान केल्याचे यांना कळले. मात्र, मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांची भूमिका आणि राज्य निवडणूक आयोगाची भूमिका काय असते एवढे नाही कळले. खरे तर, केंद्रीय आणि राज्य आयोगाच्या अधिकारांची विभागणी केलेली असते. ही बाब एवढे वर्षे सत्तेत आणि ५० वर्षे राजकारणात राहिलेल्या शरद पवारांसारख्या स्वतःला महाराष्ट्रातल्या राजकारणातला चाणक्य म्हणवून घेणाऱ्या, मुख्यमंत्रिपदावर राहिलेल्या ठाकरे आणि काँग्रेससारख्या राष्ट्रीय पातळीवरील मोठ्या पक्षाच्या मोठ्या नेत्यांना कळली नाही, याचे आश्चर्य वाटते.

''भारतीय जनता पक्ष निवडणुका घ्यायला घाबरत आहे'' ते ''निवडणुका पुढे ढकला''पर्यंतचा मविआचा प्रामुख्याने उद्धव ठाकरेंचा, उबाठा नेत्यांचा थक्क करणारा प्रवास बघितल्यावर यांच्या जीवाची होत असलेली कालवाकालव लक्षात येते. ५-७ वर्षे निवडणुका घेतल्या नाहीत, अजून २-४ महिने निवडणुका पुढे ढकलल्या तर काय फरक पडणार आहे. मतदारयाद्या निर्दोष असायला हव्यात, त्याशिवाय निवडणुका घेणे ही लोकशाहीची थट्टा ठरेल वगैरे वगैरे मूर्खांचे तर्क लावताना हे लोक दिसत आहेत. यांना बेसिक नागरिकशास्त्र कळत नाही हे जेव्हा सिद्ध होते, तेव्हा मात्र खऱ्या अर्थाने लोकशाहीची थट्टा होत आहे असे म्हणता येईल. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता निवडणुका होऊ घातल्या आहेत. त्यामुळे आता त्या दोन-चार महिने पुढे ढकलण्याचे अधिकार आता केंद्रीय निवडणूक आयोग असो किंवा राज्य कोणालाही नाही. सरकारी यंत्रणांना असे परस्पर निर्णय देखील घेता येत नाहीत. विरोधकांना संविधान मान्य नाही, संविधानाने स्थापित झालेल्या संवैधानिक संस्था ते मानत नाहीत. न्यायालये आणि त्याचे अधिकार मानत नाहीत. मात्र, हा देश संविधानाने, कायद्याने चालतो आणि येथील संवैधानिक संस्था, शासकीय कार्यालये आणि सामान्य नागरिक हे न्यायालयाचे निर्देश पाळतात. हेच सत्य आहे.

सर्वोच्च न्यायालयाने, आता अजून मुदत देणार नाही, काय ते ३१ जानेवारीपूर्वी एकदाचे सर्व संपवा, असे निर्देश दिले आहेत. हे दिलेले निर्देश शरद पवार, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंना माहिती नाहीत? तरी जर मुदत वाढवून पाहिजे असेल तर यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घ्यावी. निवडणूक पुढे ढकलण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला देण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयाला करावी. ज्यांना अधिकारच नाहीत त्यांच्या दारावर जाऊन उगाच छाती बडवण्यात काय अर्थ? बरे एवढे करून भाजपा किंवा त्यांच्या सहकारी पक्षांचे काय वाकडे होणार आहे? राज्यात त्यांची सत्ता आहे. पुन्हा दोन-चार महिने या सर्व संस्थांवर एकछत्री सत्ता राबविता येईल त्यांना. मात्र, त्याचवेळी तुमचे काय? आजचे मरण उद्यावर जाईल, एवढेच. यातून केंद्र आणि राज्यात सत्तेबाहेर असताना किमान स्थानिक पातळीवर तरी आपल्या कार्यकर्त्यांना सत्ता मिळण्याची संधीदेखील हे लोक हिरावून घेत आहेत. मुळात काय तर, संजय राऊत, उद्धव ठाकरे आणि पूर्ण महाविकास आघाडीची पराभवाच्या भीतीने गाळण उडाली असून त्या निराशेतून असले प्रकार ते करत आहेत. यांचा दुटप्पी चेहरा आणि पितळ उघडे पडले आहे. कारण बिहारमध्ये मतदारयाद्यांत सुधारणा करण्यासाठी विशेष सुधारणा पडताळणी मोहीम (एसआयआर) राबविण्यात आली. त्याचा यांनी कडाडून विरोध केला. आणि महाराष्ट्रात तेच करण्याची मागणी करताना हे बाळबोध लोक दिसत आहेत. बरं हे करत असताना थेट एसआयआर करा असे देखील म्हणायला दचकत आहेत. काय ही केविलवाणी आणि दयनीय स्थिती विरोधकांची झाली आहे?

बरं यातली सर्वांत मोठी गंमत म्हणजे, ज्या माणसाचा एकही आमदार नाही, तो माणूस निवडणूक आयोगाकडे गेलेल्या मविआच्या शिष्टमंडाळाचा प्रमुख झाला. तो आयोगाच्या बैठकीत आयोगाला धारेवर धरतो, पत्रकार परिषदेत प्रमुख भूमिका मांडतो आणि विशेष म्हणजे मविआमध्ये याला घ्यायचे की नाही हे अद्याप ठरले नसताना, निर्णय झालेला नसताना, याचं घेणं-देणं नसताना तोच माणूस मविआचा चेहरा झाला, व्हॉईस झाला, फुटेज खाऊन गेला आणि हे लोक बावळटासारखे बघत बसले. मुळात आता निवडणुका समोर उभ्या ठाकल्या असून, यांच्या पायाखालची जमीन सरकू लागली आहे. दोन्ही ठाकरे एकत्र येऊनही यांना समोर पराभव दिसू लागला आहे. मुंबई महापालिका यांच्यासाठी सोन्याचं अंडं देणारी कोंबडी आहे. ती देखील हातची जात असल्याचे लक्षात आल्यामुळे, हे लोक आता भांबावले आहेत. केंद्र, राज्य आणि आता स्थानिक पातळीवरही सुपडा साफ झाला तर, कार्यकर्ते सांभाळणे कठीण होईल, अशा एक नव्हे अनेक समस्यांनी हे ग्रस्त झाल्याने असे अडाणीपणाचे धिंगाणे चालविले आहेत.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### धन्वंतरी जयंती

धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी जयंती सुद्धा असते. धन्वंतरी देवतेचा जन्म देव आणि दानव यांनी केलेल्या समुद्रमंथनांमधून झाला आहे. धन्वंतरी देवतेला चार हात असून तिच्या एका हातात अमृतकलश, दुसऱ्या हातात जळू, तिसऱ्या हातामध्ये शंख, चौथ्या हातामध्ये चक्र असते. या चारही गोष्टींचा उपयोग करून अनेक व्याधींना आणि रोगांना बरे केले जाते. धन्वंतरी देवता ही देवांचा वैद्य आहे. वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरी देवतेचे पूजन करतात. कडुलिंबाची पाने आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद बनवला जातो आणि त्याचा नैवेद्य धन्वंतरी देवतेला दाखवला जातो. कडुलिंबाची पाच-सहा पाने रोज खाल्ली तर आरोग्य चांगले राहते.

**वैद्य प्रकाश जोशी**/ नागपूर

### खाद्यपदार्थ घेताना सतर्क राहा

दिवाळी हा आपला सर्वांत मोठा सण मानला जातो. देशभरात हा सण आनंदात आणि उत्साहात साजरा होतो. अनेक औद्योगिक उलाढाली या दिवसात होत असतात. त्यात कपडे, इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक वस्तू, दागिने, अनेक प्रकारच्या भेटवस्तू याची देवाणघेवाण, खरेदी-विक्री होत असते. या सर्वांत अग्रक्रम लागतो तो खाद्यपदार्थांचा. त्यात चॉकलेटपासून तर मिठाई, खवा, पनीरसारख्या दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीवर जास्त भर असतो. त्यामुळे त्यात भेसळीची शक्यता वाढते.

सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्नसुरक्षिततेचा या प्रशासनाने राबविलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत पाहणी केली असता विविध अन्नपदार्थांचा मोठ्या प्रमाणावर साठा जप्त केल्याचे वृत्त समोर आले आहे. दिवाळीत निकृष्ट पदार्थांची विक्री केल्याचे आढळल्यास विक्रेत्यांवर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. परंतु ग्राहक म्हणून आपल्या आरोग्याबाबत आपण सजग होणे आवश्यक आहे. कुठलाही पदार्थ खरेदी करताना खाद्यपदार्थाच्या आवरणावर बेस्ट बीफोर तपासून अधिकृत विक्रेत्याकडून खरेदी करावी. त्याचे बिल घ्यावे आणि नाशवंत पदार्थांचा लवकर वापर करावा तसेच थंड ठिकाणी ठेवावे. ही सावधगिरी बाळगावी. काही अपाय झाला आणि विक्रेत्यांवर कारवाई झाली तरी आपल्या प्रकृतीची हानी कशी भरून काढणार? आजकाल घरोघरी उद्योजिका फराळाच्या पदार्थांची विक्री करतात. त्यांच्याकडून फराळ घेण्यावर भर द्यावा आणि काही त्रुटी असल्यास त्वरित त्यांना कळवावे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### सोन्याच्या किमती किती वाढणार?

भारतामध्ये विशेषतः या महाराष्ट्रामध्ये सोन्याची किंमत गगनाला भिडली आहे. सोनं एवढं महाग कसं झाले हा संशोधनाचा विषय आहे परंतु गेल्या वर्षी १० ग्रॅम म्हणजेच १ तोळा पन्नास हजारावर होतं. ते आता या वेळेला एक लाख ३० हजारावर गेलं आहे. एवढं महाग सोनं कसं खरेदी करणार हा मोठा प्रश्न आहे. नुकताच सोनेरूपी दसरा हा सण येऊन गेला. पण खरेदी फार कमी प्रमाणात झाली.

परंतु आता दिवाळी, पाडवा येतोय. दिवाळीनंतर लग्नाचा हंगाम येतोय. तेव्हा लग्नाकरिता सोनं घेणं किती अवघड जाणार आहे हा मोठा प्रश्न आहे. लग्नात सोनं हा फारच महत्त्वाचा विषय असतो. सोन्याची देवाणघेवाण चालते. त्यावेळी मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. भारतात काही राज्यांत सोन्याच्या खाणी आहेत असं कळतं. मग सोनं जातं कुठं? सरकार याकरिता काही करेल का आणि सोन्याचा भाव कमी होईल का?

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच <u>कुठलाही लेख</u> पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-१६

शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५

### असु अम्ही सुखाने पत्थर पायातील

असु अम्ही सुखाने पत्थर पायातील
मंदीर उभविणे हेच आमुचे शील ॥धृ.॥

आम्हास नको मुळी मान मरातब काही
कीर्तीची आम्हा हाव मुळीही नाही
सर्वस्व अर्पिले मातृभूमिचे ठायी
हे दैवत अमुचे ध्येयमंदिरातील ॥१॥

वृक्षांच्या शाखा उंच नभांतरि जावो
विश्रांतिसुखाते विहगवृंद वरि घेवो
जरि देईल टकरा नाग बलाने देवो
करु अमर पाजुनी रस पाताळातील ॥२॥

जरि असले अमुचे रूपहि ओंगळवाणे
सोसून टाकिचे घाव बदलवू जिणे
गुणसुमने आम्ही विकसित करु यत्नाने
पावित्र्ये जीवन का न होइ तेजाळ ॥३॥

**गीत - म. द. उपाख्य बापू महाशब्दे**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### डीबीटी पोर्टलव्दारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यावर मदत वितरीत होणार : जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यातच डीबीटी पोर्टलद्वारे राज्य सरकारकडून प्राप्त मदत निधी वितरित होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

सप्टेंबर-२०२५ या कालावधीत छत्रपती संभाजीनगर विभागातील बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड आणि पुणे विभागातील सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यात अतिवृष्टी व पूर यामुळे शेतपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरीता महसूल व वन विभागाचा शासन निर्णय, दि. १६ ऑक्टोबर २०२५ अन्वये १ हजार ३५६ कोटी ३० लक्ष २२ हजार इतका निधी वितरीत करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे. सदर निधीपैकी परभणी जिल्ह्यातील ४ लाख ३९ हजार २९७ नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी २४५ कोटी ६४ लक्ष ४९ हजार इतका निधी मंजूर झाला आहे.

सप्टेंबर-२०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यासाठी सातत्याने पाठपूरावा करण्यात आला. दरम्यान, शासनाने नुकसानीची तात्काळ दखल घेवून परभणी जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी तब्बल २४५ कोटी रुपयांच्या निधीची तातडीने मदत जाहीर केल्याबद्दल पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. सप्टेंबर-२०२५ या कालावधीत अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांची संख्या, बाधित क्षेत्र (हेक्टर), आणि मंजूर निधी यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे. सप्टेंबर-२०२५ - बाधित शेतकरी संख्या -४,३९,२९७ बाधित क्षेत्र (हेक्टर)-२,८५,८५३.७८ हेक्टर, मंजूर निधी- रु. २४५ कोटी ६४ लाख ४९ हजार. मंजूर झालेला निधी डीबीटी पोर्टलव्दारे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यावर वितरीत करण्यात येणार आहे.

### जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित आपदग्रस्तांसाठी विशेष सवलती लागू :

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील अतिवृष्टी व पुरामुळे बाधित आपदग्रस्तांसाठी विशेष सवलती लागू करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिली.

जिल्ह्यातील परभणी, जिंतूर, पालम, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी, सोनपेठ आणि पूर्णा या ९ तालुक्यामध्ये अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे बाधितांना, आपदग्रस्तांना जमीन महसुलात सुट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडीत कर्जाच्या वसूलीस स्थगिती, तिमाही वीज बिलात माफी, परिक्षा शुल्कात माफी व १० वी आणि १२ वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी सवलती लागू करण्यास मंजूरी देण्यात आली असून सर्व संबंधीत विभाग प्रमुख यांनी अतिवृष्टी व पुर आपत्तीमुळे बाधितांना, आपदग्रस्तांना सवलती देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिल्या.

राज्यातील २५३ तालुक्यांमध्ये जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत (खरीप हंगाम) अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकाचे नुकसान, शेतजमीन खरडून जाणे, विहिरीचे नुकसान, मनुष्य व पशुहानी, घर पडझड, घरातील वस्तू/साहित्य नुकसान, वैयक्तिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. घरातील वस्तू/ साहित्य नुकसान, वैयक्तिक तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे राज्यातील २५३ तालुके अतिवृष्टी व पुरामुळे बाधित तालुक्के म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. दि. ०९ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये परभणी जिल्ह्यातील ०९ तालुक्यामध्ये बाधितांना / आपदग्रस्तांना विशेष मदत पॅकेज व सवलती लागू करण्यास शासन मान्यता दिली असल्याचे श्री. चव्हाण यांनी आदेशान्वये कळविले आहे.

### दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसानभरपाई जमा करा

### शिवसेना ठाकरे गटाची मागणी : तहसीलदारांना निवेदन : आंदोलनाचा इशारा

परभणी,/प्रतिनिधी : सप्टेंबर महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. काही ठिकाणी जनावरे वाहून गेली, तर पशुखाद्य आणि धान्य साठाही पावसाच्या पाण्यातून नष्ट झाला. या पार्श्वभूमीवर नुकसानभरपाईची रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी शिवसेनेने (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तहसीलदारांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, शासनाने याबाबत नुकसानभरपाई निधी वाटपाचे निर्देश दिले आहेत. परंतु, अलीकडेच जाहीर झालेल्या नवीन शासन निर्णयामुळे या रकमेचे वाटप पुन्हा विलंबित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दिवाळीचा सण जवळ येत असताना शेतकरी अडचणीत आहेत, त्यामुळे त्यांना दिलासा मिळावा म्हणून भरपाईची रक्कम तातडीने खात्यात जमा करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तहसील कार्यालयातील सुट्ट्या थांबवून शेतकऱ्यांना आर्थिक मदत वेळेत मिळावी, यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत, असेही निवेदनात नमूद आहे. जर दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली नाही, तर शिवसेना शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा देण्यात आला आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम -** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू -** शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मानवत येथे क्रीडा संकुल स्थापन करण्याचा मार्ग मोकळा - आ. विटेकर

**महेश दिशागत**

**मानवत/प्रतिनिधी-** पाथरी विधानसभा मतदार संघातील खेळाडूंना दर्जेदार सुविधा मिळाव्यात, शहरी व ग्रामीण भागातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी आणि युवकांना राष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धांसाठी तयार करता यावे, या उद्देशाने मानवत येथे भव्य व सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. अशी माहिती पाथरी विधानसभा आ राजेश विटेकर यांनी छत्रपती संभाजी नगर येथील गोदावरी खोरे विकास महामंडला येथून दिली. या निर्णयामुळे मानवत व परिसरातील खेळाडूंना आता आधुनिक क्रीडा सुविधा मिळण्याची वाट उघडली आहे,




पूर्वीची मागणी आणि निर्णायक पाऊल आमदार राजेश विटेकर यांनी विधानसभेतील आपल्या पहिल्याच अभिभाषणात मानवत येथे क्रीडा संकुल उभारण्याची मागणी केली होती. या संदर्भात त्यांनी राज्याचे तत्कालीन क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्ता भरणे याना भेटून क्रीडा संकुल साठी लागणारी जागा ही जलसंपदा विभागाची असल्याने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना जागा देणे बाबत सविस्तर निवेदन पाठवून मानवत तालुक्यातील क्रीडाप्रेमी युवकांची परिस्थिती मांडली होती. या मागणीच्या अनुषंगाने १७ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या गोदावरी खोरे विकास पाटबंधारे महामंडळाच्या नियामक मंडळच्या बैठकीत मानवत येथील क्रीडा संकुलासाठी जागा देण्याचा ठराव पारित करण्यात आला. या निर्णयामुळे संकुल उभारणीचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. १७ ऑक्टोबर रोजी झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीस गोदावरी खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील , पाथरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश विटेकर , मानवत शहराचे युवा नेते डॉ. अंकुश लाड , मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पंकज आंबेगावकर , तसेच पाथरी बाजार समितीचे सभापती अनिल नखाते उपस्थित होते.

३ हेक्टरपेक्षा जास्त जागा संकुलासाठी उपलब्ध

**या निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करतो**

**आमदार राजेश विटेकर म्हणाले "मानवत तालुक्यातील युवकांना त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव देण्यासाठी आणि त्यांना राष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी हे क्रीडा संकुल मोलाची भूमिका बजावेल. हा प्रकल्प पूर्णत्वास गेला की मानवत तालुका संपूर्ण जिल्ह्यात क्रीडाक्षेत्रात आदर्श ठरेल." या निर्णयामुळे मानवत तालुक्याच्या विकासाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकले गेले असून, स्थानिक खेळाडू आणि क्रीडाप्रेमी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

**आ. विटेकर यांची प्रतिक्रिया त्यांनीदिली आहे.**

मानवत तालुक्यातील रत्नापूर येथे जलसंपदा विभागाच्या ताब्यात असलेली गट क्रमांक २४,१९,२०,२१ व २२ या क्षेत्रांतील एकूण ३ हेक्टर ३२ आर इतकी शासकीय जागा क्रीडा संकुलासाठी निवडण्यात आली आहे. सदर जागेचे मूल्यांकन व महामंडळाचा अधिभार धरून १ कोटी १ लाख ११ हजार ४६० रुपये इतकी रक्कम मानवत तालुका क्रीडा संकुल समिती भरण्यास तयार आहे त्यामुळे ही जागा क्रीडा विभागाकडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता, जो आता मंजूर झाला आहे.

क्रीडा सुविधांचा आराखडा या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या आधुनिक क्रीडा संकुलात धावपट्टी, फुटबॉल व क्रिकेटचे मैदान, इनडोअर गेम्स हॉल, जिम्नॅशियम, योगा सेंटर, जलतरण तलाव, प्रेक्षक गॅलरी आणि महिला व पुरुष खेळाडूंसाठी स्वतंत्र वसतिगृह सुविधा अशा सर्व सुविधा उभारण्याचा आराखडा तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे मानवत शहर आणि आसपासच्या ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रशिक्षण, सराव व स्पर्धांमध्ये सहभागासाठी आवश्यक पायाभूत सुविधा मिळतील.

## सेवा संस्थेमार्फत पूरग्रस्तांना मदत कीट वाटप

### ९ गावांमध्ये ५०१ कुटुंबांना आणि ३०० विद्यार्थांना मदत

**परभणी,/प्रतिनिधी :** सेवा संस्थेमार्फत पूरग्रस्तांना मदत कीट वाटप
९ गावांमध्ये ५०१ कुटुंबांना आणि ३०० विद्यार्थांना मदत

परभणी,दि.१५(प्रतिनिधी) : येथील सोशल एम्पॉवरमेंट ॲण्ड व्हालंटरी असोसिएशन आणि गुंज संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्ह्यातील विविध गावांमध्ये पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक साहित्य कीटचे वाटप करण्यात आले.

अलीकडील अतिवृष्टीमुळे अनेक भागांतील नागरिकांचे मोठे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर संस्थेने तातडीने मदतकार्य हाती घेतले. या उपक्रमांतर्गत एकूण ९ गावांमध्ये ५०१ कुटुंबांना आणि ३०० विद्यार्थांना मदत पोहोचविण्यात आली. या कीटमध्ये अन्न-धान्य, आवश्यक घरगुती वस्तू, कपडे तसेच स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य समाविष्ट होते. स्थानिक स्वयंसेवक, ग्रामपंचायतींचे प्रतिनिधी आणि संस्था कार्यकर्त्यांच्या सहकार्याने ही मोहीम यशस्वीरीत्या पार पडली.

दरम्यान, आपत्तीच्या काळात प्रत्येकाने मानवीतेच्या भावनेतून मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे. सेवा आणि गुंज संस्थेचा प्रयत्न हाच आहे की प्रत्येक गरजू कुटुंबापर्यंत मदतीचा किरण पोहोचावा, असे मत संस्थेचे कार्यकर्ते मुंजाजी कदम तसेच सुदाम शिंदे यांनी व्यक्त केले.

## परभणीत २६ नोव्हेंबर रोजी भव्य राज्यस्तरीय मॅराथॉन स्पर्धा

### भारतीय संविधानाच्या ७५व्या अमृत महोत्सवी निमित्त आयोजन : सिध्दार्थ हत्तीअंबीरे यांची माहिती

**परभणी,/प्रतिनिधी :** भारतीय संविधानाच्या ७५व्या अमृत महोत्सवी दिनानिमित्त येत्या २६ नोव्हेंबर रोजी परभणीत राज्यस्तरीय मॅराथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे यांनी दिली.

स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र ॲथलॅटिक्स असोसिएशन आणि परभणी जिल्हा असोसिएशनच्या मान्यतेने करण्यात आले असून, फक्त महाराष्ट्रातील खेळाडूंना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी असणार आहे. ही स्पर्धा विविध गटात होणार असून विजेत्यांना भरगच्च बक्षीसे देण्यात येणार आहेत.

पुरुष गट / १८ वर्षांवरील मुले (१० कि.मी.) - प्रथम बक्षीस १५ हजार, द्वितीय १० हजार, तृतीय ७ हजार याशिवाय प्रत्येकी ३ हजार चे ७ उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. १६ ते १८ वर्षे (६ कि.मी.) - प्रथम बक्षीस १० हजार, द्वितीय ७ हजार, तृतीय ५ हजार व प्रत्येकी २ हजार चे ७ उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच १४ ते १६ वर्षे (३ कि.मी.) - प्रथम बक्षीस ५ हजार, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार व प्रत्येकी १ हजारचे ७ उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जाणार आहेत. १२ ते १४ वर्षे गटासाठी (१.५ कि.मी.) - प्रथम बक्षीस २ हजार, द्वितीय १ हजार ५००, तृतीय १ हजार



तर प्रत्येकी ५०० चे ७ उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात येणार आहेत. तसेच १० ते १२ वर्षांखालील मुले गटासाठी (१ कि.मी.) - प्रथम बक्षीस २ हजार, द्वितीय १ हजार ५००, तृतीय १ हजार व प्रत्येकी ५०० चे ७ उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जाणार आहेत. रोख पारितोषिकांव्यतिरिक्त प्रत्येक गटातील १० खेळाडूंना कीट बॅग दिली जाईल. याशिवाय सर्व सहभागी खेळाडूंना प्रमाणपत्र व मेडल प्रदान केले जातील.

नोंदणीसाठी अंतिम तारीख १५ नोव्हेंबर आहे. त्यानंतर आलेल्या अर्जदारांना प्रवेश दिला जाणार नाही. प्रत्येक खेळाडू फक्त एका गटातच सहभागी होऊ शकतो. स्पर्धा संपल्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षिस वितरणाचे कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. नोंदणीसाठी रणजित (९४२३४४४४६७), प्रा. डॉ. गुरुदास लोकरे (९४२१४५९०८७), कैलास टेहरे (९८६०९१४५४०) यांच्याशी संपर्क साधता येईल. ऑनलाइन नोंदणी संदर्भातील अडचणीसाठी यमनाजी भाळशंकर (९७३०३८७४३), अब्दुल अन्सार (९९७०९९६०४४), गंगाधर आव्हाड (९८९०१९०६०८) किंवा अमोल नंद (९३०७६१७८३२) यांच्याशी संपर्क साधता येईल. स्पर्धा समन्वयक प्रा. डॉ. माधव शेजूळ (९४२२८७६८२५) यांच्याशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक हत्तीअंबीरे यांनी केले आहे.

## आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळयाचे आज होणार वितरण

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** गंगाखेड गेल्या काही दिवसांपूर्वी झालेली अतिवृष्टी आणि महापूर या नैसर्गिक संकटामुळे स्थगित करण्यात आलेला आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२५ येत्या रविवारी १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता शहरातील परळी रोडवरील साई वृंदावन लॉन्स येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. तसेच कार्यक्रमाचे औचित्य साधून ज्येष्ठ शिक्षण विस्ताराधिकारी, प्रसिद्ध शिक्षणतज्ञ तथा गुंजेगाव आदर्श शिक्षण पॅटर्नचे माजी मुख्याध्यापक व्यंकटराव ढेले यांचे मार्गदर्शनपर जाहीर व्याख्यान होणार असल्याची माहिती आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्कार समितीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

विद्यादानासारख्या पवित्र सेवेत अखंडित कार्यरत असलेले शिक्षक हे आपल्यासाठी कायम आदर्श आहेत. कारण, त्यांनी केवळ नोकरी म्हणून नव्हे, तर आदर्श विद्यार्थी आणि सुजाण नागरिक घडविण्याच्या ध्येयाने शिक्षकी पेशा स्वीकारला आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी आ.डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्या संकल्पनेतून गंगाखेड विधानसभा कार्यक्षेत्रातील शिक्षक बंधू आणि भगिनींसह शिक्षण क्षेत्रातील विविध पदावर आमदार रत्नदीप... विस्ताराधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना गौरविण्यात येणार असल्याचे प्रसिध्दीपत्रकात नमूद करण्यात आले आहे. शाळेची वर्गखोली ही केवळ शिकवणीची जागा नसून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्याचे पवित्र स्थान असते. आजच्या बदलत्या युगात शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षण अधिक सुलभ आणि प्रभावी केले आहे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, विषम ता यांना दूर करून सुशिक्षित, सुजाण आणि सशक्त पिढी घडविण्याचे कार्य शिक्षक करीत आहेत. त्यांचा प्रत्येक शब्द विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा पाया घडवतो, तर प्रत्येक कृती आदर्शाचा वारसा देऊन जातो. अशा शिक्षकांचे योगदान सम जिजीवनाच्या उन्नतीसाठी आणि राष्ट्रनिर्मितीसाठी अतुलनीय आहे. याच भावनेतून स्थानिक आ.डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. यावेळी पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे, तर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथुर यांच्यासह उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप घोन्शीकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी सविता बिरगे, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सुनील पोलास, गटविकास अधिकारी उदयसिंह सिसोदिया,एकात्मिक बालविकास अधिकारी म धुकर कदम,एकात्मिक बाल विकास अधिकारी मनीषा काळे,पालम गटशिक्षणाधिकारी सुभाष कार्यरत असलेल्या व्यक्तींसाठी आमदार रत्नदीप आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

### धनत्रयोदशिच्या दिवशी विविध पुजन

**परभणी,/प्रतिनिधी** : वसुबारस दिनांक १७ ऑक्टोबर पासून सुरु झाली असून काल धनत्रयोदशीनिमित्त व्यापारी वर्गाने आपल्या दालनात विधिवत असे लक्ष्मीचे पुजन केले. यावेळी व्यापारी बांधवांनी आपल्या वार्षिक लेखाजोखा असलेल्या वह्यांचे देखील मनोभावे असे पुजन केले होते. यावेळी सायंकाळी शिवाजी चौकातील व्यापाऱ्यांनी दुकानाबाहेर आकर्षक असे दिवे लावलेले दिसून आले व आतिषबाजी झालेली दिसून आली.

# दिव्यांगांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रयत्न करावे -जिल्हाधिकारी

## दिव्यागांप्रती संवेदनशीलता व जागृती कार्यशाळा संपन्न

**परभणी,/प्रतिनिधी-** दिव्यांग बांधवांना सक्षम करण्यासाठी सर्वांनी त्यांना सहकार्य करावे. तसेच त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठीही प्रयत्न करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित दिव्यांग वैश्विक प्रमाणपत्र वाटप शिबिर व दिव्यांगा प्रती संवेदनशीलता व जागृती या एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनपर भाषणात श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, जिल्हा परिषद जिल्हा आरोग्य अधिकारी एस.बी. पांचाळ, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पी.एम. लांडे उपस्थित होते. श्री. चव्हाण म्हणाले की, दिव्यांग बांधव आपल्यातलाच एक माणूस असून त्यांच्यामधील प्राविण्य ओळखून त्यांना सक्षम करण्यासाठी सहकार्य करावे. दिव्यांग बांधवांना मदत करताना त्यांचा स्वाभिमान दुखवला जाणार नाही, यांची काळजी आपण घेतली पाहिजे. दिव्यांग बांधवाना आवश्यक त्या सोयी सुविधा मिळण्यासाठी प्रशासनाकडून निश्चितपणे कार्यवाही केली जाईल. दिव्यांगासाठी शासनाच्या अनेक योजना आहेत. त्याचा लाभ दिव्यांग बांधवांनी घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी



यांनी केले. पोलीस अधीक्षक श्री. परदेशी यांनी आपल्या मनोगतात दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी बनविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा. त्यांना कुठल्याही प्रकारे अडचण भासणार नाही याची दक्षता समाजातील प्रत्येक नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी पी.एम. लांडे यांनी केले. सुरवातीला प्रातिनिधीक स्वरूपात दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग वैश्विक प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यशाळेस दिव्यांग बांधव, विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख यावेळी उपस्थित होते.

## कर्तृत्वाचे आकाश

**निकिता गावंडे**/९९७०६६३८१३

# जीना इसी का नाम है!



आठ तारखेला आम्ही नागपूरला आलो. दहा तारखेला आमचं लग्न ठरलं होतं. पण, संजयच्या मित्राला १० तारखेला महत्वाचे काम असल्यामुळे महिनाभरापूर्वी ठरलेली लग्नाची तारीख मिनिटभरात बदलली व ९ तारखेला लग्न केलं. लग्नाचा खर्च होता तब्बल २३ रुपये!' आजच्या काळात एखाद्या सिनेमाची स्टोरी वाटेल अशी घटना आपल्याशी शेअर करणारे एक अफलातून शिक्षक दांपत्य म्हणजे सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या डॉ.संध्या पवार व त्यांचे यजमान प्रा.संजय पवार! जिल्हा परिषद शिक्षिका एवढी संध्याताईंची ओळख मर्यादित नाही. डोळ्यात कर्तृत्वाचे तेज, हिंदी-मराठीवर असामान्य प्रभुत्व असून, मातीशी नातं सांगणारी व बोलण्यात पराकोटीचा खमकेपणा असणारी ही 'झेडपीची मास्तरीण' दारूबंदीचे कार्य करते. अल्कोहोलिक अनॉनिमस या जागतिक पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थेत ती पदाधिकारी आहे. पालकमैत्रीकरिता गावोगावी फिरते, व्याख्याने देते. कुणाकडून एका रुपयाची मदत घेत नाही किंवा कुठली देणगीही स्वीकारत नाही. केवळ स्वतःच्या बळावर ४० मुलींचे पालकत्व निभावणारी ही मायबाई! त्यांच्या या कार्यात बरोबरीचा वाटा असणारे, प्राध्यापक म्हणून कार्य करतानाच बेरोजगारी निर्मूलनासाठी जीवाचं रान करणारे त्यांचे यजमान संजय! समर्पित सहजीवनाचे इतके सुंदर उदाहरण दुसरे मिळणार नाही.'संन्याशांचा संसार करणं कठीण असतं गं,' त्या हसत बोलतात. दोघेही वेगवेगळ्या जातींचे असले तरी त्यांचा प्रेमविवाह नाही, ठरवून केलेले लग्नही नाही. ते आहे ॲडजस्टमेंट मॅरेज! 'ही अनोखी गाठ कोणी बांधली?' हे गाणं जणू यांच्यासाठीच लिहिलेलं आहे. या जोडीला एकत्र आणलं ते समर्पण या एकाच भावनेने! 'शिक्षणाप्रती, समाजाप्रती एकमेकांचे असलेले संपूर्ण समर्पण जपण्याचा, निभावण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न म्हणजे आमचे सहजीवन,' संजयराव सांगतात. लग्न करून त्यांनी संध्याताईंना त्यांच्या दोन खोल्यांच्या घरात आणले. संध्याताईंची आई, भाऊ आणि खोलीवर आधीपासून शिकायला असलेले त्यांचे दोन मित्र अशा त्यांच्या सार्वजनिक संसाराला सुरुवात झाली. 'आता या मुलांचे शिक्षण संपले तेव्हा हे जातील,' संजयरावांनी आपल्या नवपरिणीत पत्नीला म्हटले. त्यावर ती उद्गारली, 'आणखी कोणी येत असेल तर येऊ द्या. आपल्याबरोबर राहतील. आपण जे खाऊ ते खातील. कोणाचे शिक्षण थांबायला नको.' आणि, मग हे नित्याचेच झाले. एकेक करत मुले-मुली येत गेले. हक्काने त्यांच्या घरी राहत गेले. आजतागायत ही परंपरा सुरू आहे. असे करता करता हे दांपत्य ४० लेकरांचे आईबाप झाले. त्यांच्या लेकी दिवाळीला घरी येतात. चार दिवस आनंदाने राहतात. भला मोठा फराळ घरी तयार होतो, शंभराच्या वर पाकिटे भरली जातात, ज्यांनी कधी फराळाची चव घेतली नसेल अशा लोकांसाठी! त्यांच्या मुली आज वेगवेगळ्या क्षेत्रात आपले कर्तृत्व गाजवत आहेत. अनेक मुली लग्न करून आपापल्या संसारात सुखी आहेत. त्या मुलींना आपल्या घरी ठेवत असताना त्या त्यांचे आडनाव विचारत ना जात-पात! गरबा करण्यास पाठविण्याएवजी त्या मुलींना कराटे शिकायला पाठवतात. जोपर्यंत तुम्ही आपल्या जीवनाचे ध्येय साध्य करत नाही तोवर बाकीचे डिस्ट्रॅक्शन हवेत कशाला? हे त्यांचं म्हणणं आहे.

समाजकार्य करत असतानाच संध्याताईनी कधीच आपल्या संसारिक कर्तव्यात कसूर केली नाही. एकदा बेरोजगारांसाठी एक मोर्चा नागपूरला आला होता. त्या संपूर्ण मोर्चाला या दांपत्याने स्वतःच्या हाताने स्वयंपाक करून खाऊ घातले.



पुस्तकं लिहिणारी ही बाई इतक्या स्पीडने भाकरी थापते यावर खाणाऱ्यांचाही विश्वास बसत नव्हता. आंध्र प्रदेशातील मुकुटबन या लहानशा गावात जन्मलेल्या या बाईंना वाचनाचे प्रचंड वेड! किरणापूर गावात दारूबंदीचे कार्य करत असताना अनेक सुंदर अनुभव त्या सांगतात. त्या १५ ऑगस्टला लोकांना दारू सोडण्याविषयी आवाहन करायच्या आणि २६ जानेवारी पर्यंत जो दारू पिणार नाही, अशा व्यक्तीचा सत्कार करायच्या. आपण दारूबंदीची तर शपथ घेतली आता दारू कशी प्यायची, या नैतिक दडपणामुळे अनेकांनी दारू सोडली. पण, त्यातील काही अट्टल दारूबाज शपथ घ्यायला तयार नव्हते. तेव्हा त्यांनी पत्र मैत्री हा उपक्रम राबवला. त्या अंतर्गत दारू पिणाऱ्या वडिलांना मुलांनी पत्र लिहायचे होते. त्या पत्रांचे एका कार्यक्रमात सामूहिक वाचन करण्यात आले. एका लहान मुलीने तिच्या वडिलांना इतके भावुक करणारे पत्र लिहिले की, पत्र वाचत असताना तिचे वडील रडायलाच लागले आणि त्यांनी यापुढे दारूला कधीही न शिवण्याची शपथ घेतली.

कुमार वयातील मुलांमध्ये वाढत असणारी व्यसनाधीनता हा प्रश्न आजच्या घडीला ऐरणीवर आहे. संध्याताई या प्रश्नावरचा उपाय म्हणून पालकमैत्री हा उपक्रम राबवतात. 'पोरांचे डोळे म्हणजे कॅमेरे असतात गं. ते तुमच्या प्रत्येक हालचाली टिपतात. मुलांच्या वर्तनात झालेला बदल पालकांना टिपता यायला हवा.' पालकमैत्री या त्यांच्या उपक्रमात त्या गावोगावी फिरून व्याख्यान देतात, समुपदेशन करतात.

'३६ वर्षाच्या संसारात या माणसाचा पूर्ण पगार मी कधीही पाहिला नाही,' संध्याताई हसत हसत सांगतात. संजयरावांनी कित्येक मुलांची फी भरली पण कधीही त्याची नोंद ठेवली नाही. ज्याला गरज होती त्याला आपल्याला शक्य झाले म्हणून मदत केली. यात कसला आलाय मोठेपणा! मी तर फक्त माणूस म्हणून आपले कर्तव्य पार पाडले, हे संजयरावांचे म्हणणे खरंच किती विचार करण्याजोगे आहे. बेरोजगारी निर्मूलनाच्या आपल्या कामात आजपर्यंत कुठेही खंड पडू दिला नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी ते सध्या कार्यरत आहेत.

कुठल्या मातीची बनली असतील हे माणसे? स्वतःच्याच काय पण इतरांच्याही कामाचे श्रेय लाटणाऱ्या माणसांची गर्दी असलेल्या या युगात ज्या दोन टक्के लोकांनी माणुसकी जिवंत ठेवली, ते हे लोक आहेत. 'आम्ही कोणाकडून एक रुपयाही घेणार नाही. कुठली संस्था ही काढणार नाही की देणगीही घेणार नाही,' कुठून येतो हा दृढनिश्चय? हे दाम्पत्य म्हणजे जगण्याची कला शिकविणारे एक विद्यापीठच आहे.

**तेरा तुझको अर्पण, क्या लागे मेरा?**

या ओळींना अक्षरशः जगणाऱ्या या निष्काम कर्मयोगी दाम्पत्याला त्यांच्या पुढील कार्यासाठी मनापासून शुभेच्छा!

---

## संघ हिच जीवनगाथा


**सुरेखा काणे**/९९६०० ५३५२१

# गंगोत्री

स्वातंत्र्यपूर्व हिंदुस्थानात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदी अशा अनेक धर्माचे लोक रहात आणि या सर्वांची एकी हवी होती. याविषयीच्या चर्चेतूनच संघाची उज्ज्वल प्रतिमा डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या मनात फेर धरू लागली. संघटन करण्यासाठी शुद्ध राष्ट्रीय संस्कार व परस्परानुकूल स्नेहमयी स्वभाव हा संघटकाचा स्थायी धर्म असावा लागतो.

तो पूजनीय डॉक्टरांच्या ठायी होता. १९२५ च्या विजयादशमीच्या सुमुहूर्तावर आपल्या घरी पंधरा-वीस जणांना बोलावून डॉक्टरांनी सर्वांना 'आपण आज संघ सुरू करत आहोत', असे सांगितले. पुढे १७ एप्रिल १९२६ ला सर्वानुमते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नामकरण झाले. राष्ट्र म्हणजे परस्पर विरोधी परंपरा, संस्कृती व भावभावना असलेल्या लोकांची मारून मुटकून बांधलेली मोट नसते तर धर्म, संस्कृती, देश, भाषा व इतिहास या साधर्म्यातून आपण सर्व एक आहोत हे राष्ट्रीय या संकल्पनेतून सिद्ध होते. राष्ट्रसेवा करण्यासाठी स्वतःहून अग्रेसर होतो तो स्वयंसेवक व या हिंदू राष्ट्राभिमानी स्वयंसेवकांचे एकत्रीकरण करणारी संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ!

डॉक्टरांनी अद्भूत शाखा पद्धतीचा आविष्कार केला ज्यामुळे अति उत्कट राष्ट्र चेतना जागृत करणे सहजशक्य झाले. आज शाखेत प्रतिदिन बहुमुखी कार्यक्रम होतात पण, प्रत्येक ठिकाणी 'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' हीच सामूहिक प्रार्थना होते. आपल्या महापुरुषांचे अमृत वचन, त्यांची यशोगाथा सांगणारे गीत किंवा गोष्ट सांगतात. वर्तमान राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करतात. प्रतिदिन एकात्मता स्तोत्र आणि एकात्मता मंत्र म्हणतात. त्यामुळे स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत होते. हिच व अशीच एक तासाची दिनचर्या साप्ताहिक व मासिक शाखेत तसेच गावोगावच्या शिबिरात पण करतात. सारेच सहभागी यामुळे संपूर्ण राष्ट्र एक कुटुंब ही संकल्पना प्रत्यक्ष



अनुभव करतात. पुढे डॉक्टरांच्या संस्कारांमुळेच संघ स्थापनेपासून आजपर्यंत अनेक क्षेत्रात म्हणजे बौद्धिक, नैतिक, धार्मिक, सामाजिक, शारीरिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात सिमोल्लंघन प्रयत्नपूर्वक झाले. उदाहरणार्थ व्यक्तिगत जीवनातून समष्टी जीवनाकडे, दास्याकडून स्वातंत्र्याकडे, निद्रेतून जागृतीकडे, दैन्यातून समृद्धीकडे, दौर्बल्यातून सशक्तीकरणाकडे असे सिमोल्लंघन झाले. मोठ्या प्रमाणावर जनजागरण झाले. गरजेनुसार साध्यं-सिद्धं-सिद्धता झाली. संघाच्या रूपात बलिष्ठ हिंदू राष्ट्र स्थापनेचा दिवस विजयादशमीच्या सूमुहूर्ताचाच ठरवला.

क्रमशः

---

# दिवाळीची लगबग... स्वच्छता घराची नि मनाची!

अगं! दिवाळी जवळ आली मंदाबाई! मला घर अंगण स्वच्छ करायचंय. मदत करशील तर ना! कपाटं आवरायची, जाळीजळमटं काढायचीत, सीलिंग फॅन पुसायचेत, दार-खिडक्या ही साबणाच्या पाण्याने पुसायच्या आहेत. नाहीतर वेळेवर नाही म्हणशील, म्हणून आधीच सांगून ठेवतेय.'

अजी, दरवर्षीच तर करते कामं! नका उगी काळजी करू... इति मंदाबाई!

**मंजिरी अनसिंगकर** /७०२०७५७८५४



दिवाळी जवळ आली की, हे चित्र घराघरात दिसतं. घर अंगण सफाई, नवीन वस्तु खरेदी, गिफ्ट-नवीन कपड्यांची खरेदी, रांगोळ्या, पणत्या...नुसती लगबग! घरादाराची स्वच्छता दिवाळीच्या निमित्ताने आवर्जून होते. कामं करता करता मनांत विचार आला, घराची तर स्वच्छता होऊन जाईल पण मनाचे काय? त्याचीही स्वच्छता व्हायला हवी नं! मनातही किती गोष्टी साठल्यात, जास्त निरूपयोगीच! द्वेष, मत्सर ,किल्मिष यांचीही सफाई व्हायलाच हवी. ही जळमटंही काढायलाच हवीत.

कधी कधी, आपण खूप गैरसमज करून घेतो. वरवर दिसणाऱ्या गोष्टीच खऱ्या मानतो.? कोणत्या परिस्थितीत एखाद्यानं वक्तव्य अथवा कृती केलीय हे जाणून न घेता, त्यांच्या मुळाशी न जाता उगाचच रागराग करतो. झालं, आपण संवादच कमी करता किंवा मग रागाने भडाभडा बोलतो. समोरचा दुखावतो हेही आपल्याला समजत नाही. हा नाकाच्या शेंड्यावरचा राग, हा विनाकारण क्रोध, माणसाचा तर मोठ्ठा शत्रू! ही क्रोधाची जाळी, शांत वागण्याबोलण्याने समजुतीने, सारासार विचाराने फाटायला हवीत. या रागापायी माणसं दुरावतील नाहीतर काय!

हव्यास, हावरेपणा, हाव किती तो वस्तू जमविण्याचा सोस! अर्ध्या वस्तू तर काही काळाने टाकून देण्याच्या लायकीच्या होतात. हा हव्यास मग तो कोणत्याही गोष्टीचा असो मनात ईर्ष्या निर्माण करतो. 'उसकी साडी मेरे साडीसे इतनी सफेद कैसे?' झालं! मनात इर्ष्येचं बीज पेरलं गेलं. मग नको असलेल्या वस्तूही विकत घेतल्या जातात. पैशाचा अपव्यय नुसता! आपली ऐपत, उपलब्ध जागा काही पाहीले जाते नाही. कधी कुणाची हुशारी-यश पाहूनही ईर्ष्या निर्माण होते.? प्रयत्न करायचे सोडून, नुसती ईर्ष्या काय कामाची? प्रगतीच्या आडच येणार ती! ही ईर्ष्येची विषवल्ली मनांत रूजूच द्यायला नको हो! केव्हा घात करेल, समजणारही नाही.

मद, माज बरा नव्हे. मग तो पैशाचा असू देत नाहीतर सौंदर्याचा, हुशारीचा किंवा शक्तीचा! माज उतरवणारा आयुष्यांत भेटतोच. मग खजील व्हायला होते.? गर्व माणसाला माणसापासून दूर करतो, माणुसकी विसरायला भाग पाडतो. या जगात जर कशाचीही शाश्वती नाही तर, मग कशाचा गर्व करायचा हो! काही लोकांना तर 'मी'पणाने एवढे पछाडलेले असते की, काही बोलायची सोय नसते. ज्याला त्याला आपला मोठेपणा सांगतात, शिष्टपणाने बोलतात, दर्पोक्ती जाणवते. ?संगतीचं खूप महत्व आहे. अशा लोकांच्या संगतीत राहिल्यास कुणालाही यांची बाधा होऊ शकते. अगदी स्वतःलाही! यासाठी सकारात्मक, विवेकी विचार मनात असायला हवेत, ठेवायला हवेत.

बाप रे! किती हा पसारा...कचरा साठतोय मनात! काम, क्रोध, ईर्ष्या, मीपणाचा अहंकार, गैरसमजुतींचा ढीग नुसता! केव्हा साफ होणार? यासाठी कुणी मदतीला येणार नाही हं! तो प्रत्येकाला स्वतःलाच साफ करायला लागतो. या पसाऱ्यपायी, किती अंधार दाटलाय मनात! मी, माझं, मीपणाचा, हेकेखोरीचा, कामक्रोधाचा, अज्ञानाचा अंधार दूर तर करायलाच हवा. डोळ्यांवरची ही झापडं दूर केल्याशिवाय निर्मळतेचा, सज्जनतेचा, आनंदाचा, सौख्याचा प्रकाश कसा आत येणार?

दिवाळीनिमित्त विचारांची शुद्धता हवी. चांगल्या लिखाणांचं वाचन करायला हवं. आपली धार्मिक पुस्तकंही खूप काही शिकवतात. शुद्ध सात्विक विचारांची बीजं पेरतात मनांत! चांगलं संगीत! हा आनंदच तर माणसाचं मानसिक आरोग्य राखतो तर, कुणाला ध्यानधारणा! नियमित व्यायामाने मानसिक, शारिरीक आरोग्य लाभते आणि हेच आरोग्य मनातला हा सगळा कचरा काढायला मदत करते किंबहुना असा कचरा मनात जमूच देत नाही. तर काय मग! मनातला हा कचरा साफ करायला दिवाळीच्या मुहूर्ताची गरज नाही हं! शुभस्य शीघ्रम्!

---

# हलकीफुलकी 'डिजिटल' भेळ!

मंडळी, चविष्ट पण चटपटीत भेळ खायला तयार आहात ना? तिखट, आंबट, खारट, गोड रेसिपीची भेळ म्हटलं की, आपल्या तोंडाला पाणी सुटतं. खमंग भाजलेले कुरमुरीत मुरमुरे, पोहे, शेव, बटाटा, कांदा, आमचूर, चिंचगूळ चटणी, चाट मसाला, पुदिना चटणी...बापरे! डोळ्यांसमोर गच्च भरलेली भेळेची डिशच दिसायला लागली. त्यावर चवीला बारीक शेव आणि हिरवीकंच कोथिंबीर! क्या बात है! अगदी असंच झालंय आपलं आयुष्य...सोशल मीडियामुळे! कसे? 'गाईज, खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा आणि जॉईन करा माझा फ्री वेबिनार, डिजिटल भेळ!'

मोबाईलच्या टोपलीतून आपण कधी फिन्स्टाग्रामची टम्म फुगलेली पुरी घेतो, शेव टाकतो, कधी केसबुकची आंबट गोड चटणी, गाट्सॲपची पुदिना चटणी, फ्युट्युबचा बटाटा आणि थोडा क्विटरचा चाट मसाला शिंपडतो! सगळं मिसळून झालं की, त्याचा आस्वाद घेत म्हणतो,'वा! काय मस्त चाललंय माझं आयुष्य!' विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे, या डिजिटल भेळीचा मुख्य घटक 'आपण' कुठे आहोत? आज डिजिटल मीडियावर मनाच्या वाडग्यात अनेक प्रकारच्या रेसिपींचे रस पडतात. त्याचा आनंद घेत मेंदूमधील डोपामाइन हार्मोन आनंद देण्यास सुरुवातच करणार तितक्यात ठेंगा दाखवून आपला अंगठा एव्हाना घरगुती औषध वापरून केस काळे कसे करायचे? यात गुंतला असतो. आपल्या मेंदूला वाटतं, अरे वा! छान आहे की, केमिकल्सची झंझटच नको. असा विचार मनात येतो ना येतो तोच ऐकू येतं,'दोस्तों, यह बुढी मां की तस्वीर हैं। जो लोग लाईक करते हैं, उनको आज शाम तक एक खुशखबरी मिल जायेगी!' मेंदू बिचारा इमोशनल होतो. डोळ्यातून आसवे यायला लागतात तोच कर्कश्श आवाज कानावर पडतो,'किस सोच में डूबे हो? जिंदगी मे हारने से अच्छा जीतना है। चलो, उठो, निकल पडो!' डोळ्यांत आलेली आसवे परतवायची वेळ येते हो! लगेच चेहऱ्यावर हसू उमलतं! मनाचा एक कोपरा समाधानाने भरतच असतो तोच समोर लावण्याचा बहर आलेली हिरोईन आपल्याला खुणावते आणि कानाला आस्वाद घेण्यास 'मजबूर' करते.'अठरा बरस की कुंवारी कली थी...' हे गाणं नजरेसमोर येतं. आहा...काय नाचते पोरगी? ते बघण्यात मन रमतं आणि जीवन किती सुंदर आहे? असं भासायला लागतं. ते गाणं बघून डोळ्यांचे पारणं फिटतं ना फिटतं तेच नजरेसमोर येतं,'आपकी शादी किससे होगी? आपकी शादी कब होगी? जानना चाहते हो? चलिए मेरे साथ!' अरे हो! हे ही एक काम आपलं राहिलंच की हो! दुसऱ्याच क्षणाला गोंडस चेहऱ्याच्या मुखातून जाड्या भरड्या आवाजात कॉमिक रिल्स समोर येतात. जीवनात 'फन' नसेल तर काय मज्जा? अशा अविर्भावात मजा घेत असतानाच,'आईये आपको ले चलते है मुंबई में! चारो तरफ पानीही पानी। कौन जिम्मेदार है? क्या सरकार से मदद मिलेगी?'

जगभरातील पावसापाण्याच्या बातम्या बघून मन खिन्न होतं. वाटतं, आपण जरी आनंदात आहोत पण या गरिबांचे काय? असा सोशल मेसेज मनात तयार होतोच तर झोपेतून जागं झाल्यासारखं मन भानावर येतं.'गाईज, काय विचार करता? स्वतःशी निगडित रहा. तीस मिनिटे स्वतः सोबत राहून स्वतःची प्रगती करा. तीस मिनिटांचे ध्यान तुमचं जीवन बदलवून टाकेल.' आपलं मन थोडं विचलित होतं. वाटतं, नको बाबा लोकांचे विचार करायला. सरकार बघून घेईल.

चला, आपण रोज योगा केला पाहिजे. करू या? आत्ताच करू या. मेडिटेशनला सुरुवात करतो. डोळे बंद केले असले तरी, नजरेसमोर आता बघितलेल्या सगळ्या रिल्स सरकतात आणि वाटतं असं कसं ध्यान करण्यात मन

**सुचित्रा बाकरे (शेंडे)**/९९७५७४३८८४

लागणार? मन शांतच नाही आहे. राहू दे... उद्यापासून सुरुवात करू, असं म्हणेम्हणेपर्यंत हात सहज पुन्हा मोबाईलकडे वळतो आणि स्क्रोल करणं सुरू होतं. समोरच एक सुंदरी आपल्याकडेच बघत 'एक नंबर, तुझी कंबर' हे गाणं म्हणते. मनातच मन नाचायला लागतं हो! मेंदूमध्ये पुन्हा आनंदाचे तुषार तयार होऊन, मन शरीराला नाचवण्यासाठी उत्तेजित करतंच. पण, पुन्हा आपला अंगठा जागा होतो, स्क्रोल करायला लागतो आणि ब्रह्मकुमारी दीदी विश्वाचे ज्ञान देताना दिसते. मनाची विस्कटलेली घडी कशीबशी नीट करतच असतो तर, इतक्यात गुरुजी सांगतात, 'कितना मन को मारोगे, ये नही करना, वो नही करना, इतने बजे उठना है, मन को शिस्त लगाना है, कुछ नहीं। मै कहता हूं छोडो ये सब। यह छोटीसी जिंदगी है, जियो अपने मनसे। जब जब जो करना है, करलो अपने खुशी से।'

पुन्हा मन बावरतं. बाबा काय करावं? आपल्या कॉन्शिअस माईंड, सबकॉन्शिअस माइंडला काही कळतच नाही. ते काम करणंच बंद झालेलं असतं. एव्हाना आपला मेंदू, मन, डोळे, अंगठासुद्धा थकला असतो. झटकन फोन बाजूला ठेवतो, उठतो आणि बघतो तर काय संध्याकाळ झालेली! संध्याकाळची कातर वेळ, सांज फुललेली! घराच्या दरवाजातून दूरवर नजरेसमोर सूर्यास्ताचा नजारा! वाटतं, किती मोहक हे नैसर्गिक सौंदर्य! आपल्यासमोरच्या या नजाऱ्याला आपण आज मुकलो असतो, इमोशनल होतो, डोळ्यांच्या कडा ओलावतात, आठवणी जाग्या होतात. मनात हळूच गाणं डोकावतं,'डोळ्यात सांजवेळी, आणू नकोस पाणी...' अलगद आसवे पुसून घेत स्वतःला सावरतो. दिवसभराची राहिलेली कामं करताना घराची, मनाची विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसवतो आणि निर्धार पक्का करतो की, आता पुन्हा नको तो मोबाईल, नको तो सोशल मीडिया!

एक सुजाण नागरिक म्हणून विचार डोक्यात घोळतो की, खरंच मोबाईल एक शाप की वरदान? उत्तर येतं, अर्थात वरदान! हो, मग काय? एकटेपणा जाणवत नाही, एका क्लिकवर सगळ्यांशी संपर्क साधता येतो. 'जे पाहिजे ते घे' या आधुनिक उक्तीप्रमाणे पाहिजे ते मिळतं. एंटरटेनमेंट, माहिती, ज्ञान, योगा, मेडिटेशन, पैसा इत्यादी 'फ्री ऑफ कॉस्ट' उपलब्ध आहे. मग काय वरदानच की! पण दुसरं मन सांगत असतं. हे जरी सगळं खरं असलं तरी, तुझी क्षमता कमी होत चालली आहे. काही वर्षांनी ती थांबून जाणार. सवयच नसणार विचार करण्याची! किती ही डिपेंडन्सी? विचार करणं हे जिवंतपणाचं लक्षण आहे. शिवाय, तू स्वतःलाच कन्फ्युज करतेस. अशी दोन मनांची चलबिचल होत असताना तिला जाणवतं की, खरंच विचार करायला लावणारी गोष्ट आहे. नाही रे बाबा...काही खरं नाही आपलं आता! माझी क्रिएटिव्हिटी मलाच दाखवायला हवी. मी आता मोबाईलपासून दूर राहणार आणि सोशल मीडियापासूनसुद्धा... असा मनाशी निर्धार करते. उद्यापासून मी खूप मेहनत करणार आणि माझं काम मी पूर्ण करणार!

स्वतःच्या मनाशी बोलते. उद्या कशाला? आत्ताच बसते ना! वही, पेन घेऊन बसते आणि एक कामाची, वस्तूंची लिस्ट बनवते. चला...आता कामाची लिस्ट तयार झाली. तयारीला लागू या. उद्या सकाळीच सगळे सामान घेऊन येते आणि कामाला लागते. दुसऱ्या क्षणी मन म्हणतं...अगं, वेडी आहेस का? कशाला पेट्रोल वेस्ट करते? सगळ्या ठिकाणी सेल सुरू आहे ऑनलाईन! काही वस्तू आपल्याला स्वस्त पडतील. आत्ताच चेक कर. तिच्याही नकळतपणे ती मोबाईल हातात घेते. आतुरतेने वाट बघत असलेले कान टवकारतात आणि ऐकतात,'वेलकम फॉर ग्रँड मॅनिफेस्टेशन! पता है आपको मॅनिफेस्टेशन क्या है? ओन्ली मॅजिक बुक पढने से कुछ नही होगा। आईये, मै आपको पाच लाख रुपये महिना दिलवा सकता हूं। कैसे? नीचे दिए हुए लिंक पर क्लिक करिए और तुरंत जॉईन करिए मेरे फ्री वेबिनार को! आपको आपके प्रश्न का उत्तर मिल जायेगा।' मनात येतं काय नवीन आहे बघू तर, चला जॉईन तर करू, फ्री तर आहे सध्या! खरंच आपण किती मूर्ख आहोत. जर 'मॅनिफेस्टेशनने' इतका अमाप पैसा मिळणार असेल, तर कशाला काम वगैरे करायचं? उद्यापासून हेच करू या. चला, आणखी रिल्स बघू या.

लगेच समोर येतो एक मेसेज,'किस चिंता में डूबे हो? क्या आप मेनिफेस्टेशन करते हो? ओन्ली मेनिफेस्टेशन से कुछ नहीं मिल सकता। ग्रॅटिट्युड व्यक्त करोगे, और वह भी मेरे तरीकोंसे... तो ही आप मंजिल तक पहुंच सकते हैं। क्या है ग्रॅटिट्युड? चलिए मेरे साथ ज्वाइन करिए, मेरा फ्री वेबीनार।'

मनामध्ये एक नकारात्मक विचार येतो. खरं काय, खोटं काय? भास काय, आभास काय? काहीच निश्चित करता येत नाही. आपल्याला काहीच येत नाही. आपण या जगामध्ये कुठेच स्टॅन्ड होत नाही. मग आपल्या जगण्याचं ध्येय काय? उद्दिष्ट काय? हा नकारात्मक विचार मनामध्ये येतो आणि डिप्रेशनचे कारण होऊन उभरायला लागतं. खूप गोष्टी एकाच वेळी करणे म्हणजे या मल्टी टास्किंगमुळे कुठेच कॉन्सन्ट्रेट करता येत नाही आणि पदरी काय तर भलं मोठं शून्य! ही आहे आजची सोशल मीडिया स्टोरी!

इथेच मन थांबत नाही. हा विचार मनातून बाजूला सारत पुन्हा नकळत हात मोबाईलकडे वळतो. जीवनाची यथाकथित कथा कंटिन्यू करतो. त्या मोबाईलवरूनच एक पिझ्झा आणि चटपटीत भेळ ऑर्डर करतो आणि रिल्सची मजा घेत, या जीवनाची कॉमेडी करत, कॉमेडी शोज बघत आयुष्य ढकलत असतो. डोळे, मेंदू, कान आणि जाणीवा बोथट होत जातात, अशा नशेतील लोकांकडे सोशल मीडिया उपहासाने बघतो.

अहो, तुमच्यातलीच मी! माझ्यासुद्धा आत्ताच लक्षात येत आहे. आपलं आयुष्य कधी स्लीप मोडमध्ये जाईल हे आपल्यालाच कळणार नाही. डिजिटल भेळीतून वाचायचं असेल, जीवनाचा निखळ आनंद घ्यायचा असेल तर थोडं विवेकाचं मीठ, थोडं संयमाचा मसाला, आणि थोडं ध्यानाचं तेल घालावं लागेल. कारण,

डिजिटल भेळेत माहिती आहे पण, ज्ञान नाही हो, मैत्री आहे पण, नातं नाही.

मंडळी, नव्या जुन्याचा संगम हा असावाच. त्याशिवाय, जीवन बॅलन्स होत नाही. पण, किती असावा याचं भान ठेवणं गरजेचं आहे. नाहीतर हे शरीर 'ऑनलाइन' राहील पण, आत्मा मात्र 'ऑफलाइन' होईल!

आणि म्हणूनच, दिवाळीच्या या प्रकाशमान सणाच्या काळात, जेव्हा आपण घरात मातीच्या दिव्यांनी उजेड पसरवतो, तेव्हा आपण एक क्षण आपल्या मनाच्या आंगणातही दिवा लावू या. लक्ष्मी म्हणजे फक्त संपत्ती नव्हे, ती आहे प्रकाश, शांती, समाधान आणि सजगता यांची देवी. ती त्या घरात वसते, जिथे 'डिजिटल स्क्रीन'पेक्षा 'मनातील विवेकाची स्क्रीन' उजळलेली असते. स्वतःच्या मनातील सद्विवेकाच्या प्रसादाची वाटणी करून, या दिवाळीत एक संकल्प करू या. फक्त घर सजवायचं नाही, मनही उजळवायचं. थोडं कमी स्क्रोल, थोडं जास्त स्मित! थोडं कमी 'ऑनलाइन', थोडं जास्त 'ऑफलाइन'!




**दिवाळीच्या या प्रकाशमान सणाच्या काळात, जेव्हा आपण घरात मातीच्या दिव्यांनी उजेड पसरवतो, तेव्हा आपण एक क्षण आपल्या मनाच्या आंगणातही दिवा लावू या. लक्ष्मी म्हणजे फक्त संपत्ती नव्हे, ती आहे प्रकाश, शांती, समाधान आणि सजगता यांची देवी. ती त्या घरात वसते, जिथे 'डिजिटल स्क्रीन'पेक्षा 'मनातील विवेकाची स्क्रीन' उजळलेली असते. स्वतःच्या मनातील सद्विवेकाच्या प्रसादाची वाटणी करून, या दिवाळीत एक संकल्प करू या. फक्त घर सजवायचं नाही, मनही उजळवायचं. थोडं कमी स्क्रोल, थोडं जास्त स्मित! थोडं कमी 'ऑनलाइन', थोडं जास्त 'ऑफलाइन'!**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बालस्वरांनी उजळली बालरंगभुमीची दिवाळी पहाट



तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

बालरंगभुमी परीषद शाखा बीडच्या वतीने शहरातील बालकलावंतासाठी आयोजित केलेली सुरमयी दिवाळी पहाट अत्यंत उत्साहात संपन्न झाली. बालरंगभुमी परिषद मुख्य शाखा मुंबईच्या उपाध्यक्षा तथा बालरंगभुमी परिषद शाखा बीडच्या अध्यक्षा डॉ. दिपाताई क्षीरसागर यांनी एक अभिनव उपक्रम राबवला. दिवाळी पहाट ही बालकलावंताची असावी या कल्पनेतून आज धनत्रयोदशीच्या दिवशी बीड मधील ५० ते ७५ कलावंतानी बालरंगभुमीच्या व्यासपीठावर दिवाळीची गाणी भक्तीगीते, भावगीते सादर केली. याकार्यक्रमाची सुरुवात गार्गी जोशी हीच्या गणेशवंदना या भरतनाटय नृत्याने झाली. यानंतर अंध असूनही दिवाळीचा आनंद व्यक्त करणारे गीत आली माझ्या घरी दिवाळी हे गीत अत्यंत मधुर स्वरात विशाखा वरकटे हिने सादर केले तर अर्णव खडकीकर याने निघालो घेवून दत्ताची पालखी हे गीत सादर केले. यात धुतेकर संगीत विद्यालयाच्या विद्यार्थी तन्वी दहिवाळ, सचिन मार्गे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, नरहरी दळे संगीत विद्यालयाचे विद्यार्थी, देव मुळे , वेदांत काजळे, स्वराली साळुंके, देवकी साळुंके, शांभवी राउत, आदीती मेहकर, वैभवी वायकर, तन्वी घिगे, सुहास जाजु, गौरव माने, अनन्या सरवदे, इशा सरवदे या कलावंतानी अप्रतीम अशी श्रवणीय गीते सादर केली. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बालकलावंत सुरभी निराळे हिने केले. याप्रसंगी सहभागी बालकलावंताना प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी दि. १५ ऑक्टोंबर रोजी घेण्यात आलेल्या पणती रंगवणे व गडकिल्ले बनवणे या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले. याकार्यक्रमाला डॉ. सौ. दिपाताई क्षीरसागर, जेष्ठ गायक भरतअण्णा लोळगे, जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे, दिपक मुळे, वासुदेव काजळे, सुदर्शन धुतेकर, प्राचार्य शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमविचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, डॉ. राहुल सोनवणे, प्रा. दिपक जमदाडे, प्रा. मिलींद शिवणीकर, प्रा. सुरेश थोरात यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुराधाताई चिंचोलकर, नामदेव साळुंके, अमित गाडे, बाबासाहेब कांबळे, विजय राख यांनी सहकार्य केले.

# १६४ दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप

तभा वृत्तसेवा
गेवराई दि.१८ ऑक्टोबर

गेवराई विधानसभा मतदार संघातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवार कटिबद्ध आहे. शासकीय योजनांचा दिव्यांग बांधवांना लाभ मिळवुन देण्यासाठी जाणिवपुर्वक प्रयत्न करत असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. धनत्रयोदशीच्या शुभ मुर्हतावर त्यांच्या शुभहस्ते १६४ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या मंजुरी पत्राचे सन्मानपुर्वक वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नायब तहसिलदार संजय सोनवणे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी नगरसेवर राधेशाम येवले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधवांना शासकीय योजनांचा लाभ मिळवुन देण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या कार्यालयात वेगळा कक्ष कार्यान्वीत करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी शिवछत्र परिवाराकडुन जाणिवपुर्वक प्रयत्न होत आहेत. शनिवार दि. १८ ऑक्टोबर रोजी कृष्णाई कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात १६४ दिव्यांग बांधवांना संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मंजुरी पत्राचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या शुभहस्ते सन्मानपुर्वक वितरण करण्यात आले. यापुर्वी ४० दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दिव्यांग बांधवांचे प्रश्न मार्गी लागत असल्याचे समाधान यावेळी लाभार्थ्यांच्या चेहर्यावर दिसत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसिलदार संजय सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाला गेवराई तालुक्यातील दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपस्थितांना दिपावलीच्या शुभेच्छा दिल्या तर शिवछत्र परिवाराच्या वतीने दिपावली निमित्त आयोजित केलेल्या स्नेहभोजनाचा लाभ दिव्यांग बांधव व उपस्थितांनी घेतला.

# कै.तुकाराम गुरूजी गोधाममध्ये वसुबारस साजरी

**रस्त्यावरील मोकाट गोमातेच्या रक्षणासाठी समाजाने पुढाकार घ्यावा.. राजेंद्र मस्के**
**प्रत्येक गाईचे रक्षण राष्ट्रधर्म..!**

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

आज गोवत्स द्वादशी वसुबारस निमित्ताने कै.तुकाराम गुरुजी गोधाम प्रकल्प शिवदरा पालवण येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ.जयश्रीताई मस्के यांनी सहकुटुंब पारंपरिक पद्धतीने पुजन करून गोमातेचेच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करत वसुबारस सण साजरा केला.

दीपावली पर्वाचा प्रारंभ वसुबारस सणापासून सुरू होतो. खऱ्या अर्थाने वसुबारस सण म्हणजे मातृत्व, संवेदनशीलता आणि कृतज्ञतेचा हा सण! आधुनिक काळातही हा सण आपल्याला स्मरण करून देतो की, शेती, निसर्ग आणि जनावरांशी आपले नाते हे केवळ उपजीविकेचे नाही, तर संस्कृतीचे आहे. हिंदू धर्मात गाय ही आईच्या दर्जाची पूजनीय तर असुन संस्कृतीचे प्रतीक आहे. अनेक कुटुंबांसाठी उपजीविकेचे साधन आहे. ग्रामीण भागात वसुबारस सादर करण्याची पुरातन पद्धत आहे. आनंदाने आणि प्रेमाने साजरा करतात. ग्रामीण अर्थकारणात गोवंशाचे योगदान आजही अतुलनीय आहे. परंतु गोमातेचीवसुबारसच सणाच्या एका दिवसा पुरती पूजा आरती नको तर वर्षभर गोमातेच्या रक्षणाचा संकल्प करावा लागेल. आज गोमाता व गोवंशाची परिस्थिती लक्षात घेता ती जिवंत राहिली, तरच शेतकऱ्यांची शेती, दुधाचा जोडधंदा आणि संस्कृती टिकून राहील. प्रत्येक गायीचे रक्षण हा राष्ट्रधर्म ठरला पाहिजे. गोमातेचा सन्मान कृतीतून दिसला पाहिजे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे



जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी वसुबारस गोमाता पुजन निमित्ताने केले आहे.

जिथे गोमातेचा सन्मान येथे समृद्धी नांदते यावर हिंदू धर्मीयांचा अतूट विश्वास असल्यानेआनंदी जीवनासाठी अंगणात गाय बांधून संगोपन केले जाते. सर्वत्र गोहत्या बंदीचा जागर केला जातो. तर दुसरीकडे रोज स्त्यावर मोकाटपणे भटकणाऱ्या गायींच्या हालअपेष्टा मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. रस्त्यावर उपाशीपोटी गायी फिरतात. प्लास्टिक खातात त्यातून त्यांच्या आरोग्याला बाधा होते. प्रसंगी मोकाट जनावरांना प्राणही गमवावे लागतात. वाहतुकीला अडथळा निर्माण करतात त्यातून अपघात घडतात, अनेकदा गायी पण जखमी होतात. अपंगत्व प्राप्त होते.ही लाजिरवाणी व वेदनादायी वस्तुस्थिती आहे. मोकाट जनावराच्या संगोपनासाठी आपण बीड नगर परिषद प्रशासनाकडे प्रस्ताव दिला होता परंतु त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. गोमातेच्या सन्मानासाठी गोहत्या बंदी कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. रस्त्यावर मोकाट फिरणाऱ्या प्रत्येक गाईंच्या रक्षणासाठी समाजाने संवेदनशील मनाने पुढाकार घ्यावा ही आग्रहाची विनंती.

# ना.पंकजाताई मुंडे यांनी अनाथ मुलांसोबत साजरी केली दिवाळी

**मुलांसोबत पणती रंगविण्यात अन् आकाश कंदील बनविण्यात घेतला उत्साहाने घेतला सहभाग**



तभा वृत्तसेवा
मुंबई दि.१८ ऑक्टोबर

दिवाळीचा सण म्हणजे फक्त दिव्यांचा, फटाक्यांचा किंवा सजावटीचा उत्सव नाही तर तो माणुसकीचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा उत्सव आहे, हा विचार करून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी आज एका आगळ्यावेगळ्या आणि हृदयस्पर्शी कार्यक्रमात अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली. या मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून ना. पंकजाताई भावूक झाल्या.

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि द चिल्ड्रन्स एड सोसायटी फॉर अंडरप्रिव्हिलेज्ड किड्स ऑर्फनेजच्या यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आधुनिक कला दालन, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास पंकजाताई मुंडे यांनी भेट दिली. या वेळी आकाश कंदील बनविण्याची कार्यशाळेचे आणि प्रसिद्ध कलाकार ए. ए. अल्मेलकर यांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आधुनिक कला संग्रहालयाच्या संचालक निधी चौधरी उपस्थित होत्या.

मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद प्रेरणा देणारा

यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, ही अनाथ मुलं कोणत्या जातीची,धर्माची आहेत हे महत्त्वाच नाही, तर ती माणसाची आहेत आणि त्यांच्या डोळ्यांतील आनंद हा समाजासाठी प्रेरणादायी आहे. असा समाज घडला पाहिजे, जिथे प्रत्येक माणूस स्वतःची ओळख स्वतः निर्माण करेल.

प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्यावरण विभागाने समाज माध्यमांद्वारे जनजागृती केली आहे, असे सांगून सर्व नागरिकांनी प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपण ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळून, निसर्गाशी सुसंगत अशी पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करू, असे त्या म्हणाल्या.यावेळी पंकजाताई मुंडे यांनी मुलांसोबत आकाशकंदील तयार केले. तसेच पणत्या रंगवल्या आणि चित्रकला उपक्रमात सहभागही घेतला. छोट्या हातांनी केलेल्या सृजनातून व्यक्त झालेला उत्साह आणि निरागसतेचा झरा पाहून त्या भावूक झाल्या.

# ‘स्वाराती’ संस्थेकरीता अभ्यागत मंडळ; अध्यक्षपदी खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई या संस्थेकरीता अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आले आहे. या मंडळाच्या अध्यक्षपदी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हा निर्णय राज्य शासनाच्या वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वतीने काढला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय अंबाजोगाई या संस्थेत अंमलात असलेले नियम व आदेश यांच्या चौकटीमध्ये राहून रुग्णालयाच्या व्यवस्थापनांत सुधारणा करण्यासाठी मार्ग व साधने तयार करणे, निरनिराळ्या कामासाठी व विभागांसाठी मंजूर केलेल्या आर्थिक तरतूदींचा योग्य प्रकारे वापर होत आहे किंवा नाही यावर देखरेख ठेवणे. रुग्णालय संबंधिच्या जनतेच्या तक्रारीचा अभ्यास करणे व त्याचे निवारण होण्यासाठी करावयाच्या पध्दतीबद्दल शिफारस करणे, रुग्णालयातील कर्मचारी वर्गाची अनियमित उपस्थिती, अवक्तशीरपणा व गैरवर्तन इत्यादींबाबत आढावा घेणे व त्यांत सुधारणा व्हावी म्हणून शिफारस करणे. रुग्णालय परिसराची तपासणी करणे, सर्वसाधारण कामकाजांचा अभ्यास करणे व दोष आढळल्यास ते दूर करण्यासाठी उपाय सुचविणे. रूग्णालयासाठी जनतेकडून देणग्या नियंत्रित करणे, गोळा करणे व स्विकारणे व राज्य शासनास रुग्णालयांसाठी अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही अशा विशेष बाबींसाठी त्या उपयोगात आणणे, कोणती देणगी स्विकारण्यामध्ये अथवा तिचा रुग्णालयासाठी उपयोग करताना अंमलात असलेल्या नियमांचा व आदेशांचा भंग होता कामा नये.



उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समितीच्या कामकाजामध्ये आवश्यक त्या पध्दती विहीत करणे व इतर आवश्यक त्या गोष्टी करणे. आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांच्या अमंलबजावणीचा आढावा घेणे आदि विषयांसाठी अभ्यागत मंडळ गठीत करण्यात आलेले असून खा.बजरंग सोनवणे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

दोन महिन्याला खा.सोनवणे घेतील बैठक

१) समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा तरी बोलविण्यात येणार आहे. अध्यक्षांनी निर्देशित केल्यास, अधिक वेळा बैठक बोलविता येईल.

२) कोणीही सदस्य सतत दोन बैठकीत अनुपस्थित राहिल्यास त्याचे सभासदत्व आपोआप रद्द होईल, परंतु सदस्य योग्य व सबळ कारणांसाठी अनुपस्थित राहिला असल्यास सभासदत्व पुढे चालू ठेवण्यास शासन अनुमती देईल.

३) समितीच्या प्रत्येका बैठकीची आगाऊ सूचना बैठकीच्या दिनांकापासून १० दिवस अगोदर बैठकीच्या कार्यसूचीसह समिती सदस्यांना पाठविण्यात येईल.

४) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना समितीच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्याचा हक्क राहील व त्या उपस्थितीच्यावेळी त्यांना समितीच्या सदस्यांचे हक्क व दर्जा प्राप्त असेल.

५) समितीच्या बैठकीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुबई यांना समितीच्या सदस्य सचिवांनी बैठकीच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत पाठवावा.

# ‘येडेश्वरी’ मुळे शेतकरी आनंदी असल्याचे पाहून समाधान वाटते

## खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, येडेश्वरी कारखान्याचे बॉयलर अग्निप्रदीपन




तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर

पुर्वी ऊसउत्पादकांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कारखानदारांकडे चकरा माराव्या लागत. हे बंद करण्यासाठी शेतकरी केंद्रबिंदू माणून आपण येडेश्वरी साखर कारखान्याच्या उभारणीचा निर्णय घेतला. यानंतर हा कारखाना हळूहळू मोठा केला. आज या कारखान्यामुळे शेतकऱ्यांना आपला ऊस घेवून जाण्यासाठी कुठेही जावे लागत नाही, आणि ऊसदरही अपेक्षित मिळत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसतो, हाच आनंद पाहून आपल्याला समाधानी वाटते, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.

येडेश्वरी साखर कारखाना लि.आनंदगाव सा.युनिट नं.१ चा १२ वा बॉयलर अग्निप्रदीपन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, मागच्या काही वर्षांपुर्वी शेतकऱ्यांना कारखान्याची गरज होती. आता कारखान्याला शेतकऱ्यांची गरज आहे. साखर कारखाना हा तीन चाकी रिक्षा आहे. यातील एक चाक म्हणजे ऊसउत्पादक, दुसरे चाक ऊसतोड मजूर आहे तर तिसरे चाक हे कारखान्यातील कर्मचारी आहेत. यातील एक चाक जरी रस्त्यावरून घसरले तर जिल्ह्यात अनेक कारखान्याचे काय झाले?, हे आपण पाहत आहोत. कारखानदारी आता सोपी राहिलेली नाही. कारखाना चालविताना समन्वय असणे आवश्यक आहे. आपण शेतकरी केंद्रबिंदू मानून कारखान्याची उभारणी केली. त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलावे, त्यांचे प्रपंच उभा रहावे, असा उद्देश कारखाना उभारणी करताना ठेवलेला आहे. उसउत्पादक, ऊसतोड मजूर यांना जपण्याचे काम केले आहेच पण कारखान्यातील कर्मचाऱ्यांना देखील कधीही नाराज केलेले नाही. या वर्षी त्यांच्यासाठी चांगली वेतन वाढ करण्यात आलेली आहे. यामुळे कर्मचारी खूष आहेत. हा कारखाना दरवर्षीपेक्षा यावेळी अधिक उस गाळप करण्याचा प्रयत्न करेल. शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस घेवून जाण्यासाठी प्रयत्न करेल. आपला कारखाना अडीच हजार टनवरून आठ हजार कॅपीसीटीपर्यंत गेला आहे. कारखान्याच्या माध्यमातून अनेक प्रकल्प तयार केले आहेत. यातून लोकांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. यावर्षी उत्तम पध्दतीने कारखाना चालवला जाईल. आपण सर्वांनी हा कारखाना आपला आहे, असे समजूनच काम करावे, असे अवाहनही त्यांनी यावेळी कर्मचाऱ्यांना केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उप प्रदेशाध्यक्षा संगीता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे पदवीधर संघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक बाळकृष्ण भवर, सारिका बजरंग सोनवणे, सौरव सोनवणे यांच्यासह पंचक्रोशीतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, कार्यकर्ते, येडेश्वरी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजपा जि.अध्यक्षासह बाळराजे पवारांच्या उपस्थितीत गेवराई भाजपाची आज बैठक

**निरीक्षकांच्या उपस्थित न.प. इच्छुक उमेदवाराच्या मुलाखती होणार**

तभा वृत्तसेवा
बीड दि.१८ ऑक्टोबर



नगरपरिषद निवडणुक २०२५ साठी भाजपच्या इच्छुक उमेदवारांची व कार्यकत्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली या बैठकीस सर्व भाजपा पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन सचिन दाभाडे तालुका अध्यक्ष व भाजपाच्या वतिने दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात करण्यात आले दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे, मा.खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे तर या बैठकीला पक्ष निरीक्षक डॉ.स्वरूपसिंह हजारी, श्री.अॅड.सर्जेराव तांदळे, श्री.संजय आंधळे, श्री.हिंदुलाल काकडे शंकरजी देशमुखजिल्हाध्यक्ष भाजप बीड गेवराई मतदारसंघाचे लोकनेते बाळराजे दादा पवार उपस्थित राहणार आहेत.तरी या बैठकीस नगराध्यक्ष व नगसेवका पदासाठी इच्छुक उमेदवार व सर्व भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत असून आज दि.१९/१०/२५ वार रविवार वेळ सकाळी ११:०० वाजता छ.शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह, छ.शिवाजी महाराज चौक गेवराई येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आसल्यांचे भाजपा तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## विचित्र तिहेरी अपघात

# राष्ट्रीय महामार्गाच्या हलगर्जीपणामुळे २ ठार तर ८ जण जखमी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १८ ऑक्टोबर-**

तुळजापूर- नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर डागडुजीचे काम चालू असताना महामार्गाच्या कर्मचाऱ्यांनी हलगर्जीपणा करून पर्यायी रस्ता न दिल्यामुळे विचित्र झालेल्या अपघातात लातूर येथील एकाच कुटुंबातील २ जणांचा अपघात स्थळीच मृत्यू झाला तर इतर ८ जण गंभीर जखमी झाल्याची घटना आज रोजी दोन च्या सुमारास हदगाव तालुक्यातील भानेगाव फाट्याजवळ घडली.

राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ चा हदगाव शहरापासून ८ किलोमीटर अंतरावर असलेल्या भानेगाव फाट्याजवळ महामार्गातच्या डागडूजी साठी फिरणाऱ्या वाहनाच्या व महामार्गाच्या कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे जेसीबी व नांदेड





वरून आर्णी कडे जाणाऱ्या आयचर व चाकूर वरून चंद्रपूर कडे जाणाऱ्या अशा तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला. या अपघातात चार चाकी वाहनातील परिवार हा सॉफ्टवेअर इंजिनियर झालेल्या मनोज करिता मुलगी बघण्याच्या कार्यक्रमासाठी चंद्रपूर येथे जात असताना हा अपघात घडला त्यात मनोज रामराव देगुरे (३४) व मंजुषा देवदास आईलवार(३७) या दोघांचा जागीच मृत्यू झाला असून पियुष देविदास आईलवार (४२) मंजुषा निळकंठ आसेवाड (४०) रामराव देगुरे (६०), प्रतिभा देगुरे (५७) दत्तात्रेय अंकुटे (२५), निधी आसेवाड (१४), शरयू आसेवाड (७) सर्व रा. लातूर तसेच आयचर चालक शाहरुख खान (३४) रा. खंडवा मध्य प्रदेश हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती कळताच अंकुश गोदजे, बालाजी ढोरे, राजु तावडे, गजानन देवसरकर, मिलीद पाईकराव, गंगाधर काळे, शंकर जळके, अनिल देशमुख, शुभम गलांडे यांनी तात्काळ मदत करत जखमींना उपजिल्हा रुग्णालय हदगाव येथे आणण्यासाठी धावपळ केली. रुग्णालयात डॉ. प्रदीप स्वामी, डॉ. दादाजी ढगे, डॉ. बालाजी पोटे यांनी प्राथमिक उपचार करून तातडीने पुढील उपचारार्थ नांदेड येथे हलविले. जर महामार्गाची डागडुजी चे काम चालू असेल तर फलक लावणे गरजेचे असते परंतु महामार्गाच्या कर्मचाऱ्यांना याची गांभीर्य घेतले नाही. अपघात हा महामार्गाच्या ढिसाळ व व हलगर्जीपणामुळे घडला असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेची माहिती कळतच पोलीस निरीक्षक संकेत दिघे यांनी तात्काळ धाव घेतली व महामार्ग येथे वरील वाहतूक सुरळीत केली.

# दिवाळी स्पेशल नांदेड - हडपसर विशेष दोन रेल्वे गाड्या धावणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑक्टोबर-**

भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा सण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिवाळी सणाला आपल्या गावाकडे जाऊन आनंद उत्सव साजरा करता यावा या अनुषंगाने प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून नांदेड- हडपसर या मार्गावर विशेष रेल्वे गाड्या सोडावेत अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्र्यांकडे केली होती. या मागणीला यश आले असून नांदेड हडपसर या दोन विशेष रेल्वे गाड्या सोडण्यात येणार आहेत.



दिवाळीनिमित्त होणारी रेल्वे प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्ये रेल्वेने नांदेड हडपसर नांदेड विशेष गाडी लातूर मार्गे चालविण्याचे जाहीर केले आहे. यासाठी खा.डॉ. अजित गोपछडे यांनी यशस्वी पाठपुरावा केला आहे. नांदेडसह मराठवाड्यातील लाखो कर्मचारी, कामगार ,विद्यार्थी ,व्यापारी पुणे आणि पुणे परिसरात वास्तव्यास आहेत. परंतु दिवाळी सण साजरा करण्यासाठी ही सर्व मंडळी आपापल्या गावाकडे येत असतात. पुणे येथून नांदेड अथवा मराठवाड्यात येण्यासाठी खाजगी वाहनाने प्रवास करणे आर्थिक दृष्ट्या खर्चिक आणि जिकीरीचे असल्याने या प्रवाशांना सुखरूप प्रवास करता यावा यासाठी नांदेड - हडपसर या मार्गावर विशेष रेल्वे गाड्या सोडाव्यात अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली होती. या मागणीचा सकारात्मक विचार करत केंद्रीय रेल्वेमंत्र्याने नांदेड - हडपसर या मार्गावर रेल्वेच्या दोन विशेष गाड्या सोडत या गाड्यांच्या चार फेऱ्या करण्याचे आदेशित केले आहे. त्यानुसार गाडी क्रमांक ०७६०७ हुजूर साहेब नांदेड ते हडपसर विशेष गाडी दिनांक २१ ऑक्टोबर आणि २८ ऑक्टोबर रोजी नांदेड रेल्वे स्थानकावरून सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी सुटेल . सदर रेल्वे पूर्णा - परभणी -गंगाखेड- परळी -लातूर रोड- लातूर -धाराशिव -बार्शी शहर- कुरूडवाडी - दौंड मार्गे हडपसर येथे रात्री नऊ वाजून ४० मिनिटाला पोहोचेल. परतीच्या प्रवासात ७६०८ ही हडपसर ते हुजूर साहेब नांदेड विशेष गाडी दिनांक २१ ऑक्टोबर आणि दिनांक २८ ऑक्टोबर रोजी मंगळवारी हडपसर रेल्वे स्थानकावरून रात्री १० वाजून ५० मिनिटाला सुटणार असून ती दौंड- लातूर -परळी - परभणी मार्गे हुजूर साहेब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १२ वाजून १५ मिनिटाला पोहोचणार आहे . या गाडीला एकूण २२ डबे असणार आहेत . त्यामुळे पुणे येथून नांदेडकडे आणि मराठवाड्यात येणाऱ्या सर्व रेल्वे प्रवाशांना आणि दिवाळी साजरी करणाऱ्या बांधवांना खा. डॉ. अजित यांच्या प्रयत्नामुळे दिवाळीच्या प्रवासाचा गोड आनंद घेता येणार आहे.

## डाक कार्यालयात दिवाळी फराळ परदेशात पाठवण्यासाठी विशेष सेवा उपलब्ध

**नांदेड** -दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नांदेड मुख्य डाक कार्यालयाने परदेशात राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांना घरगुती फराळ पाठवण्यासाठी विशेष सेवा सुरू केली आहे. भारतीय पोस्ट खात्याने यासाठी पूर्ण सज्जता केली असून, सुरक्षित पॅकेजिंगसह विविध सुविधा पुरविण्यात येत आहेत.
दिवाळीचा फराळ हा भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. तो दूरदेशी असलेल्या प्रियजनांपर्यंत पोहोचवणे हा एक भावनिक आणि आनंददायी अनुभव ठरतो. यासाठी नांदेड मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये फराळ पाठवण्यासाठी लागणाऱ्या बॉक्स पॅकिंगची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेमुळे नागरिकांना आंतरराष्ट्रीय मानकांनुसार पॅकिंग करून १५० हून अधिक देशांमध्ये फराळ पाठवता येणार आहे. विशेष बुकिंग काउंटरद्वारे ही सेवा सुलभ करण्यात आली आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा आणि आपल्या प्रियजनांना दिवाळी फराळ पाठवून सणाच्या आनंदात सहभागी करावे, असे आवाहन नांदेड विभागाचे डाक अधीक्षक सतीश रघुनाथराव पाठक यांनी केले आहे.

## समस्याग्रस्त व पीडित महिलांसाठी २० ऑक्टोबर रोजी महिला लोकशाही दिन

**नांदेड** -समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी सोमवार २० ऑक्टोबर २०२५ रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. या लोकशाही दिनात समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.
दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवार २० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधनी प्रशिक्षण केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघ दिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजा समवेत उभारावा

**नांदेड** -संयुक्त राष्ट्रसंघ दिन २४ ऑक्टोबर रोजी आहे. या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्र ध्वजा समवेत उभारण्याबाबत शासन परिपत्रकानुसार निर्देश दिले आहेत. ज्या शासकीय कार्यालयात दररोज राष्ट्रध्वज उभारण्यात येतो त्या कार्यालयावर २४ ऑक्टोबर २०२५ या संयुक्त राष्ट्रसंघदिनी संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज भारतीय ध्वजसंहिता २००२ च्या परि. ३.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रध्वजाच्या बरोबर उभारण्यात यावा. संयुक्त राष्ट्रसंघाचा ध्वज राष्ट्रध्वजाच्या कोणत्याही बाजुला फडकविता येतो. सामान्यत: ध्वज स्तंभाच्यासमोर उभ्या असलेल्या प्रेक्षकांच्यादृष्टीने त्यांच्या अगदी डावीकडे राष्ट्रध्वज असावा असे निवासी उपजिल्हाधिकारी नांदेड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## सदा पाटील पुयड यांची वाजेगाव गणातून पंचायत समितीसाठी जोरदार तयारी

**नवीन नांदेड** -स्वाभिमानी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सदा पाटील



पुयड यांनी वाजेगाव गणातून आगामी पंचायत समिती निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. अनेक वर्षांपासून सामाजिक संघटनेत कार्यरत राहून त्यांनी गोरगरीब व सामान्य जनतेच्या विविध समस्या सोडवण्याचे काम केले आहे.अलीकडेच त्यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. अद्याप पक्ष निश्चित नसला तरी त्यांचे राष्ट्रवादीचे नेते प्रताप पाटील चिखलीकर यांच्याशी घनिष्ठ संबंध असल्याने, राष्ट्रवादीतून तिकीट मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.युवा नेतृत्व म्हणून आगामी निवडणुकीत सहभाग घेण्याची त्यांची तयारी सुरु असून, ग्रामविकासाच्या उद्दिष्टाने ते मैदानात उतरणार आहेत.

## दिवाळीच्या सात दिवसात एक क्विंटल मिठाई वाटप

**नांदेड** -दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोकसहभागातून दिवाळीच्या सात दिवसात एक क्विंटल मिठाई भाऊचा माणुसकीचा फ्रिज, येथे उपेक्षितांना वाटप करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांनी दिली आहे. यावर्षी या उपक्रमामध्ये रुपेश वट्टमवार, डॉ. सुनिता गोधमगावकर, शिक्षणाधिकारी सविता बिरगे , मोहित व रेणुका सोनी, चंद्रकांत गंजेवार, शोभा नंदलवार, सुरेश पळशीकर, अविनाश चिंतावार मुंबई यांनी प्रत्येकी दहा किलो मिठाई उपलब्ध करून दिली आहे. याशिवाय दोन दानशूर नागरिकांनी अज्ञात दाता म्हणून सहभाग घेतला आहे. १७ ते २३ ऑक्टोबर दरम्यान सकाळी दहा वाजता दररोज वेगवेगळी दहा किलो मिठाई भाऊचा माणुसकीचा फ्रिज, पंचवटी हनुमान मंदिरा जवळ, महावीर चौक नांदेड येथे अन्नदात्यांच्या हस्ते वाटप करण्यात येणार आहे.यामध्ये बुंदी लाडू, करंजी, बेसन लाडू, काला जामुन, रवा लाडू, म्हैसूर पाक, बालुशाही याचा समावेश आहे. याशिवाय लहुजी साळवे अनाथाश्रम धनगर टेकडी, संध्या छाया वृद्धाश्रम गजानन महाराज मंदिराजवळ, सुमन बालगृह हनुमान गड येथे देखील प्रत्येकी दहा किलो मिठाई वाटप करण्यात येणार आहे. भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल व अमरनाथ यात्री संघ यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून भाऊचा माणुसकीचा फ्रिज या उपक्रमांतर्गत पंचवटी हनुमान मंदिर नांदेड या ठिकाणी दररोज किमान ४० ते १२० जेवणाचे डबे खऱ्याखुऱ्या गरजूंना देणगीदारांच्या हस्ते वाटप करण्यात येतात. वर्षभरातील महत्त्वाच्या सणांच्या दिवशी जेवणाच्या डब्यासोबत मिठाई देखील वाटप करण्यात येते. दरवर्षी दिवाळी दरम्यान वाटप करण्यात येणाऱ्या एक क्विंटल मिठाईचा लाभ अनेक गरजू घेत असतात.

# रत्नाळी येथे भेसळ युक्ती शिंदी विक्री जोरात

**तभा वृतसेवा**
**धर्माबाद, दि. १८ ऑक्टोबर-**

रत्नाळी येथे मे. जय माता ताडी विक्री केंद्र यांनावाने शिंदी भट्टी मध्ये भेंसळ रासायनिक मिक्स शिंदी विक्री चालू आहे दुकानावर ताडी विक्री नावाचे बोर्ड आहे पण येथे भेंसळ युक्ती शिंदी गोळया, मिक्स,पावडर मिक्स असे अनेक मिक्सीसींग प्रकार करत असल्याचे दिसून१ येत आहे. धर्माबाद तालुक्यात ताडी चे एक ही झाडे दिसत नाही तरी ही ताडी चे दुकान विक्रीचे बोर्ड लावून ताडी म्हणून भेंसळ युक्त शिंदी



विक्री चालू आहे. या ठिकाणी शिंदी विकत घेऊन पिणाऱ्या नागरिकांना जिव गमाव लगला आहे या अशा भेसळ युक्ती शिंदी पिहून अनेक नागरिकाचे संसार उध्वस्त होत आहे नागरिक व शाळेकरी विदयार्थी वेसनी बनत चले आहेत येथील शिंदी नागरिकांना खूप घातक सिद्ध होत आहे याकडे वरिष्ठ उत्पादन शुल्क विभाग अधिकारी यांनी हे शिंदी केंद्र बंद करण्यात यावे अशी मागणी नागरिका मध्ये चर्चा होत आहे.

# मुखेड तालुक्यातील पुरग्रस्तांच्या मदतीला नाम फाऊंडेशन सरसावली

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. १८ ऑक्टोबर-**

ऑंगष्ट महिन्यात मुखेड तालुक्यात प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीत लेंडी नदीला विनाशकारी महापुर येऊन घरात पाणी शिरल्याने यात अनेकांचा मृत्यू झाला. जनावरे, शेतीसह औजारे वाहून गेली. घरात पाणी शिरल्याने घरे पडली.

अन्नधान्यासह संसारोपयोगी वस्तूही वाहून गेल्या आहेत. संसार उघड्यावर पडले असून या संकटाच्या काळात काळात नाम



फाऊंडेशनच्या माध्यमातून नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे व कनपक इंडिया प्रायवेट लिमिटेड छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्तविद्यामाने हासनाळ, रावणगाव, भिंगोली भेंडेगाव, येथील पूरग्रस्तांना आधार देण्याचे काम सुरू केले असून गुरूवार (ता.१६) रोजी

पुरग्रस्तांना अन्नधान्यांचे एक हजार किट वाटप करण्यात आले आहेत. ऐन दिवाळीच्या सणावरच लेंडी नदीच्या महापुराने अक्षरशः तांडव घातला घरात आहे नाही ते वाहून नेले घरे पडली संसार उघड्यावर पडला. असल्यामुळे येथील पुरग्रस्तांचा संसार पुन्हा थाटण्यासाठी व त्यांची दिवाळी आनंदात साजरी व्हावी, यासाठी आता नामा फाऊंडेशन संस्था व छत्रपती संभाजी नगर येथील कनपक इंडिया लिमिटेड प्रायवेट या कंपनीने मदतीचा हात पुढे केला असून रावणगाव , हासनाळ, भिंगोली भेंडेगाव येथील पुरग्रस्तांना

गावांमध्ये जाऊन किराणा किटचे वाटप केले आहे. या किट्समध्ये तूप, तांदूळ, डाळ, तेल, मसाले, चहा-साखर दिवाळी फराळाचे साहित्य , ब्लककेट अशा जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे, ज्यामुळे गरजूंना आधार व दिलासा मिळाला आहे. नाम फाऊंडेशनचे व कनपक कंपनीचे कर्मचारी या गावात थेट जाऊन पुरग्रस्तांनाच मदतीचे साहित्य पोहोचवत आहेत.या पुरग्रस्त वाटप कार्यक्रमात सांस्कृतिक संवर्धन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद देशमुख, नाम फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक गणेश गायकवाड, विलास चामे, तुळशिराम हंगे, मानोज फ्लोड, यांच्यासह संस्थेचे अन्य पदाधिकारी सहभागी झाले होते. किट वाटप करण्यासाठी आलेल्या नाम फाऊंडेशन व कनपक कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी येथील पुरग्रस्तांच्या अडचणी समजून घेवून तुम्ही खचू नका आम्ही तुमच्या सोबत आहोत यापेक्षाही अधिक मदत करण्याचा आमचा प्रयत्न असेल असा धीर देत त्याचे मनोबल उंचावले.

# दहावी-बारावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी ) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांसाठी सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्यासाठी उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या ह्रींींि://ु.ारहरह्रीललेरीव.ळप या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केले आहे.

फेब्रु-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) विलंब शुल्कासह ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत.

विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोच पावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे या तपशीलानुसार विलंब शुल्कासह (प्रति विद्यार्थी शंभर रुपये) नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा गुरुवार १६ ऑक्टोबर ते शुक्रवार ३१ ऑक्टोबर २०२५ या राहतील.

खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी व इ. १२ वीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ह्रींींि://ु.ारहरह्रीललेरीव.ळप या संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. यासंदर्भात अधिक माहितीसाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.

विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरिता शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र, आधारकार्ड, स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत: जवळ ठेवावा, ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

पात्र विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे. आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाचे सचिव यांनी केले आहे.

## ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती विलंब प्रकरणात एमएसईडीसीएलला फटका

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी हिंगोली जिल्हा आयोगाचा निर्णय कायम ठेवत एमएसईडीसीएलच्या अपीलला नकार दिला आहे.

जरोडा (ता. कळमनुरी) येथील शेतकऱ्यांच्या शेतीतील १०० केव्हीएचा ट्रान्सफॉर्मर १७ डिसेंबर २०१८ रोजी जळाल्यानंतर तो १० एप्रिल २०१९ रोजी म्हणजे तब्बल चार महिन्यांनी दुरुस्त करण्यात आला. या काळात विजेअभावी पिके नष्ट झाल्याने शेतकऱ्यांनी ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती.

जिल्हा आयोगाने प्रत्येक शेतकऱ्याला ५०,०००/- पिकांचे नुकसान भरपाई व ५,०००/- मानसिक त्रास भरपाई देण्याचा आदेश दिला होता. राज्य आयोगाने हा निर्णय योग्य ठरवत एमएसईडीसीएलला प्रत्येक शेतकऱ्याला ७,०००/- खर्च म्हणून देण्याचे निर्देश दिले आहेत.

या प्रकरणात शेतकऱ्यांच्या वतीने ॲड. वैभव बी. ढगे, ॲड. शिवाशीष विजय भोपी यांनी प्रभावी युक्तिवाद करत ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीला झालेला चार महिन्यांचा विलंब हा गंभीर सेवा त्रुटी असल्याचे अधोरेखित केले. आयोगाने नमूद केले की, ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती ४८ तासांत करणे बंधनकारक असून, एमएसईडीसीएलचा थकबाकीदारांना प्राधान्य न देण्याचा परिपत्रक हा नियमांच्या विरोधात आहे.

# दिवाळी पहाट कार्यक्रमात यावर्षीही नांदेडच्या रसिकांना संगीत मेजवानी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १८ ऑक्टोबर-**

गेल्या तेरा वर्षापासून जिल्हा प्रशासन, गुरुद्वारा बोर्ड,नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका आणि नागरी सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील बंदाघाट येथे दिवाळी पहाट हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यावर्षी देखील दि.२० ऑक्टोंबर ते २२ ऑक्टोबर दरम्यान दिवाळी पहाटचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. प्रख्यात गायिका अनुराधा पौडवाल यांच्या सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम हे यावर्षीचे दिवाळी पहाटचे आकर्षण असणार आहे.

दि.२० ऑक्टोबर सकाळी साडेपाच वाजेपासून प्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधा पौडवाल यांचे सुश्राव्यगायन होणार आहे. यात भावगिते, भक्तीगिते, चित्रपट गिते त्या सादर करणार आहेत.

प्रख्यात निवेदक डॉ.नंदकुमार मुलमुले यांची संकल्पना असलेला हा कार्यक्रम असून ते स्वतः या कार्यक्रमाचे निवेदन करणार आहेत. सह गायक म्हणून रविंद्र आहिरे मुंबई हे देखील यात सहभागी होणार आहेत. सायंकाळी साडेपाच वाजता संकल्पना व निवेदन बापू दासरी यांच्या पुढाकारातून रागरंग हा विविध वाद्य आणि गझल यांचे फ्युजन असलेला आगळावेगळा कार्यक्रम सादर होणार आहे. यात मिलिंद तुळणकर-पुणे, कल्याणी देशपांडे-पुणे, प्रकाश सोनकांबळे, ऐनोद्दीन वासरी, डॉ. गुंजन शिरभाते, सौ.आसावरी जोशी (रवंदे), बालासाहेब पाटील हे मान्यवर कलावंत सहभागी होतील.

२० ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठ वाजता प्रख्यात नृत्य दिग्दर्शिका डॉ.सान्वी जेठवानी यांच्या संचाचा नृत्य झंकार हा कार्यक्रम सादर होणार आहे. शुभंम बिरकुरे व स्थानिक कलावंत यात सहभागी होतील.

दि.२१ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाच वाजता प्रख्यात निवेदक प्रा.सुनिल नेरलकर यांच्या पुढाकारातून पं.जसराज यांच्या शिष्योत्तमा अंकिता जोशी यांचा शास्त्रीय संगीतावरील आधारीत स्वर सरिता हा कार्यक्रम होणार आहे. यात अभिनय रवंदे, प्रशांत गाजरे, विश्वजित कोलंबीकर, अनहद वारसी, चिन्मय मठपती, अदिती रवंदे व ईश्वरी जोशी हे सहकारी कलावंत सहभागी होतील.

बुधवार दि.२२ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेपाच वाजता संकल्पना व निवेदन ॲड.गजानन पिंपरखेडे यांच्या पुढाकारातून व पत्रकार विजय जोशी यांच्या निर्मितीतून १९६० ते १९८० या काळातील मराठी चित्रपटांच्या सुवर्णकाळात गाजलेल्या मराठी गितांचा रुपेरी सोनसळा हा कलांगण प्रतिष्ठाण प्रस्तूत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात प्रख्यात गायिका पौर्णिमा आडगावकर, किर्ती पंढरपूरकर, सौ.कांचन अंबेकर, स्वरांजली पांचाळ, मिताली सातोनकर, गायक सच्चिदानंद डाकोरे, शंकर सोनतोडे, विजय जोशी आदी मान्यवर गायक सहभागी होणार असून, या कार्यक्रमात वाद्यवृंदाची साथ राज लामटिळे, स्वप्नील धुळे, भगवानराव देशमुख, रविकुमार भद्रे, रतन चित्ते आदी करणार आहेत.

सायंकाळीसाडेपाचवाजतानांदेडकरांना एका आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचा आनंद घेता येणार आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या संकल्पनेतून व सुरेश जोंधळे व मकरंद दिवाकर यांच्या सहकार्यातून काफीला, कोल्हापूर निर्मित जियारत हा मराठी,हिंदी,उर्दू प्रेम साहित्यांची संगीतमय प्रेमयात्रा हा कार्यक्रम सादर होणार आहे. सतीश तांदळे यांचे दिग्दर्शन, संकलन व लेखन असलेला हा कार्यक्रम संगीतकार ऋषिकेश देशमाने यांच्या साह्याने रंगणार आहे. या कार्यक्रमाचे सादरीकरण निखिल पुजारी आणि सतीश तांदळे हे करणार आहेत. तर कार्यक्रमात ओंकार पाटील, सुरज कांबळे, कौस्तुभ शिंदे आणि संपदा माने यांचे गायन होणार आहे. सर्व कार्यक्रम वेळेवर सुरु होणार असून, नांदेडच्या रसिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, गुरुव्दारा बोर्ड आणि नागरी सांस्कृतिक समिती नांदेड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**उपस्थितांना नम्र विनंती व आवाहन**

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने या कार्यक्रमात अतिवृष्टीग्रस्तांसाठी भरीव मदत करण्याचे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले असून, मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी कार्यक्रम स्थळी ठेवण्यात आलेल्या मदत पेटीत आपण सढळ हाताने मदत करावी, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.